# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४८ ] आकोला——सोमवार तारीख ५ माहे आक्टोबर सन १९१४ ई० [ अंक ३९



## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.

हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल. ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मार्गे राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक, आकोला ९।९।०९ — J. G. Ridland. एजंट

नो. नं ४

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६$\frac{३}{४}$ तोळे असतें.

मुंबई बँक, आकोला २१-९-१० — J. G. Ridland. एजंट

न० नं० ५

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.

नो. नं. २९

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० ग्रेप्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही.पी.नें रु० १०६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत

पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी

नो. नं. ६

### अनुभवून पसंत ठरलेली

केशनाशकपूड किं० ४ आणे, दंतमंजन कापूर, शोप, पेपरमींट, सुंठ, पुदीना, हिंग, अजवान, दवना यांचे अर्क, किं० प्रत्येकीं ४ आणे, कावीळ, व मुळव्याध, यांच्या अप्रतीम गोळ्या किं १। रु० खरुज गजकर्ण, खवडा, इसब, नायटा, आगपैण; व्रण, चिखली, सुकी, ओली खाज, जखम, नखविषया, तमाम रोगावर चालणारा १ च 'दिलखुष' मलम किं ४ आणे ३ दिवसांत वरील मलमानें गुण येतो पौष्टीक चहा किं ४ आणे, वातनाशक तेल किं १२ आणे, विंचवावर पूड किं १। रु० व डोळ्यांतील वेगळ सोडण्याचे किं ४ आणे, वि० खु० पत्रद्वारें, वंग प्रवाल हात भट्टीचे किं० तोळ्यास २ रु०

पत्ता — व्ही० आर० मुळे, नांदुरा. जी० आय० पी०

नो० नं० ९

### गुण न आल्यास पैसे परत.

आमच्या प्रामाणिकपणाबद्दल खात्री करुन घ्या. मूळ किं० रु० ४ कमी केलेली किंमत पोस्टेज सह रु० २८≡ युथिन हें सतत सर्वत्र ५० वर्षें अनुभवलेलें असून त्यापासून नपुंसकत्व व अन्य कारणानें आलेला कमकुवतपणा यावर खात्रीनें गुण येतो अशाबद्दल खात्री झालेली आहे.

पत्ताः—यूथिन मॅनुफॅक्चरी चिचूर.

नो० नं० ४०८

श्री

हर्ष! हर्ष!! हर्ष!!!

### स्वार्थ आणि परमार्थ यांची लूट!!

### प्रालब्धाच्या परीक्षेची संधि!

त्वरा करावी. समय चुकल्यावर पश्चात्ताप होईल.

चोपाई.

रामकृपा जिहींपर जब होई ॥
रंक होय धनपाति माहि सोई ॥
सो हरिकृपा होइ फुरजाना ॥
त्यागहु जिनप्रभू आस सुजाना ॥१॥

एक लक्ष --किंवा --पन्नास हजार --किंवा पंचवीस हजार इत्यादि अधिकांत अधिक एक लक्ष आणि कमींत कमी पंचवीस रुपये पर्यंत जसें ज्याच्या भाग्यांत असेल ते केवळ दोन रुपयामध्यें लाभ मिळतो या विषयीं संपूर्ण निश्चय करण्यासाठीं दोन रुपये मनीऑर्डरनें पाठवावेत अगर एक कार्ड लिहून पाठवावें. ही मामूली जाहिरात नाहीं. यावर विश्वास ठेविला पाहिजे

पत्ताः— सेक्रेटरी,
पुण्य विभाग सभा,
धोलपूर रियासत-राजपुताना

नो. नं. ३९६

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थांनातील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. किं. रु. १०८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसात नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ७

### अगादर हें वाचावें.

शेंकडों लोकांस गुण आला आहे. काळजीसारखा दुसरा रोगच नाहीं. कांहे, इतकी काळजी कां करतां. तुमची इच्छा हीच आहेना? व्यापारांत फायदा व्हावा, नोकरींत बढती मिळावी, परीक्षा पास व्हावी, संतती व्हावी, कर्जमुक्त व्हावें, घरांत कलह होऊं नये, शरीरांत सौख्य व्हावें, कोणतीही बाधा होऊं नये, इतक्या गोष्टी बद्दल काळजी करण्यास नको असेल तर प्रसिद्ध मांत्रिक माणिकप्रभु येथील रामचंद्र तात्या ह्यांचा **जगप्रसिद्ध अद्भुत ताईत** जवळ ठेवा. म्हणजे सर्व गोष्टी मनाप्रमाणें होतील ताईताचे गुणाची ह्या देशांत व परदेशांत ख्याति आहे. अनुभव घेऊन पहावा. गुण न आल्यास पैसे परत मिळतील. कोणतीही शंका घेऊं नका. कोणते वर्तमान पत्रावरून मागणी केली हें कळवावें. नंबर १ चा ताईत ह्याची किंमत रुपये ८ - नंबर २ चा ताईत किंमत रुपये ४ नं. ३ चा ताईत किंमत रु. १। ट. व्ही. पी. खर्च ०५ आणे. नंबर १ च्या ताईता पासून १५ दिवसात गुण येईल. नंबर २ च्या ताईतापासून एक महिन्यांत गुण येईल, नं. ३ च्या ताईताचा गुण २ महिन्यानीं येईल. जशी जरूर असेल त्याप्रमाणें मागणी करावी.

पत्ताः—वासुदेव रावजी लेले
मिरज

नो. नं. ३७९


### नोटीस

खालीं सही करणार इनकडून किसन वा। नथु तायडे कुणबी राहणार मौजे एदलापुर प्रगणे अडगाव तालुके आकोट जिल्हे आकोले यांसः—

नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची गंधर्वाची बायको असून तुह्मी मला चांगले रितीनें वागवित नसल्यामुळें मी आज १॥ वर्षांपासून माझे आईपाशी ह्मणजे सिताई मर्द मारुती भमे राहणार कसबे अडगाव प्रगणे मनकु तालुके आकोट इचे घरीं आहे. करिता या नोटीशीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्यापासून एक महि न्याचे आंत आजपर्यंत माझे खावटी व कपड्याचा खर्च दरसाल ७५ रु प्रमाणें एकंदर रुपये ११२॥ देऊ मजला घेऊन जावें. सदरहु मुदती वर प्रमाणें निकाल न केल्यास माझे तुमचा नवरेपणाचा मुळींच हक्क राहणार नाहीं. व हीच तुमची फारकती असें समजलें जाईल. व सदरहु खर्च हल रितिप्रमाणें कोर्टमार्फत व्यवस्था केली जाईल. कळावें ता. २३।९।१४

सही
गुजी मर्द किसन त
कुणबी नि. खु हातची

नो. नं. ४१६

ऱ्हाडसमाचार

आश्विन वद्य १ शके १८३६

## तोफा.

एका अंकांत समुद्रांतर्गत सुरुंग कारचे असतात, व ते कसे ठेवतात ची माहिती दिली होती. सध्याच्या युद्धाच्या तारा वगैरे वाचतांना उल्लेख वारंवार येतो व चालू खरें स्वरूप पूर्णपणें ध्यानांत येण्यास यींची सामान्य माहिती असण्याची वश्यकता आहे. ह्मणून आज तोफां- ा थोडीशी माहिती देण्याचें योजिलें

या लढाईंत दोन प्रकारचे गोळे न सोडण्यांत येतात. एका प्रकाराचें श्रापनेल असें आहे. या गोळ्यांच्या पुष्कळ बारीक बारीक गोळ्या व दारू भरली असते. हा गोळा त ठिकाणीं जाऊन पडतांच फुटतो ातुन बारीक बारीक गोळ्या चारी वेगानें उडून नाश करतात. ांचा दुसरा एक प्रकार आहे. याचा ग किल्ल्याची तटबंदी फोडण्याकडे . गोळा लांबवर जाण्यास तोफ जड वी लागते. तिच्या वजनाच्या मानानें ा गोळ्याचा पल्ला लांब किंवा जव- ा असतो. जड तोफा युद्धांत बरोबर ागतात त्या येवढ्यासाठींच. बहुधा सहा त्यांकडून ओढली जाईल इतकें एकेका ंचें वजन असतें. जमिनीचा मऊपणा वा कडकपणा, सपाटी किंवा डोंगराची ; वगैरे पुष्कळ गोष्टी ध्यानांत घेऊन रनिराळ्या देशांत तोफेचें वजन निरनिराळें विण्यांत आलें आहे. ब्रिटिश तोफेचें नन ४३ हंड्रेडवेट ( १ हंड्रेडवेट= १ मण ६ शेर" असतें. फ्रेंच तोफ ४१॥. जर्मन ंफ४२॥ व जपानी तोफ ३० हंड्रेडवेट वज- ाची असते. अलीकडे जपानांत अधिक जनाच्या तोफा ओतूं लागले आहेत. आ- स्ट्रियाच्या तोफा जर्मन तोफा इतक्याच जनांत असतात. रशियाच्या तोफेचें वजन केती असतें ही माहिती आह्मांस मिळाली ाहीं. तोफेच्या वजनांत तोफ, तिची गाडी, दारूगोळा, पांच गोलंदाज व त्यांचें सामान ा सर्वांचें वजन धरतात. कित्येक तोफा फार जलद गोळा टाकणाऱ्या असतात. यांना इंप्रूव्हंत क्विक फायरर्स ह्मणतात. यांतून एका मिनिटांत २० गोळे सोडतां येतात. प्रत्येक तोफेबरोबर पांच गोलंदाज असतात. पैकीं दोन तोफेवर, दोन दारू- गोळ्याबरोबर व एक सर्वांच्यावर असतो. याशिवाय एकेक सार्जंट घोड्यावर झालेला बरोबर असतो. या सहा जणांमिळून एक गनडिट्याचमेंट होते. निरनिराळ्या देशांच्या तोफांची शक्ति निरनिराळी असते व ती किती आहे ही गोष्ट गुप्त ठेवण्यांत येते. तथापि शोधक लोकांनीं ही माहिती काढून लिहून ठेविली आहे, तिच्या आधा- रानें आह्मी ही माहिति लिहीत आहों. हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं रणभूमी- वर नेण्यांत येणाऱ्या तोफांची ही माहिती आहे. सवातीन इंची ब्रिटिश तोफेंतून ९। शेर वजनाचा व आंत ३६४ गोळ्या असलेला गोळा एका सेकंडांत १५९० फूट जातो. असे गोळे एकेका तोफेबरो- बर १७६ असतात. फ्रेंच तोफेच्या श्राप- नेल गोळ्याचें वजन ८ शेर असून त्यांत ३०० गोळ्या असतात, व हा गोळा एका सेकंडांत १७३९ फूट जातो. एकेका तोफेबरोबर असे गोळे ३१२ असतात. तीन इंची रशियन तोफेच्या श्रापनेल गो- ळ्याचें वजन ७। शेर असतें, एका गोळ्यांत २६० गोळ्या असतात व हा गोळा एका सेकंडात १९३० फूट जातो. एकेका तोफेबरोबर असे गोळे २१२ असतात. तीन इंची जर्मन तोफेच्या श्रापनेल गोळ्याचें वजन ७॥ शेर, गोळ्या ३०० व गोळा जाण्याचा वेग दर सेकंडास १५२९ फूट असतो; असे गोळे तोफेबरोबर १२६ असतात. आणि तीन इंची आस्ट्रियन तोफेचा श्रापनेल गोळा ७ शेर वजनाचा असून त्यात ३३२ गोळ्या असतात व तो १ सेकंडांत १६४० फूट जातो. असे गोळे एकेका तोफेबरोबर १६८ असतात.

हॉविझर नांवाचा तोफांचा एक प्रकार वरच्या सारखाच आहे. या तोफेचे गोळे वर उंच फेकतात. वरचें छत फोडावयाचें असेल किंवा भितीच्या आड बसलेल्या शत्रूचा नाश करावयाचा असेल तेव्हां या तोफेचा फार चांगला उपयोग होतो. या तोफेचा गोळा लांब जात नाहीं. याचावेग सेकंडास १००० फुटांपेक्षा अधिक नसतो. ह्मणून जवळच्या शत्रूशीं लढाईकरतांना किंवा उंच गोळे फेकावयाचे असले तरच हिचा उपयोग करतात.

या शिवाय मोठाल्या तोफा असतात. त्या लढाईंत नेत नाहींत. यांचे तीनप्रकार अस- तात. १ सामान्य २ हाविझर व ३ मॉर्टर. पहिल्या ह्मणजे सामान्य तोफेंतून ३० शेर वजनाचा गोळा उडवितां येतो. एक गोळा उडविण्यास बहुधा ३ शेर दारू ( बिन- धुराची ) लागते, हिचागोळा ४ मैल व १६० यार्ड जातो. हिचें वजन गाडी- सुद्धां ७१ हंड्रेडवेट असून गोळ्याचावेग सेकंडास १७६० फूट असतो. हिचीगाडी मजबूत असते. या जातीच्या पांच इंची तोफा ब्रिटिश फौजेंत आहेत. त्यांना हेवी ब्याटरी ( जड तोफा ) ह्मणतात. जर्मनीपाशीं ४ इंची तोफा आहेत. यांचा गोळा ६। मैल लांब जातो. दुसरावर्ग हाविझर तोफांचा. या तोफांचें वर्णन वर आलेंच आहे, तेथें त्यांचा उपयोगही सांगण्यांत आला आहे. या तोफांचा प्रचार फ्रेंच लोकांत फार आहे. तेथें या तोफांच्या १२० ब्याटरी १९०७ सालीं होत्या. जर्मनीपाशीं या जातीची एक तोफ आहे. तिच्यांतून ४३॥ शेर वजनाचा गोळा फेकता येतो. ब्रिटिश ६ इंची हाविझर तोफेंतून तर ६१ शेर वजनाचा गोळा ४ मैल अंतरावर फेकता येतो. अमेरिके- पाशींही अशा तोफा आहेत.

तिसरा प्रकार मॉर्टर तोफांचा. या तोफा लहान असतात. तथापि या गाडी- वर घालतां येत नाहींत. या तोफेचे गोळे जमिनीशीं समांतर व सरळ जातात मोर्चे बांधून बसलेल्या शत्रूवर मारा करण्याचे कामीं यांचा चांगला उपयोग होतो. अमेरिकेपाशीं या प्रकारच्या तोफा आहेत. त्या ३॥ इंची असून तिचें वजन १२२॥ शेर आहे. जर्मनीपाशीं ८॥ इंची मॉर्टर तोफा आहेत. असें ह्मणतात कीं हिच्याहून मोठी अशी लढाऊ मॉर्टर तोफ कोणत्याही राष्ट्रापाशीं नाहीं. ही तोफ जमविण्याला ४ तास लागतात. हिच्यांतून १२९ शेर वजनाचा गोळा उडवितां येतो. सडक चांगली असली तर या तोफा गाडीवर घालून नेतां येतात. अशा चार तोफांची मिळून एक ब्याटरी होते. या तोफा लढाईंत व वेढ्याचे वेळीं ही काम देतात. या तोफांनीं प्रथम शत्रूच्या सरहद्दी वरचे किल्ले फोडून व तशा प्रकारचे दुसरे अडथळे दूर करून शत्रूच्या मुलुखांत प्रवेश करतां येतो. या तोफा जड असतात यामुळें जेथून मागें हटण्याचा प्रसंग येणार नाहीं अशाच जागीं या नेण्यात येतात.

या शिवाय वेढ्याच्या वेळीं उपयोगीं पडणाऱ्या अशा काहीं तोफा असतात. या फारच मोठ्या व जड असतात. या तोफा पाठवावयाच्या झाल्या तर त्याचे सगळे भाग निरनिराळे करून पाठवितात. अर्थातच हे भाग पुनः जुळविण्यांत पुष्कळ वेळ खर्च करावा लागतो. ज्या किल्ल्यांना कित्येक महिनेपर्यंत वेढा घालून बसावें लागतें तेथेंच अशा तोफा नेतात. सेबस्त पूलच्या वेढ्याचेवेळीं एका इंजिनियरानें ३६ इंची तोफ बनविली होती. पण येवढें अजस्त्र प्रकरण तेथें नेतां आलें नाहीं. पोर्ट आर्थरच्या वेढ्याचे वेळीं जपाननें अशा मोठाल्या तोफा न नेतां ११ इंची हाविझर तोफेकडूनच काम घेतलें होते. ब्रिटिश राष्ट्राजवळ ६ इंची व ९॥ इंची वेढ्याच्या तोफा आहेत. या तोफा फार जड असल्यामुळें नेण्या आणण्यास फार अडचणीच्या असतात. अशा ४ पासून ६ तोफांची एक कंपनी होते. तिच्या वरल्या मुख्य अधिकाऱ्यास मेजर हा हुद्दा अस- तो. तीन कंपन्यां मिळून एक ब्रिगेड होते, व तिच्यावर लेफ्टेनंट कर्नल मुख्य असतो. दोन किंवा अधिक ब्रिगेडी मिळून एक डिव्हिजन होते व तिच्यावर मुख्य अधिकारी कर्नल किंवा ब्रिगेडियर असतो.

---

## महायुद्धें व मनुष्यहानि.

सध्याचें युद्ध आजपर्यंत जगाच्या इति- हासांत झालेल्या सर्व युद्धांहून अधिक महत्वाचें आहे याला एक प्रमाण सांप्रत होत असलेली मनुष्यहानि हें आहे. आजपर्यंत झालेल्या महायुद्धांत फ्रांको-जर्मन हें युद्ध फार मोठें झालें. त्यांत ८३३०००, प्राणाची हानि झाली होती. क्रिमियन यु- द्धांत ७८५०००, अमेरिकन सिव्हिल वॉ- रमध्यें ८०००००, बाल्कन युद्धांत ३४८०००, व रुसो-जपानी युद्धांत ४८५००० इतकी प्राणहानि झाली. स- ध्याच्या युद्धानें या सगळ्या महायुद्धांना मागें टाकलें आहे. असें सांगतात कीं या युद्धांत एकट्या बेल्जयमचीच प्राणहानि घेतली तरी ती वरच्या कोणत्याही युद्धाच्या जवळ जवळ येईल. आस्ट्रियाचें नुकसान तर बेल्जयमहूनही मोठें झालें आहे. अजून युद्ध चाललेंच आहे.

---

## लढाई

लढाई, लढाई, लढाई, सध्या लढाई शिवाय दुसरा विषय नाहीं. या लढाईनें सामाजिक, धार्मिक, औद्योगिक वगैरे सर्व चळवळींना मारून टाकिलें आहे. वर्तमान पत्रें घ्या, मासिक पुस्तकें घ्या, कुशांतले परसूरामघळे संवाद घ्या, लढाई शिवाय दुसरें कांहीं ऐकावयाला येत नाहीं. प्रत्येक जण वर्तमानपत्रांतल्या बातम्यावाचून जणूं काय आपण मोठे लष्करी सेनापति आहों अशी कल्पना करतो, आणि प्रस्तुत यु- द्धाची पत्रिका वर्तविण्याचें सामर्थ्य अंगीं असल्याचा आव आणीत असतो. भविष्य- वाद्यांचें तर सध्याच्याकाळीं पेव फुटलें आहे. लढाईच्या जागेपासून पांच हजार मैल दूर असलेल्या आमच्या देशाची ही स्थिति ! मग खुद्द इंग्लंड, फ्रान्स, किंवा जर्मनीमध्यें काय स्थिति असेल त्याची कल्पनाच केली पाहिजे. स्टेटसमन् पत्राच्या बातमीदारानें लिहिलें आहे कीं विलायतेंतलीं काठीचा घोडा करून खेळणारीं लहान मुलें सुद्धां टिनच्या पत्र्याच्या तोफा आणि बाबुच्या पोकळ बंदुका करून रस्त्यानें येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना जर्मन समजून त्यांवेवर नेम धरतात. रंगीत कागदाच्या टोप्या घातलेले लष्करी बालसेनापति गल्लो- गल्लीं आपापली बालसेना उभी करून तिला खड्या सुरानें क्विक मार्च, हॉल्ट, इ० हुकुम देतांना दृष्टीस पडतात. कोणी परदेशी मनुष्य दिसला कीं हा जर्मनीचा गुप्तदूत नसेलना ह्मणून संशय घेण्यांत येतो, आणि त्याच्या हालचालींवर पोलीसची नजर असते. जर्मनीचा द्वेष इंग्लंडच्या लोकांच्या मनामध्यें इतका बाणला गेला आहे कीं जर्मनचा माल काय, पण जर्मन चिता- ऱ्यांची चित्रें, व जर्मन गवय्यांचीं गाणीं सुद्धां इंग्रज लोकांना आवडेनाशीं झालीं आहेत. जर्मनीमध्यें इंग्लंडविषयीं तितकाच तिरस्कार आहे. खुद्द जर्मन बादशहानें आपणास मिळालेल्या इंग्रजी सन्मानाच्या पदव्या टाकून दिल्या आहेत. रशियन लोकांनीं आपल्या राजधानीच्या सेंटपीटर्स- बर्ग नांवांत बर्ग हा जर्मन शब्द येतो ह्मणून तें नांव बदलून पेट्रोग्राड असें नांव ठेविलें आहे. आजपर्यंत प्यारिस हें बायकांच्या फ्याशनचें केंद्र होतें. तें आतां बदलून जर्मनीनें बर्लिन हें केंद्र केलें आहे. ज- र्मन मालाला फ्रान्स, इंग्लंड व रशिया या देशातून कायमचें हाकून लावण्याचे प्रयत्न चालले आहेत. हे सगळे चालू यु- द्धाचे परिणाम दोन महिन्याच्या आंत दिसूं लागले आहेत. पण युद्धाच्या प्रत्यक्ष निकालाचा काल अजून पुढें पुढेंच ढकलला जात आहे. गेल्या आठवड्यांत एमडेनच्या

ण्या पोरखेळाविषयींच्या गोष्टींनीं वर्तमानपत्राचे रकाने भरण्यापलीकडे महत्वाची अशी कांहीं बातमी आली नाहीं. एस्ने पाशीं आज कित्येक दिवसपर्यंत लढाई चालली आहे. समुद्रांत इंग्रजाचीं तीन क्रूझरें जर्मनीनें बुडविलीं. पैकीं एक जर्मनीनें खरें दाडगाईनें बुडविलें व दुसरीं दोन पहिल्या क्रूझरच्या मदतीस येण्यांत त्यावरील अधिकाऱ्याच्या हातून झालेल्या चुकीमुळें बुडालीं असें सांगण्यांत आलें आहे. अशा रीतीनें चोरून मारून इंग्रजाचें आरमारी बळ कमी करावयाचें आणि मग समुद्रांत निकराची लढाई करून इंग्रजाना हात दाखवावयाचा जर्मनीचा बेत दिसतो असें युद्धकलाविशारद लोक ह्मणत आहेत जर्मनीनें उत्तरसमुद्रांत सुरुंग घालून ठेविले आहेत तसें इंग्रजानीं का घालून ठेवूं नयेत असा प्रश्न करून कित्येक लोक इंग्रजांना पापभीरुत्वाबद्दल दूषणें देत आहेत. कॉनन डॉइल व मीटरलिंक यांसारखे साहित्यसेवक आपल्या सरस्वतीच्या प्रसादाचा ओघ युद्धाकडे वळवून त्या विषयावर आपापलीं मतें प्रकट करीत आहेत. बर्नार्ड नावाच्या जर्मन सेनापतीनें जर्मनीच्या लष्करी धोरणासंबंधानें चार वर्षांपूर्वीं प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांत दाखविल्याप्रमाणें तंतोतंत जर्मनीनें आपलें धोरण ठेविलेलें दिसतें यावरून जर्मनी आज कित्येक वर्षांपासून लढाईची संगीन तयारी करीत आला आहे असें इंग्रज लोक ह्मणत आहेत; तर जर्मनीचीं वर्तमानपत्रें जर्मनीचे बादशहा व रशियाचे झार यांच्यामधील पत्रव्यवहार व तारव्यवहार प्रसिद्ध करून जर्मनीनें शांतता राखण्यासाठीं शिकस्तीचे प्रयत्न केले असें दाखविण्याचा भगीरथ प्रयत्न करीत आहेत.

## मुलींच्या शिक्षणांत सुधारणा.

मुलींना हल्लीं मुलांसारखेंच शिक्षण देण्यांत येतें यामुळें त्या सुगृहिणी होण्याचें बाजूलाच राहून नुसत्या पुस्तकी ज्ञानाच्या निरुपयोगी पुतळ्या बनतात अशी तक्रार आज कित्येक वर्षें चालली आहे, पण सरकारी अधिकाऱ्यांचें लक्ष तिकडे जात नाहीं. पण आनंदाची गोष्ट आहे कीं बंगालचे गव्हर्नर लॉर्ड कारमायकेल यांचें तिकडे लक्ष जाऊन त्यांनीं या प्रश्नाची चौकशी करून रिपोर्ट करण्यासाठीं सर गुरुदास ब्यानर्जी, सर आशुतोष मुकरजी [ अध्यक्ष ] व महामहोपाध्याय कालीप्रसन्न भट्टाचार्य या सिवा विद्वान् व अनुभवी, पोक्त गृहस्थांची कमिटी नेमिली आहे. हिंदु मुलींच्या शिक्षणाचें धोरण कसें असावयाला पाहिजे तें हिंदूंना जसें कळेल तसें इंग्रजांना कळावयाचें नाहीं हें लक्षांत घेऊन नव्या व जुन्या दोन्ही मतांच्या हिंदु गृहस्थांची कमिटी नेमण्यांत लाट साहेबांनीं फार शहाणपणाचें व दूर दृष्टीचें धोरण ठेविलें याबद्दल त्यांची स्तुति करावी तेवढी थोडी आहे. कोणत्याही विषयाचा तपास करण्याकरितां सरकार कडून कमिटी नेमिली गेली तरी तिचे अध्यक्ष व मेंबरापैकीं बहुतेक युरोपियनांची असावयाची असें सामान्यतः सरकारचें धोरण असतें. पण ना. लार्ड कारमायकेल यांनीं तसें कांहीं एक न करतां निवळ हिंदूचीच कमिटी नेमिली आहे व हल्लींच्या मुलींच्या शिक्षणक्रमांत कोणते दोष किंवा उणीवा आहेत, लोकांना काय हवें आहे, व तें देण्यास किती खर्च वगैरे लागेल या संबंधानें रिपोर्ट करण्याविषयीं व त्याचप्रमाणें पडदानशीन बायकांसाठीं स्वतंत्र शाळा काढण्याच्या सूचनेचा विचार करून त्या सूचनेला मूर्त स्वरूप देण्याच्यासंबंधांत व्यावहारिक सूचना करण्याविषयीं कमिटीला फर्माविण्यांत आलें आहे. वस्तुतः अशा प्रकारची कमिटी नेमून मुलींच्या शिक्षणाचा नमुनेदार क्रम ठरविणें हें काम एखाद्या देशी संस्थानानें हातीं घ्यावयास पाहिजे होतें. पण तसा योग आला नाहीं. आतां ना. लार्ड कारमायकेल यांनीं नेमिलेल्या कमिटीमुळें तरी आमच्या संस्थानिकांत जागृतीचा संचार होईल अशी आह्मी आशा करतों.

## मलेरिया तापाची उत्पत्ति.

मलेरिया तापाची उत्पत्ति डास मच्छरापासून आहे व मच्छरें व डास नाहींसे केले ह्मणजे मलेरिया कमी होतो अशी शास्त्रीय व्युत्पत्ति सध्या सर्वमान्य होत आहे, तोंच या व्युत्पत्तीची निराधारता प्रतीतीस आणून देणारी एक गोष्ट मलेमेल पत्रांत प्रसिद्ध झाली आहे. हें पत्र ह्मणतें कीं मलाया द्वीपकल्पांत जो अनुभव आला आहे तो या व्युत्पत्तीच्या अगदीं उलट आहे. त्या द्वीपकल्पांत पाणथळ जमीन पुष्कळ आहे. अर्थात जमीनींत पाणी मुरल्यामुळें तेथें डास मच्छरें ही पुष्कळ आहेत. पण असें असून या पाणथळ प्रदेशापासून मलेरियाचें वास्तव्य मुळींच नाहीं, व जेथें ड्रेनेजची उत्तम व्यवस्था आहे, डासांचें नांव नाहीं, अशा कित्येक प्रदेशांत मलेरिया ताप सपाटून आहे. या पत्रानें उघडकीस आणिलेल्या गोष्टींचा तपास शास्त्रज्ञांकडून लवकर होणें अत्यंत इष्ट आहे. तो होऊन निकाल लागेपर्यंत ड्रेनेज वगैरे करण्याच्या पायीं लक्षावधि रुपयांचा खर्च करण्याची सरकारनें घाई करूं नये. नाहींतर प्लेग प्रतिबंधक उपाय ह्मणून घरें धुणें, गंधक जाळणें, वगैरे गोष्टींच्यापायीं सरकारनें पाण्यासारखा केलेला खर्च जसा फुकट गेला, व शेवटीं आमच्या वैद्यशास्त्रानें पसंत ठरविलेला स्थानत्यागाचाच उपाय उत्कृष्ट ठरला तसाप्रकार होऊन पश्चात्तापाला कारण व्हावयाचें. ह्मणून आमची अशी सूचना आहे कीं सरकारनें या गोष्टीचा तपास करण्यासाठीं शास्त्रज्ञांची एक कमिटी नेमून वादग्रस्त प्रश्नाचा निकाल शक्य तितक्या जलदीनें अगोदर लावावा.

## मंत्रोपदेश

[ खोटी भावना ]

मागील अंकावरून पुढें चालू

**अनेकपतिपद्धति** ऋग्वेद काळाचे फार पूर्वी होतीसें दिसतें. ऋग्वेदांत फक्त अश्विनी कुमारांस देवांत मिळून एकच भार्या अणि तीही स्वयंवरानें प्राप्त झालाचें आढळतें. दुसरें उदाहरण नाहीं. महाभारतांत देखील द्रौपदीचें एकच उदाहरण आहे. हीं उदाहरणें इतकीं थोडीं आहेत कीं यांवरून अनेक पतित्व पद्धति आर्यांत नव्हती असेंच सिद्ध होतें. अशरत्त्र हाही एक अभावाचाच पुरावा आहे. आतां हें खरें आहे कीं अनेक पतित्वही नव्हतें व हें स्त्रियांस स्वैराचरण ही करू देत नव्हते तरी नियोग पद्धति मात्र प्रचारांत होती. **नियोग** ह्मणजे एका पतीकरितां दुसऱ्या पुरुषानें संतती उत्पन्न करून देण्याची चाल. परंतु ह्या चालीचे वेळीं विवाह पद्धति सुरु झालेली नव्हती. स्त्रियांस बरीच मोकळीक असे. व त्या वेळीं शत्रूपासून रक्षण करण्यासाठीं पुत्रसंतानाची मोठी अवश्यकता असे. पुरुषस्वभाव संशयी व विलक्षण मत्सरी असतो हें वर आलेंच आहे. ही नैसर्गिक प्रवृत्ति लक्षांत आली ह्मणजे तो नियोगास तरी कां संमति देई हें सहज कळून येतें. त्या वेळीं वृद्धापकाळीं रक्षण कोण करील ही निपुत्रिकास मोठी चिंता असे.

पुरुषास स्वत्वाची जितकी खात्री किंवा प्रत्यय अधिक असेल तितकें त्याचें संतति प्रेम अधिक राहिल. तें जितकें अधिक असेल तितका तो प्रयत्न अधिक करील. त्याच्या प्रयत्नाचा प्रत्यक्ष लाभ प्रथमतः त्यासच मिळेल. पण त्याचे मागून तो त्याच्याच संततीस आणि पर्यायानें संपूर्ण समुदायास मिळेल. हें सर्व लक्षांत घेऊन आर्यांनीं शिथिल विवाह पद्धतीची सुधारणा सुरू केली. प्रथमतः नियोग पद्धतीसच आळा घालण्यास आरंभ केला. स्त्रीवर पतीच्या परवानगी वाचून अगर पितृमातृ तुल्य आप्तानुज्ञेवाचून नियोग करणें बंद केलें. नंतर फक्त जवळच्याच आप्तांनीच ( उदाहरणार्थ पतीच्या वडील अगर धाकट्या भावानेंच ) नियोग करावा असें ठरविलें. तो अद्यापीही कांहीं जातींत चालू आहे. पुढें नियोग अजिबात बंद केला. आपस्तंभसंहिता नियोगाच्या पूर्णपणें विरुद्ध आहे. इतर पूर्वींच्या ग्रंथांत नियोग संमत असल्यामुळें आपस्तंभातील मत फक्त ब्राह्मणांत विशेष ग्राह्य झालें. इतर जातींत तितकें जोरानें पाळलें जात नाहीं. नंतर मनुसंहितेंत मनूनें कुमारिका विधवेस आपल्या पतीच्या भावाबरोबर विवाह करण्याची अनुज्ञा दिली. पण त्यानेंही नियोग पद्धति बंद केली. व पतीच्या भ्रात्याशिवाय इतरांचा नियोग मनुनेंही बंद केला या प्रमाणें नियोगबंद होतहोत विवाह पद्धति सुरु झाली. ती येणें प्रमाणें—

या आठी प्रकारांवरून पुरुष प्रबळ होत चालला. संतति पोषणाची जबाबदारी त्यावरच आली. घराण्यांतील मुख्याच्या अधिकारास ओहोटी लागली. पुरुषांस फक्त एक पत्नीच करतां येत होती. मग तो तीस कशीही स्वीकारो एकदां स्विकारली कीं दुसरी स्वीकारतां येत नसे. हे सर्व भाग विसरतां कामा नये. एकदां विवाह झाले कीं त्यांस शास्त्रसंमति मिळे. पुरुषास विवाह केल्याशिवाय स्त्रीबरोबर राहतां येणें अशक्य झाले. विवाहीत दम्पत्यास संतति न झाल्यास नियोग करीत. ह्मणजे प्रथमतः पूर्वप्रमाणें एकत्र होणें सुरु झाले. नंतर विवाह करार अगर विवाह. नंतर नियोग. असा क्रम स्पष्ट दिसतो असे विवाह आठ प्रकारचे शास्त्रकारांनीं प्रथमतः मान्य केले.

"१" ब्रह्म "२" दैव "३" आर्ष "४" प्राजापत्य "५" असुर "६" गंधर्व "७" राक्षस आणि पिशाच असे आट प्रकारचे विवाह शास्त्रसंमत झाले. पण इतक्यांनींही स्त्रीपुरुषांचें जसें एकजीवत्व व्हावयास पाहिजे तितकें होईना. अखेर अखेर यांतील फक्त ब्रह्म व असुर अशा दोनपद्धति शिल्लक राहिल्या व हल्लीं फक्त ब्रह्मपद्धतिच सर्व देशभर अधिक प्रमाणानें विस्तृत व प्रचारांत आहे. असुर पद्धति लुप्त प्रायच आहे.

## सौरचिकित्सा

अलीकडे शास्त्रीयज्ञानाच्या वाढत्या प्रसाराबरोबर मनुष्याचें चिकित्साविषयक ज्ञान ही वाढत चाललें आहे आणि होमिओप्याथी, क्रोमोप्याथी, हायड्रोप्याथी यासारख्या नव्या नव्या चिकित्सापद्धति अस्थित्वांत येऊं लागल्या या सर्वांच्या मागून आलेली सौरचिकित्सा पद्धति ही होय. या पद्धतींत सूर्याच्या किरणांच्या साह्यानें मनुष्याचे रोग दूर करणें हें मुख्यतत्त्व आहे. ही पद्धति फ्रान्स देशांत विशेष जारी आहे. तिकडे क्षयासारखे रोग या पद्धतीनें बरे करणारे चिकित्सक पुष्कळ आहेत. इंटरस्टेट मेडिकल जर्नल नांवाच्या एका वैद्यकीय मासिकांत या पद्धतीचें साग्र विवरण आलेलें आहे. हिंदुस्थानांत सूर्यप्रकाश हवा त्या ऋतूंत मुबलक असल्यामुळें येथें या पद्धतीचे परिणाम जास्त ठळकपणें दिसून येण्याचा संभव असल्यामुळें आमच्या वाचकांना या पद्धतीची थोडीशी माहिती आज सांगावयाची आहे.

ही पद्धति प्रथम पॉसे नांवाच्या फ्रेंच शास्त्रज्ञानें शोधून काढली, व तिचा अनुभव पाहून प्रचार करण्याचें श्रेय डॉ० रोलिये यांनीं घेतलें. ही पद्धति थोडक्यांत अशी आहे -- रोग्याला ग्रीष्मऋतूंत कापसाच्या वस्त्रांनीं व थंडीच्या दिवसांत गरम लोकरी कपड्यांत लपेटून व डोक्याला टोपी, तोंडावर एक पडदा व डोळ्यांस अपाय होऊं नये ह्मणून त्यांवर झाडाचें हिरवें पान झांकण घालून किंवा हिरव्या रंगाचा चष्मा घालून उन्हांत बसवावयाचें. विशेषतः क्षयरोगी या पद्धतीनें फार लवकर बरे होतात असें अनुभवास आलें आहे. पहिल्या दिवशीं रोग्याचे तळपाय उघडे ठेवून त्यांस सूर्याचे किरण चांगले लागूं द्यावयाचे. दुसरे दिवशीं सगळे पाय, तिसरे दिवशीं गुडघ्यापर्यंतचा भाग, चवथे दिवशीं पोटाचा खालचा भाग, पांचवे दिवशीं छाती, सहाव्या व सातव्या दिवशीं मान व मस्तक अशीं क्रमाक्रमानें उन्हांत उघडी ठेवावयाचीं असतात. याच्या योगानें उन्ह व थंडी सहन करण्याची मनुष्याच्या अंगची शक्ति आश्चर्यकारक रीतीनें झपाट्यानें वाढते. सूर्याचे किरण रोगजंतूंचा नाश करणारे आहेत ही गोष्ट आतां शास्त्रज्ञांस मान्य झाली आहे. डोंगराळ मुलुखांत हीं सौर-

कि विशेष दिसून येते. ह्मणून या तीनें क्षयरोगी बरें करणें झालें तर ल्पस पर्वतासारख्या ठिकाणीं मुद्दाम तात. कॅनी नांवाच्या बेटांत सीव्हीझ स्पिटल ह्मणून जो दवाखाना आहे या चिकित्सापद्धतीनें शेकडों यांना गुण आलेला पाहून न्ययार्कच्या कांनीं दुसरें असें एक इस्पिताळ बांधासाठीं समुद्र सपाटीपासून हजार फूट वीवर असलेली एक जागा विकत घेतली हे, व इस्पितळ बांधण्यासाठीं ७५ लक्ष पये वर्गणी गोळा केली आहे. या इस्पिळांत एकावेळीं एक हजार रोग्यांची सोय रणार आहेत. ही पद्धति कांहीं नवी नाहीं. आमच्या खेड्यापाड्यांतले विशेषतः अशिक्षित व दरिद्री कुणब्यांचीं मुलें उघडीं न्हांतून हिंडतात फिरतात. त्यांचें कधीं ख दुखत नाहीं. पण तेच युरोपियन लोकांच्या अनुकरणानें सगळा देह कपड्यानें आच्छादून नेकटाय कॉलर हॅट गैरेनीं विभूषित होणारी आमची नवी मंडळी डाक्तरांचें कायमचें गिऱ्हाईक होऊन बसतें यांतलें मर्म काय तें पाहिलें तर याच्या मुळाशीं सौर चिकित्सापद्धतीचें तत्त्व आहे हें दिसून येईल. पाश्चात्य शास्त्रज्ञांनीं प्रथम या पद्धतीचा उपहास केला, पण आतां त्यांना तिचें महत्त्व कळूं लागलें आहे. या पद्धतीला विशेषसा खर्च लागत नसल्यामुळें हिंदुस्थानासारख्या गरीब देशाला हीच पद्धति विशेष सोयीची वाटेल. अनुभव घेणारे हुशार, धाडसी, व कल्पक अशा डाक्तरांनीं मात्र पुढें झालें पाहिजे.

## मनुष्य कीं राक्षस?

जर्मन लोकांच्या अत्याचारासंबधानें गोष्टी ऐकतां ऐकतां कान किटले. आतां त्याच कानानें जर्मन भूतदयेच्याही गोष्टी ऐकण्यास मिळूं लागल्याचें पाहून' अहो! आश्चर्य' असें उद्गार कोणाचे तोंडून निघणार नाहींत? एमडेन क्रूझरनें बंगालच्या उपसागरांत व मद्रास पाशीं आपल्या चेष्टांचा मासला सहज जातां जातां दाखविला, पण त्याबरोबर त्यांनीं आपलें भूतदया प्रेरित अंतःकरणही उघडें केलें असें पकडले गेलेले खलाशीच कबूल करीत आहेत! तिकडे युरोपांत लुव्हेन, मेलीन्स टेरमांड, वगैरे शहरें जाळून चित्ताचें समाधान होईना ह्मणून ज्या जर्मन लोकांनीं ऱ्हीम्स येथील प्रार्थनामंदिरावर आपला तोफांचा भाडिमार करून त्याला जाळलें, त्यांना बंगालच्या उपसागरांतच भूतदयेचा पान्हा कसा फुटला याचें प्रत्येकाला आश्चर्य वाटत आहे. वीरांचीं अंतःकरणें 'वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि' अशी कवीची उक्ति आहे. ती खरी नसेलना? ऱ्हीम्स येथलि धर्म मंदिराच्या नाशाविषयीं जी ओरडचालली आहे तींतही एक गोष्ट फार विचार करण्यासारखी आहे. ती ही कीं ही ओरड धर्ममंदिर नष्ट केल्याबद्दल नसून एक अप्रतिम कलामंदिर नष्ट केल्याबद्दल आहे. ह्मणजे धर्ममंदिरासंबंधानें अत्याचार केल्याबद्दल युरोपला दुःख वाटत नसून कलेचा विध्वंस केल्याबद्दल तें वाटत आहे. यावरून धर्मश्रद्धेनें युरोपांतून प्रयाण केलें असून तिची जागा कलेविषयींच्या श्रद्धेनें पटकाविली आहे असें दिसतें.

## तहाविषयींच्या वदंता

अमेरिकेतून अशी बातमी आली कीं जर्मनीचें स्वातंत्र्य नष्ट न होतां किंवा त्याच्या अब्रूला धक्का न पोंचतां तह होणें शक्य असेल तर जर्मन बादशहा लढाईत बरोबरी झाली असें समजून तह करण्यास तयार आहे. ही बातमी वाचल्यापासून पुष्कळ लोक शांततेचीं सुख स्वप्नें पाहूं लागले आहेत. पण तूर्त तरी त्यांना स्वप्नापेक्षां अधिक किंमत देतां येत नाहीं. आह्माला तर असें वाटतें कीं तह झालाच तर तो निदान समुद्रांतलें युद्ध होऊन तेथें ब्रिटिश राष्ट्राची सरशी झाल्याशिवाय होणार नाहीं, व होईल तेव्हां तो अकस्मात होईल. लढाई जशी अकस्मात सुरू झाली तसा तहही अकस्मात् होईल, व त्यांत जर्मनीला पुनः मान वर करतां येणार नाहीं अशा अटींचा होईल. सर्पाला नुसतें डवचून मोकळा सोडणें हें धोक्याचें असतें ही गोष्ट ब्रिटिश मुत्सद्दी पूर्णपणें जाणून आहेत शिवाय रशिया, फ्रान्स, बेल्जम, जपान, व ब्रिटन यांनीं जर्मनी व आस्ट्रिया यांच्याशीं अलग अलग तह न करतां सर्वांच्या विचारानें एक तह करण्याचे ठरविलें असल्यामुळें कोणत्याही लालचीला वश होऊन यापैकीं कोणत्याही राष्ट्राला जर्मनीशीं सख्य करतां यावयाचें नाहीं, व सर्वांनीं मिळून तह करावयाचें ठरलें तर इतक्या राष्ट्रांची नुकसानीची भरपाई करतां करतां जर्मनीच्या नाकीं नव येतील. सारांश, तहाचा संभव तूर्त तरी स्वप्नसृष्टींतच असला तर असेल, वस्तुसृष्टींत नाहीं असें ह्मणणें भाग आहे.

## आंटवर्पवर भडिमार

रशियानें पूर्व प्रशियामध्यें संपादलेल्या विजयामुळें जर्मनीच्या बादशहाला पश्चिमेपेक्षां पूर्वेकडचीच काळजी विशेष वाटूं लागली आहे. तथापि पश्चिमेकडची युद्धाची गडबड अद्याप जोरांत आहे. जर्मनीनें आंटवर्पवर चाल करून जाऊन तेथील किल्ल्यावर तोफांचा भडिमार सुरू केला आहे. आंटवर्प हें बेल्जमचें एक प्रमुख शहर असल्यामुळें त्याच्या रक्षणार्थ ते लोक शिकस्तीचे प्रयत्न करीत आहेत असें कळतें. बेल्ज्यन लोकांनीं आपल्या शौर्याचा मासला जगाला दाखवून जपानी लोकांप्रमाणें सर्वांकडून वाहवा मिळविली आहे त्यांनीं जोराचा प्रतिकार केल्याबरोबर जर्मन तोफखान्याचे स्क्रू ढिले पडले आहेत. हें पाहून बेल्ज्यन लोकांनीं आतां जर्मनीच्या रेलवेचा नाश करण्याचें आरंभिलें आहे. जर्मनी जिवावर उदार होऊन लढत आहे. त्याला आतां 'हतोवा प्राप्स्यसि स्वर्गम्' येवढाच तरणोपाय दिसत आहे. जर्मनीच्या बादशहाची जन्मकुंडली मांडून एका युरोपियन ज्योतिषानें असें भविष्य वर्तविलें आहे कीं यंदाचे वर्षीत जर्मनीची सत्ता तर नष्ट होणारच, पण आपल्या महत्त्वाकांक्षेच्या पायीं आपल्या सगळ्या राष्ट्राचा नाश झालेला पाहून कैसरच्या हृदयाला जबर धक्का बसून तोही गतप्राण होईल अशी त्याच्या ग्रहांची दशा आहे.

## एमडेन क्रूझरचे नव खेळ.

बंगालच्या उपसागरांत प्रथम चार बोटी बुडविल्यानंतर रंगून व मद्रास येथील लोकांना आपल्या विनाशक प्रवृत्तीचा मासला दाखविणारें एमडेन नांवाचें जर्मन क्रूझर अजूनही नवे नवे खेळ खेळत आहे. त्यानें कोलंबोपाशीं आणखी चार बोटी बुडविल्याची व पकडल्याची खबर कोलंबोहून आली आहे व ती खरी आहे असें सरकारी रीतीनेंही प्रसिद्ध झाल्याचें, ऐकून या क्रूझर संबंधानें लोकांच्या मनांत भीती उत्पन्न होणें स्वाभाविक आहे. एक जपानी क्रूझर व दोन ब्रिटिश बोटी त्याचा पाठलाग करण्यासाठीं निघाल्या आहेत अशी मध्यंतरी बातमी प्रसिद्ध झाली होती. ठिक ठिकाणीं एमडेननें जी नासाडी केली तिच्यावरून त्या क्रूझरचा माग काढण्याचें काम कठीण नव्हतें. असें असतां अजून एमडेन जपानी क्रूझरच्या तावडींत न सापडतां आणखी चेष्टा व नुकसानी करण्यास मोकळें राहिलें हें आश्चर्य आहे. पाठलाग करणाऱ्या क्रूझरांची व बोटींची कांहींच बातमी येऊं नये व ऐमडननें मात्र आपला प्रत्येक मुक्काम अशा रीतीनें जगजाहिर करीत मार्ग आक्रमण करावा हें कांहींसें चित्ताला अस्वास्थ्य उत्पन्न करणारें ही आहे. पूर्व किनाऱ्यावर अशा रीतीनें धुमाकूळ घालणारें हें क्रूझर पश्चिम किनाऱ्याकडे आतां वळतें कीं काय अशीही भीती उत्पन्न झाल्यास नवल नाहीं. मुंबईला कडेकोट बंदोबस्त आहे व मुंबईपर्यंत येण्याची एमडेनची छाती होणार नाहीं ही गोष्ट खरी; पण मलबार, व दक्षिण कोंकण यांतील प्रदेशांतल्या लोकाना व त्या किनाऱ्यानें नेआण करणाऱ्या बोटींना आपल्या सुरक्षितपणाविषयीं काळजी वाटण्यासारखी परिस्थिति एमडेननें निर्माण करून ठेविली आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

## कापसाचा हंगाम

(मुंबई बॅंकेची उपयुक्त सूचना)

कापूस चांगला पिकूनही लढाईमुळें गिऱ्हाईक नसल्यानें स्वामालाची बाजारांत किंमत अगदींच अल्पस्वल्प येईल. रा. रा. डेवर सा. डे. क. यांनीं पूर्वीच सुचवून ठेविलें आहे कीं लढाई संपेपर्यंत शक्य तितक्या रीतीनें कापूस साठविण्याची तजवीज लोकांनीं करावी. सध्यां लढाईचा रंग लवकर बंद होण्याचा दिसत नाहीं. आणि कापूस खरेदी करणारे युरोपियन व्यापारी आपला आमला तोडून टाकीत चालले आहेत. आणि जीन व प्रेस हे कारखानेही त्या मानानें बंद पडण्याचा मोठा संभव आहे अर्थात मजुरदार लोकांची त्याबरोबर दैना होईल. अशा वेळीं मुंबई ब्यांकेनें अशी योजना मनांत आणिली आहे कीं लोकांनीं जर रुईचे गठ्ठे बांधून त्यांच्या ताब्यांत दिले तर त्यांवर शेतकरी लोकास पैसा देण्यास ब्यांक तयार आहे. या योजनेनें खरेदीदार जरी भेटले नाहींत तरी जिनाचे व प्रेसाचे कारखाने थोडेबहुत चालतील व लोकांनाही ब्यांकेकडून मिळणाऱ्या आगाऊ रकमांनीं हातपाय हालविण्यास बरीच सोडवणूक होईल. या ब्यांकेचे योजनेबद्दल आह्मीं मुंबई बॅंकेची तारीफ करितों.

## वऱ्हाडवृत्त

**हवामानः—** हस्ताचा पाऊस आता नको आहे. वर्षाकालाच्या अखेरीचा हा संधीकाल असून हिवाळ्याला प्रारंभ झाल्याचीं चिन्हें दिसत आहेत. हस्ताचा दगडफोड पाऊस थोडा बहुत झाला आहे तो पुरे आहे. सार्वजनिक आरोग्य उत्तम आहे. पिकाची अवादानीतर डोळ्यांना अत्यंत संतोषवीत आहे.

रा. रा. इ. जे. सालोमन साहेब मुनसफ आकोला याची बदली मलकापुर कोर्टावर झाली असून येथें रा. रा. सप्रे एल. एल. बी. नवीन गृहस्थ मुनसफांवर आले आहेत.

मुर्तिजापूर- इलिचपूर दरम्यान १ गाडी जात येत असे तिच्या ऐवजीं आता २ गाड्या जाणाऱ्या येणाऱ्या झाल्यापासून लोकांची विशेष सोय झाली आहे.

ता० १ नवंबरपासून मुर्तिजापूर--कारंजा रेलवे सुरू होईल.

या जिल्ह्यांतील रेकार्ड आफ राइटचें जसजसे काम पुरे होत चाललें आहे, तसतसे त्याचे फेरफार नोंदण्याचें कामही सुरू होत आहे. मुर्तिजापुर, आकोला, बाळापूर, आकोट व मंगरूळ या तालुक्यातील फेरफाराचें काम ता० १९ आक्टोबर रोजीं सुरू होईल.

विलायतेहून आमचे एक स्नेही ता. ११ सप्टंबरच्या पत्रांत लिहितात कीं "हिंदी सैन्य येथें साम्राज्याच्या संरक्षणार्थ लढण्यास येणार ह्मणून हिंदुस्थानबद्दल व तेथील लोकांबद्दल साप्रत येथें लोकांना मोठा अभिमान व कौतुक वाटत आहे. सिनेमाटोग्राफवरील हिंदी सैन्याला प्रेक्षक जन टाळ्याच्या गजरानें सत्कारितात." लढाईचा हा अदृश्य लाभ होय.

## NOTICE

A combined post of Secretary and Sanetary Inspector of the Akot Municipal committee on a salary of Rs. 60. rising to Rs. 130 with cycle allowance Rs. 7. As. 8. has fallen vacant.

Candidates should send in their applications to the undersigned on or before the 31st. of October 1914.

The candidates must have qualifications as below:—

(1) The candidate must have passed the matriculation Examination or N. S. F. Examination of any Indian University.

(2) That they should possess a certificate of having passed an Examination qualifying for Sub Overseer's post.

(3) That they must have a certificate of physical fitness from the civil Surgeon of the District in which he resides.

(4) That he must be over 22 years of age.

The candidate approved will be required to undergo training as sanitary Inspector in Bombay.

Sd/ G. K. Agarwale
chairman
Municipal committee
No No 422 Akot

### इंपीरियल इंडियन रिलीफ फंडा.ी तारीख २१ सप्टेंबर पावेतों जमलेली वर्गणी.

| नांव. | पत्ता. | रक्कम. रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|---|
| पूर्वीची जमा असलेली रकम. | | ९४७६९ | ३ | ६ |
| मि. टी. बी. ग्रीन, सुपरींटेंडंट गव्हर्नमेंट प्रेस व स्टाफ. | नागपूर | २७७ | १४ | ० |
| सेक्रेटरी डिस्ट्रिक्ट कमिटी. I. I. R. F. | छिंदवाडा | ५०० | ० | ० |
| ” ” ” ” | अकोला | ४०४ | ३ | ० |
| राजा बहादूर राघोजीराव भोंसले | नागपूर | १००० | ० | ० |
| मि. सी. ई. डब्ल्यू. जोन्स एम. ए. | ” | १०० | ० | ० |
| सेक्रेटरी डिस्ट्रिक्ट कमिटी I. I. R. F. | दुर्ग | २९४९ | ० | ० |
| ” ” ” ” | चांदा | ९४९ | ८ | ० |
| ” ” ” ” | मंडला | ३३७ | ० | ० |
| ” ” ” ” | बुलढाणा | ११७ | ० | ० |
| ” ” ” ” | ” | २३८७ | १३ | ६ |
| ” ” ” ” | जबलपूर | ११९९ | १४ | ० |
| मि. बैरामजी पेस्टनजी [महाराष्ट्र डॉमेस्टिक कंपनीच्या तिकीटा विकून आलेले पैसे] | नागपूर | ६६७ | ८ | ० |
| ऑ. सेक्रेटरी. डिस्ट्रिक्ट कमिटी I. I. R. F. | सागर | ११६९ | ० | ० |
| शंभराचे खालचे | | ६६ | ० | ० |
| | एकूण | १६०८६ | ० | ० |

## जाहिरात.

सर्वत्र शेट सावकार व असामी पातुर शेख बाबू व इतर ठिकाणचे साहू सावकार व इतर लोकांसः—

या जाहिरातीनें जाहीर करितों कीं मी माझे मुलगे नामें सखाराम व बाळकृष्ण वल्लद भवानी सोनार यांस तारीख ४।४।१९१२ इ. रोजीं कुलमुखत्यारपत्र दिलें होतें तें दोन महिने झाले समक्ष बोलावून रद्द केलें आहे. तर आतां त्यांचे उभयतांचेबरोबर कोणताही कोणी व्यवहार केल्यास मी अगर माझी इस्टेट जबाबदार राहणार नाहीं. ही जाहीरात दिली सही ता. सही

भवानसा लक्ष्मणसा सोनार द. खु.

नो. नं. ४१८

## नोटीस

सखाराम व बाळकृष्ण वल्लद भवानी सोनार राहणार पातुर शेखबाबू ता० बाळापूर जि० आकोला यांसः—

मी खालीं सही करणार नोटीस देतों कीं मी तुह्मां दोघांस ता. ४।४।१२ इ. रोजीं कुलमुखत्यारपत्र दिलें होतें. तें आज दोन महिने झाले तुह्मांस समक्ष सांगून रद्द केलें आहे व या नोटीशीनेंही जाहीर करितों कीं आतां तुह्मी मजतर्फे काहीं काम वगैरे करू नये. केल्यास मी अगर माझी जिनगी जबाबदार नाहीं. तुमचें कुलमुखत्यारपत्र रद्द केलें आहे ही नोटीस दिली सही

भवानसा लक्ष्मणसा सोनार द० खु०

नो. नं. ४१७

## नोटीस

नोटीस बेशमी पिरथम व. सखाराम पाटील रहाणार मौजे पार्डी तर्फ खेर्साग तालुके व जिल्हा आकोला यांस—खालीं सहीकरणार याजकडुन नोटीस देण्यांत येते कीं तुह्मीं ता.२६।६।१४ रोजीं रुपये १९६ घेउन. प्रामेसरी नोट करून दिली ते रुपये मी तुह्मांस आज २ महिन्यापासून मागत असतां तुह्मी आज देतों उद्या देतों ह्मणून थापादेता करितां. तुह्मांस मुद्दाम या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं. तुह्मी नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचें आत रुपये १९६ व त्याचे दोन रुपये शेकड्या प्रमाणें झालेलें. व्याज व नोटीसीचा खर्च वगैरे सर्व चुकते करावे तसें न केल्यास रितीप्रमाणें फिर्याद दाखल केली जाईल कळावें तारीख. २९।९।१४ इ. द. बळवंत हिरामण

सही.

जयसींग व. रावजी काकड द खु.

नो. नं. ४१४

## नोटीस

धी अकोला सेंट्रल बँक लिमिटेडचे, शेअर होल्डर यांस कळविण्यांत येतें कीं सन १९१२—१३ व १९१३—१४ ह्या दोन सालासाठीं नफा वाटावयाचा आहे तरी ज्या शेअर होल्डरांचे पत्ते बदलले असतील त्यांनी आपला नवीन पत्ता कळवावा तसेंच जे शेअर होल्डर मयत झाले असतील त्यांच्या वारसांनी आपलें नांव पूर्ण पत्ता व वारस सर्टिफिकिटें बँकेकडे पाठवून द्यावीं. R. V. Mahajani

सेक्रेटरी

धी अकोला सेंट्रल बँक लि०

नो. नं. ४१९ तारीख ३०-९-१९१४

### एक विवाहेच्छु कृष्णपक्षी ह्मणजे विदुर (मिश्रजातीय)

### एक वर व एक वधु पाहिजे.

माझी मुलगी १०।११ वर्षांची गृहकार्य कुशल, सुस्वरूप, गौरवर्ण, साधारण मराठी वाचणारी लग्नाची आहे व एक मुलगा १२।१३ वर्षांचा इंग्रजी साधारण जाणणारा हल्लीं रेल्वेंत फोरमनचें काम करितो हा लग्नाचा आहे. लग्नें या वर्षांत व्हावींत. तर वरानें व वधुनें अथवा त्यांच्या पालकांनीं सर्व खुलासेवार पत्रव्यवहार मजकडे करावा विशेष लागणारी माहिती देण्यांत येईल व ईश्वरसंकेतानुरूप होईल.

पत्ताः — गोविंद रामचंद्र जोशी स्टेशनमास्तर बंगाल नागपूर रेल्वे रंगाली

नो. नं. ४०३

# सेंटचा राजा

### वापरून तर पहा !!

# ओटो सुगंधीचा भांडार दिलचमन

(रजिस्टर्ड)

आजपर्यंत बाजारांमध्यें निघालेल्या सर्व सेंट, अत्तर, यापेक्षां हे ओटो दिलचमन जास्त टिकाऊ मधुर आणि अधिक खुसबोदार आहे अशी आह्मी पुरी खात्री देतों. जर तुह्मी ओटो दील-चमन वापरला नसेल तर, एक वेळ वापरून खातरी करून घ्या. व ह्यांत स्पीरीट बिलकूल नाहीं, चमेली आणि बटमोगरांच्या ताज्या फुलांच्या अर्कापासून तयार केलेला आहे. फक्त २, ३ थेंब रुमालावर किंवा वस्त्रावर टाकल्यानें एकदम अनेक सुंगधाचा भांडार प्रस्तृत् होऊन तुमच्या आसपासच्या सर्व लोकांच्या मनास आनंद होईल.

| | |
|---|---|
| किंमत -॥- ड्रामची टयुब ८ आणे | किंमत -॥- औंसाची बाटली २ रुपये. |
| ” १ ” ” १२ आणे | व्ही. पी. पो. खर्च वेगळा, |

**ओटो दीलचमनची सुगंधी कार्डें दर डझनास १२ आणे,**
**सेंटच्या नमुन्यासाठीं दोन आण्याची टिकीटें पाठवा.**


सेंट, ओटो किंवा सुगंधी कार्डें खरेदी करतेवेळीं ओटो दीलचमन हें नांव बरोबर वाचून पहावें. जर तुमच्या जवळच्या दुकानदाराकडे मिळत नसेल तर, खालील पत्त्यावर लिहून माल मागवावे.

एकटे एजंटस् **एच्. आर. मोदी आणि कं.**

तारेचा पत्ता सेकेरीन ” मुंबई. } नो नं. ३२९ विलायती औषधें व परफ्युमरीचे व्यापारी प्रिन्सेस स्ट्रीट, मार्केटसमोर मुंबई.

नो. नं. ३०१

सतत ५० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला
दूषित रक्त शुद्ध करणारा




शरीराचा पंचप्राण ह्मणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नाना तऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळें व तदनुषंगिक होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच सार्सापरिला देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु.१। टपालखर्च -।- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नक्कल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

**मालक--** डा. गौतमराव केशव, आणि सन्स्
ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई. नंबर २.

नो० नं० १११

**वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.**

नामर्दास मर्द बनविणारी

**राजवंशी नवरत्न याकुती,**

किंमत रु० १० देड मार्क " सँडो "

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

**राजवंशी सांड्याचें तेल,**

किंमत रुपये ९ देड मार्क " सँडो "

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे. सरकारचे अंमलदार, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

**परमा सायरप.**

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध. एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,

खबुतरखाना भुलेश्वर मुंबई.

नो० नं० १९



# Oriental Government Security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.

THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

## FUNDS 4½ CRORES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

## Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|---|
| | | Rs. |
| 1888 | 8,668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17,657 | 4,68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6,81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8,47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 64,097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11,48,6 42 | 36 38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80 05,818 |
| 1898 | 31,36,422 | 1,41,32356 |
| 1903 | 41,07,009 | 2,10,95,947 |
| 1908 | 53,55,639 | 3,22,79,991 |
| 1913 | 69,44,548 | 4,41,61,889 |

## RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made upon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

"At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently look forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essential in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL

Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

**M. deSOUZA,**

CHIEF AGENT,

C. P. Berar & Khandesh, NagPUr

N. No. 13



शेंकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

# सरदी कॉलरा संग्रहणी पोटदुखी

उलटी, झाडा, संधिवात, फेंपरें, प्लेगची गांठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण, प्लेग, विंचवाचे दंश वगैरेवर अत्यंत गुणकारी.

## जव्हेरियनचें जीवनामिक्श्चर



हजारों लोकांचें प्राण वांचले आहेत. विश्वास ठेवून वापरा. मोठी शि. रु. १॥ लहान शि. ८१२


वी. एच. जव्हेरियन कंपनी,

खलासीचकला, मुंबई.

नो० नं० ३३७



# घड्याळ फुकट मिळेल



( आमके आम और गुठलियोंके दाम )

गजकर्णाचे [ दाद ] रामबाण मलम किं. ४ आणे दराची १२ शीशी ३ तीन रुपयांची घेणारास टाईमपीस घड्याळ फुकट मिळेल. २४ शिशी एकदम घेणारास खिशांतील [ जेब ] घड्याळ फुकट मिळेल. औषध विकून घड्याळ फुकट वापरा.

आमचे कारखान्यांत, सर्व प्रकारचीं पुस्तकें, औषधें, घड्याळा वाचेस, सुगंधी सामान, तेलें, अत्तरें वगैरे योग्य किंमतीनें मिळतात. आमचा मोठा क्याटलाग फुकट मागवा. तसेंच आपण आपल्या व आसपासचे गांवातील लिहीणदार माणसाचीं ५० पन्नास नांवें पूर्ण पत्त्यासह लिहून कळविल्यास मनोरंजक पुस्तकें पाठवू.

१ टेबलावर ठेवण्याचें टाईमपीस घड्याळ १॥ रु.

२ रास्कोप सीटिम [ खिशांतील घड्याळ २ रु.

पत्ता जयचंद्र कंपनी ( वर्धा सी. पी. )

नो. नं. ३३८



साताऱ्याचे प्रसिद्ध कोल्हटकर राजवैद्यकृत

# कस्तुरीच्या गोळ्या

यापासून अपस्मार वायू-ज्यांस बाचप्रद फीट्स [ हिस्टेरिया ] फेंपरें मिरगी, वतारणें, आंकडी धुरे ह्मणतात तो आजार, लहान मुलें व मोठीं माणसें यांचा नवा जुना आजार खात्रीनें बरा होतो. तसेंच बहुतेक सर्व ज्वर अर्धांग वगैरे वायु बरे होतात. १ रुपया पासून वर कितीही किंमतीच्या गोळ्यांच्या बाटल्या माहितीचे कागदासह विकत मिळतात. रोखीनें अगर व्ही. पी. नें मागवा. विशेष माहिती समक्ष अगर पत्रद्वारें. याशिवाय बहुत प्रकारच्या मात्रा, गोळ्या, भस्में, आंसवे, वातहारक तेलें विकत मिळतात.

सखाराम अप्पाजी कोल्हटकर वैद्य,

ठाकुरद्वार रोड हरकुंवरबाई नवी चाळ, मुंबई नं० २

नो० नं० ३३६


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४८ ] आकोला--सोमवार तारीख १२ माहे आक्टोबर सन १९१४ ई० [ अंक ४०


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.

हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } J. G. Ridland.
आकोला ९।९।०९ } एजंट

नो. नं ४

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २१$\frac{3}{4}$ तोळे असतें.

मुंबई बँक } J. G. Ridland.
आकोला २१-९-१० } एजंट

नं० नं० ९

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व वाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.

नो. नं. २९

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० ग्रेग्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चैाकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही.पी.नें रु० १०६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत

पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी

नो. नं. ६

### अनुभवून पसंत ठरलेली

केशनाशकपूड किं० ४ आणे, दंतमंजन कापूर, शोप, पेपरमींट, सुंठ, पुदीना, हिंग, अजवान, दवना यांचे अर्क, किं० प्रत्येकीं ४ आणे, कावीळ, व मुळव्याध, यांच्या अप्रतीम गोळया किं १। रु० खरुज गजकर्ण, खवडा, इसब, नायटा, आगपैण, व्रण, चिखली, मुकी, ओली खाज, जखम, नखविषयीं, तमाम रोगावर चालणारा १ च 'दिलखुष' मलम किं ४ आणे ३ दिवसांत वरील मलमानें गुण येतो पौष्टीक चहा किं ४ आणे, वातनाशक तेल किं १२ आणे, विंचवावर पूड किं १। रु० व डोळयांतील वेगळे सोडण्याचे औ. किं ४ आणे, वि० खु० पत्रद्वारें, वंग प्रवाळ हात भट्टीचे किं० तोळयास २ रु०

पत्ता – व्ही० आर० मुळे, नांदुरा. जी० आय० पी०

नो० नं० ९

### गुण न आल्यास पैसे परत.

आमच्या प्रामाणिकपणाबद्दल खात्री करून घ्या. मूळ किं० रु० ४ कमी केलेली किंमत पोस्टेज सह रु० २०≡ यूथिन हें सतत सर्वत्र ९० वर्षें अनुभवलेलें असून त्यापासून नपुंसकत्व व अन्य कारणानें आलेला कमकुवतपणा यावर खात्रीनें गुण येतो अशाबद्दल खात्री झालेली आहे.

पत्ताः—यूथिन मॅनुफॅक्चरी चित्तूर.

नो० नं० ४०८

श्री

हर्ष! हर्ष!! हर्ष!!!

### स्वार्थ आणि परमार्थ यांची लूट!!

### प्रालब्धाच्या परीक्षेची संधि!

त्वरा करावी. समय चुकल्यावर पश्चात्ताप होईल.

चोपाई.

रामकृपा जिहींपर जब होई ॥
रंक होय धनपति महि सोई ॥
सो हरिकृपा होइ फुरजाना ॥
त्यागहु जिनप्रभू आस सुजाना ॥१॥

एक लक्ष --किंवा --पन्नास हजार --किंवा पंचवीस हजार इत्यादि अधिकांत अधिक एक लक्ष आणि कमींत कमी पंचवीस रुपये पर्यंत जसें ज्याच्या भाग्यांत असेल तो केवळ दोन रुपयामध्यें लाभ मिळतो

या विषयीं संपूर्ण निश्चय करण्यासाठीं दोन रुपये मनीऑर्डरनें पाठवावेत अगर एक कार्ड लिहून पाठवावें. ही मामूली जाहिरात नाहीं. यावर विश्वास ठेविला पाहिजे

पत्ताः- सेक्रेटरी,
पुण्य विभाग सभा,
धोलपूर रियासत-राजपुताना

नो. नं. ३९६

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थांनातील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळया हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळया

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १०८

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ७

### अगादर हें वाचावें.

शेंकडों लोकास गुण आला आहे. काळजीसारखा दुसरा रोगच नाहीं. कांहो, इतकी काळजी कां करतां. तुमची इच्छा हीच आहेना? व्यापारांत फायदा व्हावा, नोकरींत बढती मिळावी, परीक्षा पास व्हावी, संतती व्हावी, कर्जमुक्त व्हावें, घरांत कलह होऊं नये, शरीरांत सौख्य व्हावें, कोणतीही बाधा होऊं नये, इतक्या गोष्टी बद्दल काळजी करण्यास नको असेल तर प्रसिद्ध मांत्रिक माणिकप्रभु येथील रामचंद्र तात्या ह्यांचा **जगप्रसिद्ध अद्भुत ताईत** जवळ ठेवा. ह्मणजे सर्व गोष्टी मनाप्रमाणें होतील. ताईताचे गुणाची ह्या देशांत व परदेशांत ख्याति आहे. अनुभव घेऊन पहावा. गुण न आल्यास पैसे परत मिळतील. कोणतीही शंका घेऊं नका. कोणते वर्तमान पत्रावरून मागणी केली हें कळवावें. नंबर १ चा ताईत ह्याची किंमत रुपये ८ - नंबर २ चा ताईत किंमत रुपये ४ नं. ३ चा ताईत किंमत रु. १। ट. व्ही. पी. खर्च ०९ आणे. नंबर १ च्या ताईता पासून १५ दिवसांत गुण येईल. नंबर २ च्या ताईतापासून एक महिन्यांत गुण येईल, नं. ३ च्या ताईताचा गुण २ महिन्यांनीं येईल. जशी जरूर असेल त्याप्रमाणें मागणी करावी.

पत्ताः—वासुदेव रावजी लेले
मिरज

नो. नं. ३७९

### नोटीस

धी अकोला सेंट्रल बँक लिमिटेडचे शेअर होल्डर यांस कळविण्यांत येतें कीं सन १९१२—१३ व १९१३—१४ ह्या दोन सालासाठीं नफा वाटावयाचा आहे तरी ज्या शेअर होल्डरांचे पत्ते बदलले असतील त्यांनी आपला नवीन पत्ता कळवावा तसेंच जे शेअर होल्डर मयत झाले असतील त्यांच्या वारसांनी आपलें नांव पूर्ण पत्ता व वारस सर्टिफिकिटें बँकेकडे पाठवून द्यावीं.

R. V. Mahajani
सेक्रेटरी
धी अकोला सेंट्रल बँक लि०

नो. नं. ४१९ तारीख ३०--९--१९१४

### एक विवाहेच्छु कृष्णपक्षी ह्मणजे विदुर (मिश्रजातीय)

### एक वर व एक वधु पाहिजे.

माझी मुलगी १०।११ वर्षांची गृहकार्य कुशल, सुस्वरूप, गौरवर्ण, साधारण मराठी वाचणारी लग्नाची आहे व एक मुलगा २२।२३ वर्षांचा इंग्रजी साधारण जाणणारा हल्लीं रेल्वेंत फोरमनचें काम करितो हा लग्नाचा आहे. लग्नें या वर्षांत व्हावींत. तर वरानें व वधुनें अथवा त्यांच्या पालकांनीं सर्व खुलासेवार पत्रव्यवहार मजकडे करावा विशेष लागणारी माहिती देण्यांत येईल व ईश्वरसंकेतानुरूप होईल.

पत्ताः — गोविंद रामचंद्र जोशी स्टेशनमास्तर बंगाल नागपूर रेलवे रंगाली

नो. नं. ४०३

# वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन वद्य ८ शके १८३६


## आत्मप्रत्यय.

मनुष्याचेठायीं आत्मप्रत्यय हें एक अजब बीज ईश्वरानें ठेविलेली आहे. तिच्या अंगीं 'नरका नारायण' करण्याची आणि पर्वतप्राय विघ्नें दूर सारण्याची महान शक्ति आहे. ज्याचें दैव त्याच्याच हातांत आहे ही गोष्ट सिद्ध करण्यास आत्मप्रत्यय ही एकच गोष्ट पुरे आहे. नेपोलियन ह्मणत असे कीं अशक्य हा शद्बच माझ्या कोशांत नाहीं. केवढा जबरदस्त हा आत्मप्रत्यय त्याच्या ठायीं होता! मनुष्याच्या दुर्बळ शरीराला व त्याहून दुर्बळ मनाला राक्षसी शक्ति देणारी अजबवल्ली ह्मणजे आत्मप्रत्यय ही होय. आत्मप्रत्यय नाहींसा झाला ह्मणजे आटोपलें कारण तो गेल्याबरोबर सारी शक्ति नष्ट होते. या जगांत जेवढीं ह्मणून अद्भुत कार्यें मनुष्याच्या हातून घडलीं आहेत तेवढीं सगळीं आत्मप्रत्ययाच्या जोरावर घडलीं आहेत. शिवाजी महाराजांना मुसलमानांना जिंकून आपण स्वराज्य स्थापन करूं असा आत्मप्रत्यय नसता तर यःकश्चित मावळ्यासारख्या अडाणी शिपायाकडून स्वराज्याची मेढ त्यांना रोवता आली असती काय? जो कार्याच्या आरंभींच रडणारा त्याच्या हातून कोणतें कार्य तडीस जाणार आहे तें दिसतेंच आहे. पाण्याचा प्रवाह त्याच्या उगमाच्या उंचीपेक्षां वर जाऊं शकत नाहीं. तसें कोणतेंही कार्य तें घडवून आणणाऱ्या मानसिकशक्तीच्या पेक्षां बळवत्तर असणें अशक्य आहे. ह्मणून ज्यमानानें कार्य मोठें, त्या मानानें आत्मप्रत्ययही मोठा पाहिजे.

ज्याच्याठायीं आत्मप्रत्यय असतो तो दुसरे लोक काय ह्मणतील या गोष्टीची पर्वा करीत नाहीं. आपल्या मनरूपी थरमामिटरांत आत्मप्रत्ययाचा पारा किती अंश आहे हें तो पाहतो. दुसरी तिसरी गोष्ट त्याला दिसतच नाहीं. एकदा एक फ्रेंच शिपाई कांहीं अतिशय जरूरीचें पत्र घेऊन नेपोलियनकडे आला. त्यानें तें पत्र नेपोलियनाच्या हातांत दिलें, आणि त्याचा जाब घेऊन परत निघणार, इतक्यांत घोड्यानें अत्यंत परिश्रमामुळें प्राण सोडल्याचें त्याला आढळलें. नेपोलियनचा स्वतःचा घोडा तयार होता. तो घेऊन जा असें नेपोलियननें ह्मटलें. पण बादशहाच्या उत्तम सरंजाम घातलेल्या घोड्यावर आपण स्वार झालों तर लोक आपणांस वेडा, किंवा मूर्ख ह्मणतील हा विचार मनांत येऊन तो शिपाई गोंधळला. तेव्हां नेपोलेयन ह्मणाला, छेःछेः! अगदीं मागें पुढें पाहूं नकोस. बादशहाचें पद कोणाही फ्रेंच शिपायाला दुष्प्राप्य आहे असें नाहीं; जगांत या फ्रेंच शिपायासारखेच लोक पुष्कळ असतात. आत्मप्रत्ययाची शक्ति लोकापवादाच्या भीतीनें ते कमी करून स्वतःचें व स्वतःच्या देशाचें ते भयंकर नुकसान करतात. जशी वासना तशी फळें देव देतो. तुम्ही आपलें ध्येयच खालीं धरलें तर तुमचा नेम तरी वर कसा जाणार? पुष्कळ चांगल्या सुशिक्षितांनासुद्धा समाधानवृत्ति हीच सुखाची किल्ली वाटते. जगांत जें कांहीं उत्कृष्ट व उच्च पदस्थ आहे तें आपल्यासाठीं नाहीं. आपल्याहून श्रेष्ट कोणी असतील त्यांच्यासाठीं आहे असें ते समजतात. पण परमेश्वरानें श्रेष्ठता तुमचेठायीं ठेविली नाहीं, त्यानें तुमच्यासंबंधानें पक्षपात केला, अन्याय केला, असें तरी कां समजतां? असा प्रश्न त्याना केला तर उत्तर देता येत नाहीं. आत्मप्रत्यय नाहींसा करून वर ते ईश्वराला अन्यायी ठरवूं पाहतात हें केवढें आश्चर्य आहे!

आपणच स्वतःला मातीच्या ढेकळासारखे समजलों तर दुसरे लोक आपणास पायाखालीं तुडवितीलच. आपण मातीचीं ढेंकळें नाहीं, मनुष्यें आहों, आपलेठायीं नारायणस्वरूपी होण्याची अद्भुतशक्ति आहे, मात्र त्या शक्तीचा योग्य उपयोग आपण केला पाहिजे असा दृढ विश्वास ठेविल्यावर मनुष्याला या जगांत अशक्य असें कांहीं नाहीं. हा विश्वास ह्मणजेच परीस. त्याच्या अंगीं दगडाला सोनें करण्याची अलौकिक शक्ति आहे. असा विश्वास स्वतःचे ठायीं असणें हेंच साऱ्या यशाचें बीज आहे. हा विश्वास जागृत ठेवून मनुष्यानें कोणतेंही कार्य हातीं घेतलें ह्मणजे पुढें विचारशक्ति त्याला मदत करून यशप्राप्ति करून देते. 'निश्चयाचें बळ तुका ह्मणे तेंचि फळ' हें साधुवचन खोटें नाहीं. हा निश्चय आत्मप्रातीतीवांचून येत नाहीं. आत्मप्रत्यय ज्याचेठायीं नाहीं, त्याचे हातून स्वावलंबन कधीं घडावयाचें नाहीं, आणि स्वावलंबन नसलें ह्मणजे दैवी साह्य त्याला प्राप्त होणें नाहीं. 'रडत राऊत घोड्यावर बसविण्यांत अर्थ नाहीं' हें परमेश्वरास पूर्णपणें ठाऊक आहे. व्यवहारांत देखील हेंच अनुभवास येतें. ज्या घोड्याला आपण शर्यत जिंकूं अशी उमेद नसते त्याचें पाऊल पुढें पडत नाहीं. आत्मप्रत्ययावाचून दुष्कर कार्य घडवून आणण्याचें धैर्य मनुष्य प्राण्याला येत नसतें. एखादें अलौकिक कृत्य घडवून आणण्यास अलौकिक आत्मप्रत्यय अंगीं पाहिजे. लोकापवाद, भीती, व शंका या मनांतून पार घालविल्या पाहिजेत.

याचा अर्थ नुसत्या आत्मप्रत्ययानें सर्व सिद्धि प्राप्त होते असा घ्यावयाचा नाहीं. आत्मप्रत्यय हा तुमच्या यशोमंदिराचा नुसता पाया आहे. पण तो भक्कम घातल्याशिवाय पुढें कांहीं एक करतां येत नाहीं, आणि तो कचा ठेवतां येत नाहीं येवढेंच समजावयाचें. पाया ह्मणजे इमारत नव्हे. पण त्याच्यावाचून इमारत होणें नाहीं. उष्णतेची जितकी ज्यास्त तीव्रता एका बिंदूंत आणतां येईल तितकी त्या उष्णतेनें अतिशय कठीण पदार्थ सुद्धां वितळवितां येतात तसें, आत्मप्रत्यय कोणत्याही एका अग्रावर आणून बसविल्यावर त्याच्या शक्तीनें पर्वतप्राय प्रचंड विघ्नांचें पाणी करतां येईल.

आत्मप्रत्यय ह्मणजे आढ्यता नव्हे. आपल्या अंगच्या शक्तीची संपूर्ण जाणीव असा त्याचा अर्थ आहे, आणि माणसाच्या अंगच्या शक्तीला मर्यादा नाहीं, कारण ती दैवी शक्तीचा एक अंश आहे.

मी एखादी गोष्ट निश्चयानें करीन असें ह्मणणें किंवा वाटणें, आणि मी प्रयत्न करून पाहीन असें ह्मणणें किंवा वाटणें यात जमीन अस्मानाचें अंतर आहे. सबळता आणि दुर्बळता यांतलें अंतर तें हेंच. श्रद्धा ही आपण व ईश्वर यांना जोडणारी साखळी आहे. ती तुह्मी जोडल्यावर दैवी शक्तीचा प्रवाह तुमच्या अंगांत शिरेल. पण तीच तुह्मी तोडून टाकली, आणि देवानेंच आपणांस दुर्बळ करून ठेविलें आहे असें ह्मणून हातपाय गाळून बसला, तर दैवी शक्ति तुमच्या अंगात कोठून येईल?

जगात आत्मप्रत्ययावाचून कोणतेंच महत्कृत्य घडलेलें नाहीं. शिवाजी महाराजांचें उदाहरण वर दिलेंच आहे. कोलंबसाचें घ्या, जॉर्ज वाशिंगटनाचें घ्या. आत्मप्रत्यय हा दैवीचमत्कार घडवून आणणारा आहे, आणि गंमत ही आहे कीं हे चमत्कार ईश्वर स्वतः घडवीत नाहीं, तर माणसाच्या द्वारें घडवितो. तें येवढ्याचसाठीं कीं इतर माणसांना त्यापासून उत्तेजन यावें व त्यांनीं आपल्या ठायीं बीजरूपानें असलेल्या दैवी शक्तीची जाणीव ठेवून त्यांनीं तिला अंकुरित करावें देवानें माणसाच्या ठायीं महत्वाकांक्षा ठेविली आहे. महान मुलाला अशक्य असें कांहीं दिसत नाहीं. तें या महत्वाकांक्षे मुळेंच. त्या महत्वाकांक्षे बरोबरच ती पूर्ण करण्याचें सामर्थ्य ही त्यानें बीजरूपानें ठेविलें आहे. पण मनुष्य अज्ञानानें तिचा व त्या साधनाचा नाश करतो आणि मग रडत बसतो. याचा दोष ईश्वराकडे काय आहे? आत्मैवात्मने मित्रं आत्मैवात्मनो रिपुः असें श्रीमद्भगवद्गीतेंत ह्मटलें आहे तें यथार्थ आहे. परमेश्वरानें दिलेल्या अद्भुत शक्तीचा आपण आपल्या हातानें नाश केल्यावर आपणच स्वतःचे शत्रु बनतो यांत काय आश्चर्य आहे! 'दैवेन देयमिति कापुरुषा वदन्ति' हें वाक्य सर्वथा खरें आहे. जवळचें असलेलें नाहींसें करून देवाच्या तोंडाकडे आशाळभूतपणानें पाहणारे ते क्षुद्रबुद्धीचे नव्हेत तर त्याना काय ह्मणावयाचें? जयदेव, कालीदास, भवभूति, वगैरे कवींचीं उदाहरणें घ्या, त्यांनीं आत्मप्रत्ययाच्या जोरावर चिरकाल जिवंत राहणारी अमर अशी काव्यरचना केली. कोलंबसाला आत्मप्रत्ययामुळेंच यशःप्राप्ति झाली. बुद्धाचा आत्मप्रत्यय सप्रसिद्धच आहे. लॉर्ड क्लाइव्ह, नेलसन, नेपोलियन, शिवाजी महाराज, बाजीराव, लॉर्ड केल्व्हिन, एडिसन, जोन ऑफ आर्क, इ. ऐतिहासिक व्यक्तींच्या ठायीं आत्मप्रत्यय नसता तर त्याच्या हातून महत्कार्यें कधीं तरी झालीं असतीं काय? आत्मप्रत्ययावांचून अद्भुत शक्ति अंगात येत नाहीं, व अर्थातच चारित्र्याचा प्रभाव दिसत नाहीं. आत्मोद्धार किंवा देशोद्धार या गोष्टी आत्मप्रत्ययावाचून व्यर्थ आहेत.

## परीक्षा पद्धति.

युनिव्हर्सिटीच्या परीक्षाच्या चरकात आमच्या विद्यार्थ्यांचीं हाडें पिळून निघतात अशी ओरड आज कालची नाहीं, आज कित्येक वर्षे ती चालत आली आहे. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं ही ओरड करणारे युनिव्हर्सिटीचे फेलो असून कित्येक तर स्वतः परीक्षक ही असतात. पण ह्या चरकाच्या असह्य वेदनातून गरीब बिचाऱ्या विद्यार्थ्यांची मुक्तता करण्याची खटपट कोणीं फारशी केलेली नाहीं. विद्यार्थ्यांचे शिक्षकच त्यांचे परीक्षक असले ह्मणजे विद्यार्थ्यांना कोणकोणत्या गोष्टी शिकविल्या गेल्या आहेत, विद्यार्थ्यांची धारणाशक्ति किती आहे, व त्यांला संवयी कशा प्रकारच्या आहेत या विषयींची त्यांना चांगली माहिती असते व चांगले विद्यार्थी असतात तेच त्यांच्या हातून पास होतात. पण आमच्या युनिव्हर्सिटीचा सगळाच प्रकार निराळा. शिक्षकांना परीक्षक न नेमण्याविषयीं तर आमच्या कित्येक युनिव्हर्सिटीचा विशेषच कटाक्ष आहे. अशा स्थितींत आमच्या विद्यार्थ्यांना परीक्षेचें मोठें भय वाटावें व रात्रंदिवस काळजीनें त्यांचीं शरीरें क्षीण व्हावीं यांत काय आश्चर्य आहे. विलायतेंत, जर्मनींत, व अमेरिकेंत इकडच्या इतक्या कठीण परीक्षा नसतात. व विद्यार्थ्यांविषयीं परीक्षकांचीं अंतःकरणेंही इतकीं कठोर नसतात. जर्मनींत विद्यार्थ्यांच्या परीक्षा दर आठवड्यास घेतात, व या सर्व परीक्षांत मिळालेल्या मार्कांच्या बेरजेवर त्या विद्यार्थ्यांची अभ्यासांतली प्रगति ठरवितात. खरोखर न्यायाचा मार्ग हाच आहे. परीक्षकही शिक्षक हेच असतात. वर्षभर परीक्षा होत राहिल्यानें परीक्षेचा निकाल दैवावर नव्हे तर कर्तृत्वावर अवलंबून राहतो. पण आमच्या येथें दर आठवड्यास परीक्षा घेणें हें सुधारलेल्या शिक्षणपद्धतीला लाछनास्पद समजण्यात येतें, व शिक्षकांच्या स्वाधीन विद्यार्थ्यांच्या परीक्षेचें काम करणें ह्मणजे अब्रह्मण्य समजलें जातें. शिक्षकांविषयीं बेभरंवसा याच्या मुळाशीं आहे हें सांगावयास नकोच. असा सगळा उलटा प्रकार परीक्षा पद्धतीच्या मुळाशीं असून पुनः विद्यार्थी घोकंपट्टी करतात हें टोमणें आहेच! गरीब बिचारे हिंदी विद्यार्थी! स्वतःच डोळ्यात बोट घालून पुनः डोळ्याला पाणी कां आलें असें विचारणाऱ्या मतलबी लोकांचा कावा उघडपणें बोलून दाखविण्याची सुद्धा त्यांना चोरी!

## जीवन सरिता

[ लेखांक १ ला ]

भूतदयेनें प्रेरित झालेलीं अंतःकरणें कितीही हळहळोत अखंड वाहत असलेली जीवनसरिता सदैव भीषण गर्जना करीत एक सारखी वाहत रहाणार यात शंका नाहीं. अखिल प्राणिमात्रांच्या परस्पर विरोधी अशा हितसंबंधाच्या खडकांवर हा प्रवाह आदळत असल्यामुळें त्याचा निनाद अधीक अधीक कर्णकठोर होत दयावंतांचीं अंतःकरणें सदैव हदरत ठेवणार.

जीवन-सरितेच्या ह्या प्रवाहाकडे जो पाहील त्यास निरनिराळे भयानक चमत्कार दिसतील एकाच वृक्षावर जन्म पावलेले एकाच ठिकाणावरून वाहत येणारे लांकडाचे दोन ओंडे भोंवऱ्यांत सांपडून जसे एकमेकांशीं धडका घेत असतांना दिसतात त्याप्रमाणें एकाच मानववंशांतून उत्पन्न झालेलीं कुटुंबें दीर्घकाळपर्यंत जीवन सरितेच्या प्रवाहांत वाहत राहून स्वार्थानुरोधी आत्महितदक्षतेच्या भोंवऱ्यांत सांपडून परस्परांचें अस्तित्व नाहिसें करण्यांत 'झिंज्या तोडीत असलेली' दिसतात. जगाच्या इतिहासाचीं पानें उलटा म्हणजे ह्या चमत्कारांचीं कितीक उदाहरणें तुम्हाला सांपडतील. कौरव पांडवांनीं परस्परांत भांडून कुलक्षय केल्याचें आपले पूज्य पुराण ग्रंथ दाखवीत आहेतच. यादवांनी आपला नाश कोणत्या रीतीनें करून घेतला हें सर्वांना माहीत आहेच. प्रसिद्ध रण धुरंधर पृथिवीराज व राजा मानसिंग ह्याची हकीगत भारत इतिहासज्ञांच्या स्मृतिपटलांतून नाहींशी झाली नसेलच. सातारा व कोल्हापूर ह्या गाद्यांमधील तंटे कोणाला माहित नाहींत? भानू व पटवर्धन भट व पंतप्रतिनिधी, नाना व महादजी, नारायणराव व रघुनाथराव ह्यांच्यातील भांडण कोण विसरला आहे? मुसलमानांच्या धुडगुसानें अधींच क्षीण बनलेल्या रजपुतांना 'हाय हाय' करावयास लावणाऱ्या जरीपटक्याचें फडफडणें अजून ही कोणास ऐकूं येत नाहीं! नागपुरकरांची भरारी अजूनही बंगाली पाळण्यांतील छकुल्याच्या पोटांत धडकी उत्पन्न करीत नाहीं काय? हिंदू लोकांच्या इतिहासांतील हे हीन प्रकार अतिशय खेदजनक आहेत खरे. हे प्रकार म्हणजे हिंदू संस्कृतीच्या निर्मळ चेहऱ्यावर घातलेला काळकुट्ट बुरखाच होय. परंतु त्यांनीं जीवन सरितेचें भीषणस्वरूप अधिकच भयानक केलें आहे.

अशी जरी वस्तुस्थिति आहे तरी ही जीवनसरिता यांतच कित्येक अभिनंदनीय कार्यें करीत असते. आपल्या पित्याचें उदर फोडून सर्व अंग त्याच्या रक्तानें माखून घेतलेली नगदुहिता ह्या कड्यावरून त्या कड्यावर उड्या घेत रस्त्यानें अमूल्य रत्नें व सुवर्णरज उधळीत जात असते व आपल्या मुखाजवळ मानव वस्तीला योग्य अशीं बेटें उभारीत असते. इतप्रमाणें तिची ही बहीण जीवन सरिता आपलें विघातनाचें कार्य नेहमी चालू ठेवीत मनुष्याच्या रक्तानें न्हाऊन धुऊन आपली कलहप्रियता तृप्त करीत आज कित्येक युगें अशीच वहात आहे. इचें नर्तन कधींही एकाच दिशेस अनुलक्षून नसतें. ती कधी पूर्वगामी, तर कधी दक्षिणगामी; कधी उत्तर गोलार्धांत, तर कधी दक्षिण गोलार्धांत आपला प्रवाह चालू ठेवीत असते. ज्या दिशेच्या रोखें तिचा प्रवाह वाहत असतो त्या दिशेस विरुद्ध दिशेकडून वाहत येणारे वैभवाचें कण जमून त्याचीं शिखरांच्या शिखरें तयार होत असतात. आणि ह्याच वैभवाच्या शिखरांवर आरूढ झालेले मानव वंश आपण पहातों.

जीवन सरितेच्या मुखा जवळ तयार होणाऱ्या वैभव भूमिकेवर जो आपलें निशाण रोवून आपला ताबा करण्यास विसरेल त्याच्या सारखा अभागी तोच. पूर्व दिग्भागीचा वैभवगिरी फोडून त्याचा द्रव्यापहार करीत ही जीवन सरिता पश्चिम वाहिनी झाल्यास आज बरींच शतकें लोटलीं. तिनें आपल्या मुखाजवळ तयार केलेल्या भूमिकेवर नांदत असलेले मानव वंश आज आपण पहात आहोंच.

जे खेळ नग कन्यांनां खेळतां येणें शक्य नाहीं. ते खेळ ही जीवनसरिता खेळतांना आपण पहातों. उगमाचें मुख व मुखाचा उगम करण्याची जादू जर कोणाजवळ असेल तर ती हिच्या जवळच आहे. भित्र्याच्या हातांत तरवार देऊन त्याच्या पराक्रमाचे पोवाडे जर कोणी ऐकवीत असेल तर ती हीच होय. दुबळ्यास सबळ व सबळास दुर्बळ करण्याचा 'सार्सापरीला' हिच्याच दवाखान्यात आहे. सुधारणेचें बाशिंग बांधलेला मानववंश घटकेच्या आंत रानटी बनून अत्याचार करण्यास जर प्रवृत्त होत असेल तर तो हिनेंच दिलेल्या 'कोकेनच्या डोसा' मुळें. नीतीचें पांघरुण घेऊन दुसऱ्याचे खिसे कापणारे साळसूद बहिरुपी हिच्याच शाळेंत तयार होतात. एकास 'कोकेन' पाजून सुधारणेचें बाशिंग त्याच्या पासून हिसकावून घेऊन दुसऱ्या रानट्याच्या डोक्यास बांधण्याचा पराक्रम हीच करते. आज अंगास रंग फासून केर कचऱ्यांत लोळत पडलेला उद्यां हिनेंच दिलेल्या उत्कर्षाच्या झोल्यावर झुलतांना दिसतो. हाडवैऱ्यांना स्नेहितांच्या जाळ्यात घेरून एकमेकांचे जीगरदोस्त बनविण्याचा मंत्र हिला एकटीलाच माहित आहे.

जागजागीं डबक्यांतून व झाडाझुडांच्या पर्णांतून बंदिवान झालेले जलबिंदु रवीचा कर धरून स्वतंत्र होतांच विस्तृत वातावरणांत स्वैर संचार करीत सुटतात; पण तेथें जर ते ज्यास्तच गर्दी करीत सुटतील तर ते परस्परांच्या दळणवळणाला हरकत करूं लागतात व एकमेकांचा नाश करीत पुन्हां बंदिवान होण्याकरितां अधःपतन पावतात. ह्या भांडखोरांना नग दुहिता आपल्या बरोबर खेंचून नेत असतांना जशी आपण पहातों तशीच ही जीवन सरिता सुद्धा कित्येक मानवी कुटुंबांना बद्ध परिकर करण्याकरितां घेऊन जात असते. हिच्या ह्या खेळाचें साम्य पृथ्वीच्या पोटांतील चमत्काराशीं बरेंच आहे. पृथ्वीच्या पोटांत जमा होणारे स्फोटक घटक जोंपर्यंत निरनिराळे राहून आपला व्यवहार चालू ठेवीत असतात तोंपर्यंत सर्व कांहीं सुरळीत चालतें परंतु पृथ्वीच्या पोटांतील द्रव्यांचें शोषण करून जेव्हां ते गब्बर बनतात तेव्हां ते इतर घटकांच्या व्यवहारास हरकत करितात हे परस्पर विरोधी स्फोटक घटक दिखाऊ प्रेमाच्या भरांत एकमेकांना आलिंगूं लागले म्हणजे ते लवकरच धडाका उडवून उपवनें व नांदतीं शहरें यांचा बेपत्ता करणार असे भविष्य जर कोणी जोशी वर्तविणार असेल तर, प्रस्तुतच्या पंचांगांचें शोधन झालें नाहीं म्हणून त्यास अडून बसावें कां लागणार आहे? जीवन सरितेच्या प्रवाहाच्या तळाशीं अशा प्रकारचेच कांहींसे चमत्कार घडत असतात. स्वार्थबुद्धीच्या स्फोटक प्रवृत्तीनें मनुष्यांचे घडत असलेले व्यवहार ज्वालामुखीशी स्पर्धा करणारीं विध्वंसक कार्येंच करणार. त्यांचें पर्यवसान दुसरें कां कशांत होणार आहे?

गेल्या शतकांतले पश्चिमेकडील व्यवहार जर कोणी नीट लक्ष लावून पाहिले असतील तर ग्रहांची स्थिती न जाणतां व सूक्ष्म जगतांतून दिसण्याची दृष्टी आली नसतांना, सुद्धां त्यानें प्रस्तुत, अगणित मनुष्यांचा संहार करणारे उद्भवलेलें हें महायुद्ध पश्चिमेस उद्भवणार असें भविष्य बिनदिक्कत ठोकून दिलें असतें तर त्यास कोणीच हरकत केली नसती. मनुष्य प्राण्यांच्या क्षुद्र स्वार्थानें खडकाळ बनलेल्या प्रवेशावरून वाहत येणारा जीवन सरितेचा प्रवाह ज्यास्तच तीव्रतर बनलेला आहे. पण अशाही प्रवाहात हिंमतीचा दार आपल्या कंबरेस बांधून बुड्या मारणारे पाणबुडे डुबत असलेले आपण पहातोंच. हिच्या सहज स्वभावास अनुसरून पूर्वींच्या मुखाच्या ठिकाणीं तिचा उगम होऊं लागत असल्यामुळें मुखाचा उगम बनलेल्या ठिकाणाजवळील वैभवशाल्यांचें वैभव तिच्या प्रवाहांत झिरपून वाहूं लागतें. आणि ह्या वैभवाच्या द्रव्याचे कण ह्या खळखळाटांत बुड्या मारणारे झारेकरीवृत्तीचे पाणबुडे जमा करीत असतात. परंतु एकाच्या ओंजळींतून वाहून जाणारे द्रव्यकण दुसऱ्याचे हातात पडत असल्यामुळें एकमेकांच्या मनोमय भूगर्भांत निराळेच स्फोटक स्वभावाचे स्वार्थी विचार संकलित होत जातात. जीवनसरितेंत झिरपून वाहत येणाऱ्या इतरांच्या वैभवाचे कण हातीं लागतील तितके जमा करण्याच्या यांच्या हावेस सीमा राहत नाहीं. आणि मग फाजील महत्वाकांक्षेच्या आगीची ठिणगी पूर्वसंकलित अशा स्फोटक विचारावर पडतांच त्यांचा धडाका उडून जीवन सरितेच्या प्रवाहाचे स्वरूप पलटणारे दिव्य चमत्कार घडून एकदम निराळेंच रूपांतर होतें.

अनंत काल वाहत असणाऱ्या ह्या जीवन सरितेच्या प्रवाहांत असे चमत्कार पूर्वीं अनेक वेळा झालेले आहेत. पश्चिमेकडील प्रस्तुतचा महायुद्धाचा चमत्कार अशापैकींच एक आहे.

समुद्रास भरती येऊं लागली म्हणजे आपलीं मिठागरें बंद ठेवून मिठागराचा मालक जर घरीं स्वस्थ झोंप घेत पडला असेल तर अभाग्याच्या घरीं चालून येणारी ही रत्नाकर कामधेनू आपला 'रामरस' न देतां, दारीं अडणा असल्यामुळें जर परत गेली तर तो कोणाचा दोष? सध्यांच्या काळीं ही जीवन सरिता आपला ओघ फिरवूं लागली आहे. ही पश्चिमवाहिनी जीवन सरिता आपला ओघ आतां बहुतेक फिरविणारच कीं काय? असें वाटत आहे. तेव्हां आतां असा प्रश्न सहाजीकच उत्पन्न होतो कीं, पश्चिमेकडून तोंड फिरवून पूर्वाभिमुख जर हा प्रवाह झाला तर आम्ही काय करणार?

---

## कलकत्त्याचा दंगा.

कानडा देशांत ज्या शीख लोकांना येण्याचा मज्जाव करण्यांत आला होता, त्यांना हिंदुस्थानसरकारच्या मध्यस्थीनें सरकारनें आपल्या खर्चानें कलकत्त्यास गेल्या आठवड्यांत आणून पोचविलें, आणि पुढें त्यांच्या देशास—पंजाबास—नेण्यासाठीं स्पेशल ट्रेन तयार होत होती इतक्यांत त्यांपैकीं कांहीं लोकाना संशय येऊन म्हणा किंवा गैरसमजूत होऊन म्हणा त्यांनीं स्पेशल ट्रेनमध्यें जाण्याचें नाकारलें व त्यावरून प्रकरण हातघाईला येऊन दंगा झाला व दोन्ही पक्षाचे—पोलीसचे व शिखांचे—बरेच आसामी घायाळ झाले, व या जखमामुळें एक युरोपियन आफिसरही गतप्राण झाला वगैरे हकीकत आली आहे. एकंदर सगळेंच प्रकरण अतिशय दुःखद आहे, आणि या प्रकरणाची चौकशी कोर्टापुढें होईल तेव्हां न्यायदेवतेनें मनोविकारांची क्षुब्धता न होऊं देतां फार विचारपूर्वक निकाल दिला पाहिजे. सरकारचे आफिसर शीखलोकांवर उपकारच करीत होते या विषयीं तिळमात्र शंका नाहीं. शीख लोक अज्ञानी आणि परदेशीं आलेल्या कटु अनुभवामुळें आणि सोसाव्या लागलेल्या हालामुळें व अपमानामुळें चिडखोर बनले जाण्याचाही संभव लक्षांत घेतला पाहिजे. इतक्या हाल अपेष्टा सोसून स्वदेशीं परत आल्यावर तरी आपणांस स्वातंत्र्यसुख मिळेल अशी त्यांना मोठी आशा वाटत असली पाहिजे. त्यांना जेव्हां त्यांच्या इच्छेविरुद्ध स्पेशल ट्रेनमध्यें बसण्यास भाग पाडण्याचा पोलीसनें प्रयत्न केला, तेव्हां शीख लोकांची कांहीं तरी भयंकर गैरसमजूत होऊन त्यांनीं आपल्या उपकारकर्त्यांवर गोळया झाडल्या. हें कृत्य अज्ञानाचा व गैरसमजुतीचा परिणाम असला पाहिजे. कारण या शीख लोकांचेच भाऊबंद इंग्रजी राज्याच्या रक्षणार्थ हातावर शीर घेऊन राजनिष्ठेसाठीं युरोपांत लढण्यास गेले आहेत. शिवाय उपकारकर्त्याविषयीं कृतघ्नपणा करणें हें हिंदुस्थानास ठाऊक नाहीं असा या देशाचा लौकिक आहे. कानडाहून आलेल्या शीख लोकांपैकीं कांहीं मुकाट्यानें पहिल्या स्पेशल ट्रेननें निघूनही गेले होते. ही एकंदर स्थिति लक्षांत घेतली म्हणजे या दुसऱ्या शीख लोकांनींच कां कृतघ्नपणा दाखवावा याला योग्य कारण कांहीं दाखवितां येत नाहीं. सरकारचा हेतु अत्यंत प्रशंसनीय होता याविषयीं शंका नाहीं. पण तो हेतु पार पाडण्यासाठीं पोलिसांनीं योजिलेले उपाय कितपतयोग्य किंवा अयोग्य होते व ते शीख लोकांचा गैरसमज उत्पन्न करण्यास कारण झाले कीं काय हें पाहिल्याशिवाय या बाबतींत दोषाची न्यायाची वाटणी होण्याचा संभव दिसत नाहीं. सुदैवानें लार्ड हार्डिंजसारखे परमन्यायी, साहानुभूति प्रेरित, आणि दयाळु राज्यकर्ते लाभले असल्यामुळें हिंदुस्थानच्या लोकांविषयीं निष्कारण कोणाचा गैरसमज किंवा अन्याय होण्याची भीती नाहीं.

---

## लढाईचा रंग.

ता. ४ आगष्ट रोजीं इग्लंडनें जर्मनीशीं आपलें वैर जाहिर केलें. त्याला जवळ जवळ नऊ आठवडे झाले; तरी

लढाईचा शेवट दृष्टीच्या टप्यांत आलेला दिसत नाहीं. या लढाईप्रीत्यर्थ जर्मनीला रोज ३॥ कोट, इंग्लंडला २॥ कोट, फ्रान्सला २॥ कोट व राशियाला ३ कोट रुपये या प्रमाणें खर्च करावा लागत असल्याचा एकानें अंदाज केला आहे. दोन्ही पक्षांची प्राणहानि ही जबर झाली आहे यांत शंका नाहीं. जर्मनीचे ६ लक्ष लोक आतांपर्यंत मारले गेले असें ह्मणतात. इतकी हानि सोसून त्या देशानें काय मिळविलें तर कांहीं नाहीं असेंच उत्तर देणें भाग आहे. बेलज्यम देश उध्वस्त झाला तरी तेथील लोक अद्याप खंबीरपणा दाखवीत आहेत. जर्मन लोक अंटवर्पला वेढा घालून तोफांचा भडिमार करीत आहेत व वरून बांब टाकीत आहेत. तरी बेलज्यन लोक डगमगत नाहींत. पश्चिमेकडे जय मिळण्याविषयीं निराश होऊन केसर आतां पूर्वेस राशियाकडे वळले आहेत. रशियाचे झारही स्वतः रणांगणावर गेले आहेत. जर्मनीनें तुर्कस्थानवर आपली छाप ठेवून सुलतानाकडून डार्डानेल्सच्या सामुद्रधुनीचें द्वार बंद करविलें आहे. याशिवाय एकच महत्त्वाची गोष्ट गेल्या आठवड्यांत घडली ती ही कीं हिंदुस्थानांतून लढाईवर गेलेली फौज फ्रान्समध्यें सुरक्षितपणें पोंचली व इंग्रज आणि फ्रेंच यांना ही मदत आल्याबद्दल अत्यानंद होऊन त्यांनीं हिंदी शिपायावर फुलें उधळलीं. इंग्रजी साम्राज्याचे परम सन्माननीय बादशहा पांचवे जॉर्ज यांनीं ही हिंदी सैन्याचें निरोपद्वारें मनःपूर्वक स्वागत करून तुमच्या नांव लौकिकाप्रमाणें तुमच्या हातून मोठी कामगिरी होवो अशी आशा प्रदर्शित केली आहे ती परमेश्वर सफल करो आणि हिंदी सैन्याच्या राजनिष्ठेचें व उमेदीचें चीज होवो अशी प्रत्येक हिंदी प्रजेची त्यास प्रार्थना आहे. हिंदी सैन्याच्या हातून तिच्या लौकिकास साजेशी कामगिरी झाल्यास हिंदुस्थानाला ब्रिटिश साम्राज्यांत योग्य उच्च स्थान प्राप्त होईल असें मधाचें बोट इंग्रजी पत्रकर्ते लावीत आहेत. पण त्यानीं हें ध्यानांत ठेवावें कीं हिंदीसैन्य तिकडे गेलें आहे तें कांहीं स्वार्थ हेतु प्रेरणेनें गेलें नाहीं, तर राजनिष्ठेच्या स्फूर्तीनें गेलेलें आहे व हिंदी लोकाची कर्मानुबंधित्वावर पूर्ण श्रद्धा असल्यामुळें ईश्वर सत्कर्माचें फळ दिल्यावांचून कधीं राहणारनाहीं अशी त्यांची दृढ समजूत आहे. सध्यातरी ते निष्काम भावनेनेंच लढत राहतील.

## मिसेस आनी बिझांट

ता० १ आक्टोबर हा या अलौकिक प्रभावशाली बाईचा वाढदिवस नागपूर येथील व इतर कित्येक ठिकाणच्या थिओसॉफिकल सोसायटयांनीं मोठ्या आदरानें पाळन व्याख्यानें, दान, वगैरे रीतीनीं साजरा केला असें कळतें. फार उत्तम गोष्ट. कारण कीं या बाईचे हिंदुस्थानावर अनंत उपकार आहेत. यांनीं हिंदुस्थानच्या प्राचीन ऋषींच्या विरोला पाश्चात्य राष्ट्रांतूनच काय पण खुद्द हिंदुस्थानांत देखील शास्त्रज्ञांच्या भयंकर तडाख्यांतून व अज्ञानप्रेरित टीकेच्या भडिमारांतून वाचवून त्याची प्रतिभा चोहीकडे फाकविली. धर्मशिक्षणाचा प्रसार शाळा व कॉलेजें यांतून करण्यांचा उपक्रम केला. पूर्वजांविषयीं आदर बाळगण्यास लोकांना शिकविलें, गूढ तत्त्वज्ञानाला प्रकाशित केलें' अन्यायाचा प्रतिकार धैर्यानें केला, लोकांना देशोद्धाराचा खरा मार्ग दाखविला, आणि हें सगळें पवित्र कार्य करीत असतां निंदेची पर्वा केली नाहीं, किंवा परिश्रम, द्रव्यव्यय, आणि मानसिक चिंता यांना जुमानलें नाहीं. अशा थोर व्यक्तींना बहुधा कृतघ्नपणा हेंच त्यांच्या परिश्रमाबद्दल बक्षीस मिळत असतें व मिसेस बिझांट यांनाही तें मिळालें. तथापि त्यांनीं अंगीकृत कार्यांत किंचित, ही शिथिलता न येऊं देतां उलट आपल्या कार्याचें क्षेत्र वाढविलें आणि राजकीय उन्नतीची त्यांत भर घालून वर्तमान पत्राच्या संपादकाचें जोखमीचें कार्य अंगावर घेऊन वार्धक्याची छाया पडली असतां ही तें प्रशंसनीय प्रकारें करीत आहेत. हिंदुस्थानांतच काय पण पाश्चात्य देशांत ही अशी अलौकिक स्त्री क्वचित्‌च निर्माण होत असते. एका हिंदुस्थानी लेखकानें या बाई संबंधानें सहज गोष्टी निघाल्या असतां प्रांजलपणानें पुढील उद्गार काढले. हा मित्र ह्मणाला— जोंपर्यंत या बाईला मी स्वतः पाहिलें नव्हतें किंवा तिचें भाषण ऐकलेंनव्हतें व वर्तमानपत्रांतली टीकाच तेवढी वाचीत असे, तोंपर्यंत ही बाई खरोखर महामाया मला वाटत होती, पण बनारस येथें त्यांचें प्रत्यक्ष दर्शन मला घडलें, त्यांचें वर्तन मीं पाहिलें, त्यांच्याशीं संवाद करण्याचा सुप्रसंग मला लाभला व त्यांचीं भाषणें मीं ऐकलीं, तेव्हांपासून माझ्या डोळ्यांवरचें भ्रमपटल गळून पडलें आणि ही बाई ह्मणजे या विसाव्या शतकांतली उपकारकर्त्री यक्षिणी किंवा देवदूतिका असावी असें वाटून तिच्याविषयीं माझ्या मनांत पूज्यबुद्धि अंकुरित झाली." असा अनुभव आमच्या या मित्राचाच एकट्याचा आहे असें नाहीं. त्याच्यासारखा मनाचा प्रांजलपणा मात्र सर्वांच्या दृष्टोत्पत्तीस येत नाहीं येवढेंच. इतरांनाही तोच अनुभव आलेला असतो. पण आपली चूक कबूल करण्याइतका मनाचा थोरपणा व सरळपणा त्यांचे ठायीं नसतो.

## सर तारकनाथ पालित.

कलकत्यास शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगति प्रीत्यर्थ ज्यांनीं दहा लक्ष रुपयांची उदार देणगी दिली त्या या दानशूर गृहस्थाच्या निधनाची वार्ता ऐकून सर्व हिंदुस्थान आज हळहळत आहे. सर टी. पालित हे कलकत्याचे नामांकित वकील होते. त्यांचें कायदेपांडित्य फार श्रेष्ठ दर्जाचें होतें. त्यांनीं स्वतांच्या कष्टानें अगणित द्रव्य मिळविलें, आणि तें उदार हस्तानें सत्कार्यीं खर्च केलें. त्यांनीं आपली देशभक्ति वर्तमानपत्रांतल्या चुरचुरीत लेखांच्या किंवा व्यासपिठावर उभे राहून भाषणांच्या द्वारें व्यक्त केली नाहीं, पण या दोहोंहून अधिक श्रेष्ठ व दुर्मिळ अशा कृतीच्या रूपानें लोकांच्या निदर्शनास आणून आपली कीर्ति हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांत अमर करून ठेविली. हे स्वदेशी चळवळीचे मोठे पुरस्कर्ते होते. पांच सहा वर्षांपूर्वीं कलकत्यास जेव्हां स्वदेशीची मोठी धामधूम चालली होती व स्वदेशी चळवळीच्या मिरवणुकी निघत असत. ते वेळीं हे आपली श्रीमंती, आपला दर्जा, आपली इभ्रत सगळी गुंडाळून ठेवून स्वदेशीव्रताची ध्वजा फडकवीत मिरवणुकीच्या अग्रभागीं चालत. तथापि यांचे अंतःकरणाची शुद्धता, निर्दोष स्वदेशप्रेम आणि अव्याज कळकळ पाहून पोलिस अधिकारी त्यांच्या वाटेला कधीं गेले नाहींत. उलट त्यांची उदार देणगी जाहिर होतांच सरकारनें नाईट हुद्याची पदवी देऊन त्यांना भूषित केलें. असा थोर व उदार पुत्र दुष्ट काळानें ग्रस्त केल्याबद्दल हिंद मातेला आज केवढें दुःख होत असेल पाहिजे! सर टी. पालित जरी आज आपल्यांतून गेले आहेत, तरी त्यांनीं स्थापन केलेल्या शास्त्रीय संस्थेंतून जेव्हां अनेक जगदीशचंद्र बोस व प्रफुल्लचंद्र राय निर्माण होतील, तेव्हां त्यांच्या आत्म्याला धन्यता वाटल्यावांचून राहणार नाहीं. ह्मणून त्यानीं दिलेल्या अमूल्य देणगीबद्दल उतराई होण्यासाठीं तरी त्यांच्या संस्थेंतून असे शास्त्रज्ञ लवकर पुढें यावेत असें तूर्त आह्मी इच्छितों.

## शोचनीय मृत्यु

### कैलासवासी लक्ष्मण नरसिंह इनामदार बि. ए. एल्. एल्. बी.

या प्रांतांत इंग्रजी अंमल सुरू होण्याचे वेळीं जीं विद्वद्रत्नें आलीं त्या सर्वांत प्रमुखत्व रावबहादूर श्रीराम भिकाजी जठार यांचें होतें. डाक्तर सिक्लेअर यांच्या कारकिर्दीत शाळाखात्यांत जी भरती झाली ती सर्व यांच्या हस्तें झाली. पुढें स्वतःनींच लावलेल्या वृक्षाची जोपासना करण्याचें काम त्यांजवरच आलें तेव्हां त्यांनीं युरोपियनांत प्राप्ताधिकार सदृश व्यवहारनैपुण्य तर दाखविलेंच. पण जें धोरण जो चाणाक्षपणा व जी सहानुभूतिपूर्वक न्यायबुद्धि दाखविली त्या योगानें सर्व एतद्देशीय आणि युरोपियन लोकांचा आदर संपादन केला त्यामुळें त्यांस यथार्थपणें सुप्रहीत नामपद प्राप्त झालें. त्यांचे चिरंजीव राजश्री बापुसाहेब एका जिल्ह्याचे अधिकारी असून त्याचें सर्व सुखदुःख आणि त्याची भरभराट व प्रगति अगर मानसीक स्वास्थ त्यांचे हातीं आहे व ते आपली जबाबदारी प्रत्येकानें मान डोलवावी अशाच तऱ्हेनें पार पाडीत आहेत तरी देखील आह्मास जो त्यांचेबद्दल आदर आणि अभिमान आहे तो ते अशा सत्पुरुषाचे धन्य पुत्र आहेत ह्मणूनच बरेच अंशानें अधिक प्रबळ आहे. तसेंच नुकत्याच झालेल्या परीक्षेंत उत्तीर्ण होऊन लखनौस एका दवाखान्यावर सिविलसर्जन झालेल्या त्यांच्या तृतीय चिरंजिवांबद्दल ह्मणजे राजश्री निळकंठ श्रीराम जटार यांबद्दल आह्मास जो आनंद होतो तो तरी त्यांच्या लोकोत्तर तिर्थरूपाच्या बद्दल वसत असलेल्या आमच्या पूज्यबुद्धी मुळेंच होय.

अशा वंदनीय घराण्यावर गेले मंगळवारीं ह्मणजे तारीख २९ सप्टेंबर रोजीं मोठा दुःखदायक प्रसंग ओढवला. राजश्री लक्ष्मण नरसिंह इनामदार बि. ए. एल् एल बी. हे आपले प्रांतांत बहुतेकांस माहीतच होते. ह्यांचा विवाह रावबहादूर जठारांच्या द्वितीय कन्या गोदूबाईबरोबर झाला होता ते दारवा, एलिचपूर, वगैरे ठिकाणीं मुन्सफ होते. नंतर बिलासपूर, धमतरी, रायपूर आणि नागपूर येथें कांहीं दिवसपर्यंत मुन्सफ राहिले. मी मोठा निःपक्षपाती व कर्तव्यप्रिय आहे असें सिद्ध करून देण्यासाठीं प्रत्येक नेटीव आफिसरास कांहीं व्यक्ती लागतात कीं ज्यांच्याबद्दल कांहीं अभिप्राय देत गेल्यानें आपली कार्यतत्परता विशेष प्रमाणानें व ढोबळपणानें स्थापीत व्हावी. अशी परिस्थिती असतांही राजश्री लक्ष्मणराव उर्फ बाबासाहेब जेथें जेथें राहिले तेथें तेथें त्यानीं प्रामणीकपणाबद्दल दाक्षिण्य तत्परतेबद्दल, लोकांस खरा न्याय मिळावा अशा इच्छेबद्दल आणि यत्नाबद्दल वकील आणि पक्षकाराची आदरबुद्धीच संपादन केली. लोकादर आणि लोकमान्यता संपादणें फार कठीण आहे. दहा वर्षांच्या अवधींत राजश्री बाबासाहेब यांस हीं पूर्ण लाधलीं होतीं. त्यांचे पुतणे राजश्री अप्पासाहेब येथें वकिली करीतच आहेत.

राजश्री बाबासाहेबांस दैव मात्र सदैव प्रतिकूळ होतें. ते कोल्हापूर संस्थानांत केरवाड जहागिरीचे इनामदार होते. तेथें त्यांचे वडील कनिष्ठ बंधु असल्यामुळें व संस्थानात अलिकडे प्रसृत होणाऱ्या अनियमितपणामुळें अग्रजन्माधिकार तत्व नवीनच लागू केल्यामुळें हे नियंत्रित धनास आणि उत्पन्नास एकाएकी आचवले. तेव्हांपासून त्यांच्या मनास बरीच उद्विग्नता आली. सुखस्थितीनंतर विषमावस्था जें दुःख देते तिचा अनुभव त्यांस आला. पण एक दोन वर्षांतच ते एल् एल् बी. झाले तेव्हांही हल्लीं प्रमाणेंच किंबहुना अधिकच कायदे पदवीधाराची सरकारास वाण होती. राजश्री बाबा विनयशील, सात्त्विक, सत्यप्रिय व मार्मिक पण मितभाषणी होते. ह्मणून त्यांनीं नोकरी पत्करली व विषमावस्था पार पाडली. त्यास पांच पुत्र व तीन कन्या आहेत. थोरले पुत्र नारायणराव सोळा वर्षांचे असून गेले वर्षीं म्याट्रिक्युलेशन पास झाले. सोळा वर्षांच्या वयापासून तों दीड महिन्याच्या वयापर्यंतचीं आठ मुलें, अननुभूत दुःख अशी पत्नी, तीन सहोदर व त्यांचा परिवार आणि एका पूर्ववियुक्त सहोदराचा परिवार इतक्यांस किती दुःख होत असेल याची कल्पना होणें अशक्य आहे

मे महिन्याच्या सुट्टीचे जरा पूर्वीं यांची प्रकृति नागपुरीं बिघडली. ती अधिक अधिक बिघडतच गेली. शेवटीं उमरावती येथें जटार घराण्यास व इनामदार कुटुंबास दुःखात ढकलून निर्दय काळानें त्यांस उचलून नेलें. सर्वांत इतक्या पितृचिंतनवियुक्त झालेल्या मुलांच्या मातोश्रीस किती वेदना होत असतील तें एक ईश्वरासच माहीत.

राजश्री बापुसाहेब जटार वडिलांप्रमाणेंच धीरवान, आणि अन्तःशोकानें विव्हळ झाले असताही बाह्यवृत्तीवर त्या शोकास न दिसू देणारे आहेत. परंतु अशा प्रसंगीं बाह्यशांतीपेक्षां मानसीक शान्तीची अपेक्षा विशेष

असते. अशा प्रकारचे आघात सहन कर-ण्यांत जी तीतिक्षा पाहिजे ती ईश्वर त्यांस व एवढ्या मोठ्या कुटुम्बास देईलच.

आह्मी मानवच आहों. सुखाचे जागीं दुःख संचरू लागल्यास, आशा आणि उमेदीच्या जागी निराशा व नाउमेद झाल्यास जें मनुष्यास वाटतें तेंच आह्मास वाटलेंच पाहिजे. ज्यांस ज्यास बाबासाहेब माहित होते ते सर्व त्याच्या या सुमारें चाळीस वर्षांच्या वयांत त्यांस आलेल्या मरणानें दुःखि आहेत. सहानुभूति दुःखभार कमी करीत असेल तर उभय कुलें आणि विशेषतः अजाण व अल्पवयस्क बालकांच्या मातोश्री आपलें दुःख आवरून घेतील.

## परंधाम

गेल्या शुक्रवारीं दोनप्रहरीं रावसाहेब विनायक कोंडदेव ओक पेनशनर डिपुटी इनस्पेक्टर, मुंबई यांनीं आपला लेखनाचा दीर्घ उद्योग चालू असतांनाच स्वर्गाचा रस्ता धरला हें ऐकून मराठी वाङ्मयाचा एक अनुपमेय पुरस्कर्ता एक प्रेमळ सरस्वतीचा भक्त व बालविद्यांस विद्यामृत पाजणारा एक वृद्ध पितामह कालवश झाला ह्मणून कोण मराठी वाचक त्या ८० वर्षांच्या वृद्ध मुनीचे सद्गुण आठवून त्यांस परंधाम लाभो ह्मणून ईश्वराची प्रार्थना करणार नाहीं बरें !

## वऱ्हाडवृत्त

**हवामानः—** हिवाळ्याला चांगला प्रारंभ झाला आहे. तथापि मध्यंतरी ढग येऊन वातावरणांत विशेष चलबिचल करितात. उष्णता प्रखर असून विश्वामित्री उन्हाळ्याची चांगली जाणीव देते. रोगराई नाहीं ही समाधानाची गोष्ट खरी, पण मूषकांच्या हालचाली जर्मन सैन्या प्रमाणें बहुविध व सार्वत्रिक झाल्या आहेत.

**नवा तारा.—** अलिकडे रोज सायंकाळीं अनुराधा नक्षत्राच्या नागफणीच्या जवळ एक अत्यंत तेजस्वी तारा दिसत असतो आणि त्याचा अस्तहीं अनुराधा नक्षत्रा बरोबरच नवाच्या सुमाराला होतो. प्रथमतः हा शुक्र असावा अशी भूल पडते. पण शुक्रापेक्षां कितीतरी पटीनें तो अधिक तेजस्वी आहे. . जवळ जवळ याचा अर्ध चंद्रप्रकाशाइतका प्रकाश असतो. आणि शुक्राची गति व शुक्राची पाश्चिम क्षितिजांतील जागा यांच्याशीही ह्या ताऱ्याचा मेळ नाहीं. सध्यां संध्याकाळीं हा शुक्र जरी असला तरी देखील हा अत्यंत तेजस्वी दर्शनीय व आल्हाद कारक तारा पाहून नेत्राचें साफल्य करण्यास कोणीही चुकूं नये.

**सनातनधर्मपरिषदः—** अकोलें येथील सनातन धर्मसभेच्या आश्रयाखालीं हें वार्षिक संमेलन दुसऱ्यानें येथें गेल्या बुधवारपासून तीन दिवस भरलें होतें. ह्या परिषदेचा सभामंडप मोठा विस्तीर्ण व मोठा शोभिवंत असा केलेला होता. ही परिषद ह्मणजे ज्ञानयज्ञच आहे. आणि त्याचें सर्व श्रेय येथील बहुतेक अंशानें मारवाडी लोकाकडेच आहे. दररोज संध्याकाळीं व रात्रीं स्त्री पुरुषांचा बराच मोठा समुदाय जमत असे आणि पंडित वैजनाथजी व्यास, रामकुमारजी शर्मा, मुरलीधरजी मिश्र, नंदकिशोरजी शुक्ल, श्रवणलालजी इत्यादि नामांकित वक्त्यांची निरनिराळ्या धर्म विषयावर व्याख्यानें झालीं. जेव्हां जेव्हां धर्म संस्था आपला कायक्रम सर्वोपयोगी करतात तेव्हां तेव्हां त्या सजीव सतेज व कार्यक्षम असतात आणि या दृष्टीनें आह्मी या आकोल्याचे मंडळीचा विशेष गौरव करतों आणि त्यांनीं लोकोन्नतीच्या वाटावरील अडथळे केरकचरा दूर करून त्या इतक्या झाडून साफ केल्या याबद्दल आह्मी येथील चालक मंडळीचे आभार मानतो.

महाराष्ट्र सामाजिक परिषदः—ही परिषद यंदा उमरावती येथें भरावयाची आहे. तेव्हां तिच्या पूर्व तयारीला अनुलक्षून नामदार रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी हे काल रोजीं आकोल्यास आले होते. आणि त्यांनीं येथील कांहीं सभ्य गृहस्थास रावबहादूर महाजनी यांच्या दिवाणखान्यांत बोलावून पुढील सभेच्या कार्याची रूपरेषा थोडी बहूत रेखाटून घेतली.

**सुट्टी—** दिवाळीच्या महोत्सवानिमित्त पुढील ह्मणजे ता. १९ आक्टोबर १९१४ च्या अंका संबंधानें वाचकवर्ग आमची रजा मंजूर करितील असा भरंवसा आहे.

## इंपीरियल रिलीफ फंडाला चिखली तालुक्यांतील लोकांनीं रुपये ५० व जास्त रकमा दिल्या त्यांची यादी.

| नांव | रकमा |
|---|---|
| अमडापुर | |
| रा. रा. किसनदास रामचंद्र मारवाडी | रु. १५१ |
| " शेख रुस्तुम वल्लद फकीर महंमद | " ७५ |
| " महमद इस्मायल वल्लद शेखलाल | " ७५ |
| " हाजी मलंग हाजी शेखचांद | " ५१ |
| " रंगराव पर्वतराव देशमुख | " ७५ |
| " रामरतन रामप्रताप मारवाडी | " ५१ |
| " रूपराव हनमंतराव देशमुख | " ५१ |
| " मुनिरुद्दीन | " ५० |
| मंगरूळ | |
| " विठोबा रामजी कासार | " २५० |
| " मोतीलाल गणेशदास मारवाडी | " २०० |
| " रामलाल रतनलाल | " ५० |
| उंद्री | |
| " सदाशीव मुकुंद | " ५१ |
| " लक्ष्मणदास | " १०१ |
| " जिवनदास बिरडीचंद | " ७५ |
| " मूळजी मनसींग | " ५१ |
| " देवसिंग | " ७५ |
| " रामकृष्णदास रामरतन | " ७५ |
| दसलस | |
| " मोतीराम बाळाजी | " ६१ |
| चिखली | |
| " रंगाप्पा गंगाप्पा बोंद्रे | " ३०१ |
| " करीमअल्ली खुदाबक्ष | " ३०१ |
| " जयनारायण चतुर्भुज | " ३०१ |
| " हरिनारायण सराफ | " १०१ |
| " ओंकार चतुर्भुज मारवाडी | " १०१ |
| " बद्रीनारायण अनंतराम | " ५१ |
| " मोतीलाल मोहनलाल | " १०१ |
| " नारायणअप्पा बापुअप्पा | " ५१ |
| " विश्वनाथअप्पा लक्ष्मणअप्पा | " ५१ |
| " शिवनारायण रामप्रताप | " ३०१ |
| " बंडाप्पा विठोबाअप्पा | " ३०१ |
| " विष्णुसा गोपाळसा | " ३०१ |
| " महमदअल्ली हुसेनअल्ली बोहरी | " १०१ |
| " बळवंत रामचंद्र परांजपे | " ५१ |
| " बलदेव रामलाल मारवाडी | " १०१ |
| " चंदासिंग | " ६१ |
| " दत्तात्रय अंबादास | " ६१ |
| " मंजाबाई बोंद्रे | " १०१ |
| अंत्री खेडकर | |
| " भिकाजी माधाजी | " १२१ |
| मेरा बुजरुक | |
| रा. रा. माधाजी अमरसिंग | " ७५ |
| " तुळसीराम यशवंत | " १५१ |
| " सलाप्पा विठोबा आप्पा | " १०१ |
| " तुकाराम यल्लाप्पा | " ७५ |
| " यशवंत शिवाजी | " ६० |
| " जानु देवासिंग | " ६५ |
| शिवणी अरमाळ | |
| " कृष्णाजी तुकाराम | " १२५ |
| " रामराव दगडू | " ५१ |
| भरोसा | |
| " दादाजी जयराम | " ५१ |
| अंचरवाडी | |
| " रतनलाल रामदास | " १०१ |
| देऊळगांव माही- | |
| " लक्ष्मीचंद रुपचंद | " १०१ |
| शेळगांव | |
| " जयराम तुळजाजी | " १०५ |
| मीसळवाडी | |
| " तुकाराम वेचाजी | " १४५ |
| देऊळगांव राजा | |
| " श्री बालासाहेब संस्थान | " ५०० |
| " गोपाळ कन्हीराम | " ५१ |
| " मवेराज लक्ष्मणदास | " ७१ |
| " सुरजमलाल सोनुलाल | " ७१ |
| " जोहरमल उमेदमल | " ६१ |
| " राजाभाऊ पंडित | " १०१ |
| " धनसा मलासा लाड | " ७१ |
| " बनीचंद चिमणाजी | " ७५ |
| " ओंकारसा सखारामसा लाड | " ७१ |
| " रामदास दादूराम | " ५१ |
| " व्यंकासा सोनासा लाड | " ५१ |
| " गोविंदसा माणिकसा लाड | " ७१ |
| " जय नारायण राधाकिसन | " ७१ |
| " नारायण रामचंद्र मुधोळकर | " ५१ |
| " मोतीलाल कलाल | " ५१ |
| साकळी बुजरुख | |
| " वामन श्रीधर | " ५१ |
| " दादाजी अनंदा | " ५१ |
| " भगवंतराव भिकारराव | " ५१ |
| " सखाराम अप्पा | " १०१ |
| मार्डे | |
| रा. रा. हिरामण मनसाराम | " १०१ |
| एकूण रु. | ७४३७-०-० |
| रु. ५० चे खालील रकमा एकूण रु. | ९२८८-४-६ |
| कूल रु. | १६७२५-४-६ |

## नोटीस

सौ० गंगु मर्द मुरारी कासार रा० इसोली ता० चिखली इजला:—

खालीं सही करणार कळवितो की तुझी नोटीस पावली. तूं माझा भाऊ व्यंकु मेत याची बायको असून त्याजला मुलगी सुंदराबाई आहे. तूं दुसरा नवरा मुरारी हा केला व गंधर्व लागून गेले तेव्हां आम्ही मुलीस घरीं नेले असताही तूं आम्हांस मुलगी अज्ञान आहे तेव्हां २-३ वर्षें मजजवळ ठेऊन तुमची तुमचे हवाला करीन असें कळविलें. तेव्हां मुलगी नेऊं दिली. हल्लीं ४ माहिने झाले असतील तेव्हां तूं मुलीस जाणेफळचे लग्नास घेऊन आली. तेव्हां मुलीस घरीं ठेवले असतां मे० स०-ई० साहेब जाणेफळ यांचे समोर व पंचासमोर ८ दिवसांत मुलगी परत तुमचे घरीं आणून देऊ असा तूं करार करून त्याप्रमाणें मुलगी आणली नाहीं. व नोटीस केली तरी तूं योजीलेले ठिकाणीं अगर त्याहून जास्त पसंतीचे ठिकाण तुजला पंसत पडेल तेथेंच मुलीस देण्याचा आमचा विचार आहे. मात्र सदर्हू मुलगी आमचे घराण्यांतील असल्यामुळें अह्मांस सदर्हू मुलीचें लग्न आमचे दारीं जगरितीप्रमाणें जानेफळास व्हावे अशी इच्छा आहे. तरी तूं ज्याप्रमाणें योजना केली त्याप्रमाणें सर्व कार्याचा घाट आणून कार्य आमचे दारीं करावे. आह्मीही सदर्हू मुलीचे लग्नास आमचे शक्तीनुरुप पैसे लावण्यास तयार आहोत. तरी मुलीस १५ दिवसाचे आत आमचे येथें आणून घालावे तारीख ३०-९-१४ ई०

सही.

गणपत वल्लद तुकाराम कासार द० खुद.

आनंदा तुकाराम कासार द. खुद.

नो० नं० ४२०

## नोटीस

नोटीस बेशमी मुकुंदराव तुकाराम देशमुख रा० राहित ता० आकोला

यांसः—

खालीं सही करणारा कडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचा सख्खा अज्ञान बंधू नागोराव यांचे कारितां तुह्मी पालनकर्ते ठरले असून त्या अज्ञानाचे इस्टेटीबद्दल शक्य तितकी काळजी तुम्ही वहावयाची परंतु तसें न करितां तुमचें वर्तन आमचे दृष्टीला विरुद्ध दिसते. तुम्ही सांप्रत व्यसनाधीन झाले असून त्यापासून अज्ञानाचे इस्टेटीला मार्ग धोका येईल अशी भीती अम्हाला वाटते. तुमच्या हिश्याच्या अर्ध्या इस्टेटीचें तुम्हीं कांहीं केलें तरी चालेल. परंतु अज्ञानावर तो प्रसंग आणणें आपणांस उचित नाहीं आपण सांप्रत जमीन गहाण देऊन कसबे वलगांव ता० उमरावती येथील रा० देवराव पाटील यांजजवळून कांहीं कर्ज काढलें आहे असे ऐकतों. तरी हें गैर आहे. व असे करण्या पासून अज्ञानाची अर्ध्या इस्टेटीची नुकसानी जर कांहीं झाली असेल अगर होईल त्या बद्दल तुम्हास कायदेशीर जबाबदार धरले जाईल. या पुढें तुम्ही अशा भानगडी उपस्थित करूनये. क० ता० ६-१०-१९१४ इ०

सही

केशवराव बाजाजी देशमुख अज्ञानाचे चुलतभाऊ अज्ञान नागोराव तुकाराम दे० यांचेकरितां

नो. नं. ४२३

**वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.**

नामर्दास मर्द बनविणारी

**राजवंशी नवरत्न याकुती,**

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

**राजवंशी सांध्याचें तेल,**

किंमत रुपये १ ट्रेड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे.

सरकारचे अॅनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

**परमा सायरप.**

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध- एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,

खबुतरखाना भुलेश्वर मुंबई.

नो० नं० १९



शेंकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

**सरदी कॉलरा संग्रहणी पोटदुखी**

उलटी, झाडा, संधिवात, फॅपरें, प्लेगची गांठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण, प्लेग, विंचवाचे दंश वगैरेवर अत्यंत गुणकारी.

**जव्हेरियनचें जीवनमिक्श्चर**



हजारों लोकांचे प्राण वांचले आहेत. विश्वास ठेवून वापरा. मोठी शि. रु. १॥ लहान शि. ८१२

वी. एच. जव्हेरियन कंपनी,

खलासीचकला, मुंबई.

नो. नं०३३७



## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.
THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

### FUNDs 4½ CRORES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

### Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|---|
| | | Rs. |
| 1888 | 8,668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17,657 | 4 68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6 81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8 47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 64,097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11,48,6 42 | 36 38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80 05,818 |
| 1898 | 31,36,422 | 1,41,3235 6 |
| 1903 | 41,07,009 | 2,1[illegible],95,947 |
| 1908 | 53,55,639 | 3,2[illegible],79,991 |
| 1913 | 69,44,548 | 4,41,61,889 |

### RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made upon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

"At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently look forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essential in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL
Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

*M. deSOUZA,*
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh,* NAGPUR

N. No. 13



दिपवाळीच्या मांगलिक प्रसंगीं बक्षीस देण्याकरिता.

**सेन्टचा राजा व सुगन्धाचें भान्डार.**



# ओटो

## दिल--चमन

( रजिस्टर्ड )

आजपर्यंत बाजारांमध्यें निघालेल्या सर्व सेंट, अत्तरां- पेक्षां हें **ओटो दिलचमन** जास्त टिकाऊ मधुर आणि अधिक खुशबोदार आहे अशी आह्मी पुरी खात्री देतों. जर तुह्मी **ओटो दिल-चमन** वापरला नसेल तर, एक वेळ वापरून खातरी करून घ्या. ह्यांत स्पिरिट बिलकुल नाहीं, **चमेली** आणि **बटमोगरांच्या** ताज्या फुलांच्या अर्कापासून तयार केलेला आहे. फक्त २, ३ थेंब रुमालावर किंवा वस्त्रावर टाकल्यानें एकदम अनेक सुंगधाचें भांडार प्रस्तुत होऊन तुमच्या आसपासच्या सर्व लोकांच्या मनास आनंद होईल.

किं. -॥ ड्रामची टयुब ८ आ. | किं. -॥- औं. बा. २ रुपये.
" १ " " १२ आ. | व्ही. पी. पो. खर्च वेगळा,

**ओटो दिलचमनचीं सुगंधी कार्डें दर डझनास १२ आणे**

**सेंटच्या नमुन्यासाठीं दोन आण्याचीं टिकीटें पाठवा.**

सेंट, ओटो किंवा सुगंधी कार्डें खरेदी करतेवेळीं **ओटो दिलचमन** हें नांव बरोबर वाचून पहावें. जर तुमच्या जवळच्या दुकानदाराकडे मिळत नसेल तर, खालील पत्त्यावर लिहून माल मागवावा.

एकटे एजंटस् **एच्. आर. मोदी आणि कं.**

तारेचा पत्ता "सेकेरीन" मुंबई. } विलायती औषधें व परफ्युमरींचे व्यापारी प्रिन्सेस स्ट्रीट, मार्केटसमोर मुंबई.

नो. नं. ३२९


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४८ ] आकोला--सोमवार तारीख २६ माहे आक्टोबर सन १९१४ ई० [ अंक ४१

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.

हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील. नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ { J. G. Ridland. एजंट

नो. नं ४

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २९३/४ तोळे असतें.

मुंबई बँक आकोला २१-९-१० { J. G. Ridland. एजंट

नो० नं० ५

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन रविवार पेठ नाशिक सिटी.**

नो. नं. २९

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० ग्रेग्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ८८ व्हीपीनें ८१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही.पी.नें रु० १८६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत

**पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी**

नो. नं. ६

### अनुभवून पसंत ठरलेली

केशनाशकपूड किं० ४ आणे, दंतमंजन कापूर, ओव, पेपरमींट, सुंठ, पुदीना, हिंग, अजवान, दवना यांचे अर्क, किं० प्रत्येकीं ४ आणे, कावीळ, व मुळव्याध, यांच्या अप्रतीम गोळ्या किं १। रु० खरुज गजकर्ण, खवडा, इसब, नायटा, आगपैण, व्रण, चिखली, मुर्की, ओली खाज, जखम, नखाविषयीं, तमाम रोगावर चालणारा १ च 'दिलखुष' मलम किं ४ आणे ३ दिवसांत वरील मलमानें गुण येतो पौष्टीक चहा किं ४ आणे, वातनाशक तेल किं १२ आणे, विंचवावर पूड किं १। रु० व डोळ्यांतील वेगळे सोडण्याचे औ. किं ४ आणे, वि० खु० पत्रद्वारें, वंग प्रवाल हात भट्टीचे किं० तोळ्यास २ रु०

पत्ता – व्ही० आर० मुळे, नांदुरा. जी० आय० पी०

नो० नं० ९

### गुण न आल्यास पैसे परत.

आमच्या प्रामाणिकपणाबद्दल खात्री करून घ्या. मूळ किं० रु० ४ कमी केलेली किंमत पोस्टेज सह रु० २८≡ यूथिन हें सतत सर्वत्र ५० वर्षे अनुभवलेलें असून त्यापासून नपुंसकत्व व अन्य कारणानें आलेला कमकुवतपणा यावर खात्रीनें गुण येतो अशाबद्दल खात्री झालेली आहे.

पत्ता.—यूथिन मॅनुफॅक्चरी चित्तूर

नो० नं० ४०८

श्री

हर्ष! हर्ष!! हर्ष!!!

### स्वार्थ आणि परमार्थ यांची लूट!!

### प्रालब्धाच्या परीक्षेची संधि!

त्वरा करावी. समय चुकल्यावर पश्चात्ताप होईल.

चोपाई.

रामकृपा जिहींपर जब होई ॥
रंक होय धनपति महि सोई ॥
सो हरिकृपा होइ फुरजाना ॥
त्यागहु जिनप्रभू आस सुजाना ॥१॥

एक लक्ष --किंवा --पन्नास हजार --किंवा पंचवीस हजार इत्यादि अधिकांत अधिक एक लक्ष आणि कमींत कमी पंचवीस रुपये पर्यंत जसें ज्याच्या भाग्यांत असेल तो केवळ दोन रुपयामध्ये लाभ मिळतो या विषयीं संपूर्ण निश्चय करण्यासाठीं दोन रुपये मनीऑर्डरनें पाठवावेत अगर एक कार्ड लिहून पाठवावें. ही मामूली जाहिरात नाहीं. यावर विश्वास ठेविला पाहिजे

पत्ता:— सेक्रेटरी, पुण्य विभाग सभा, धोलपूर रियासत-राजपुताना,

नो. नं. ३९६

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थांनातील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १८८

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरुज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ७

### नोटीस

धी अकोला सेंट्रल बँक लिमिटेडचे शेअर होल्डर यांस कळविण्यांत येतें कीं सन १९१२–१३ व १९१३—१४ ह्या दोन सालासाठीं नफा वाटावयाचा आहे तरी ज्या शेअर होल्डरांचे पत्ते बदलले असतील त्यांनी आपला नवीन पत्ता कळवावा तसेंच जे शेअर होल्डर मयत झाले असतील त्यांच्या वारसांनी आपलें नांव पूर्ण पत्ता व वारस सर्टिफिकिटें बँकेकडे पाठवून द्यावीं.

R. V. Mahajani
सेक्रेटरी
धी अकोला सेंट्रल बँक लि०

नो. नं. ४१९ तारीख ३०--९--१९१४

### जाहिर नोटीस.

[ कलम ७ आक्ट ७ सन १८८९ प्रमाणें. ]

सक्सेशन सार्टिफिकीट नंबर ९ स. १९१४

बिद्यमान सीनीअर सबजज साहेब बहादूर कोर्ट अकोला यांचे कोर्टांत

अर्जदार नारायणगीर देवगीर गोसावी राहणार शिवण खुर्द तालुके मुर्तिजापूर जिल्हा अकोला.

ज्याअर्थी मयत देवगीर खुशालगीर जात गोसावी राहणार शीवण खुर्द तहसील मुर्तिजापूर जिल्हा अकोला याचें कर्ज वसूल करण्यासाठीं सराटीफकीट मिळण्याबद्दल वरील अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याअर्थी सदरहु मयताचे माल मिळकतीवर किंवा तिचे काही भागावर आपला हक्क आहे ह्मणून जे कोणी दावा करीत असतील त्या सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं सदरहु अर्जाची सुनावणी करितां नेमलेल्या दिवशीं ह्मणजे तारीख १७ माहे आक्टोबर सन १९१४ इसवी रोजीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्काबद्दल लेखी कैफियत दाखल करावी असें न केल्यास अर्जदार यास सराटिफिकीट दिलें जाईल व मग पुढें कोणतेही प्रकारची तक्रार ऐकिली जाणार नाहीं कळावें ता० ७।१०।१९१४

D. K. Kolatker.

नो० नं० ४२४

सीनीअर सबजज्य अकोला.

### नोटीस

या जाहीर नोटीसीनें खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं धोंडु वल्लद मारोती जात कुणबी आडनांव खोडक्या राहणार भाडगुनी तालुके मलकापूर जि० बुलढाणा यानीं श्रीराम शालीगराम मालक फत्तेलाल शालीगराम वगैरे दुकान घुसर तालुके मलकापूर यांस रुपये २५० चे गहाण खत करुन देऊन ते गहाणखत मलकापूर सबरजिस्टर कचेरींत नोंदून दिलें आहे. सहर्हु २५० रुपयांच्या गहाणाचा दस्तऐवज आमचा गुमास्ता सीवदान वल्लद साबळाराम रा. घुसर यानीं ता० ३०-९-१९१४ ई. रोजीं भाडगुनी येथें फेर पाळीचें रजीस्टरांत नोंद करण्याकरितां जाऊन गहाणाचे दस्तऐवजाची नोंद करून नंतर ह्याचे

दिवशीं खुसर येथें परत येतांना सदर्हु गहाणाचा दस्तऐवज गहाळ झाला आहे. त्या दस्ताऐवजाचा आमचा गुमास्ता यानीं आजपावेतों तपास केला परंतु शोध लागला नाहीं. सबब वेळ लागला आहे. सबब या नोटिशीनें सर्वत्र लोकांस जाहीर करण्यात आलें आहे. ता० १२-१० १९१४

सही.

श्रीराम शाळिगराम मालक फत्तलाल साळीगराम दुकान खुसर द० यादव आबाजी लाड रा. खामगाव दस्तुर खुद्द.

नो० नं० ४२५

## जाहीर नोटीस

खालीं सही करणार ओंकारराव जानराव देशमुख रहाणार कवठळ तालुके जळगाव जिल्हा बुलडाणा याजकडून या नोटीशीनें जाहीर करण्यात येत आहे कीं मौजे खंड खुर्द, प्रगणे जामोद, तालुके जळगाव जिल्हा बुलडाणा येथील सर्वे नं०२१ एकर१२ गुंठे२० आकार रु०२३ चें शेत आमच्या मालकीचें असून तें आह्मीं आमची चुलती सजनबाई जवजे गुलाबराव देशमुख इजला ती हयात आहे तों पर्यंतच तिचे खावटी व अन्नवस्त्राकरितां तिजला दिलें आहे. तिजला हें शेत कोणाकडे गहाण' नजर गहाण' ताने गहाण किंवा खरेदी करून देण्याचा कोणत्याही प्रकारचा हक्क नाहीं सबब हें शेत लिहून घेऊन अगर खरेदी करून घेऊन कोणी आमच्या चुलतीस पैसे वगैरे देऊं नये. तसें केल्यास त्या देण्याचा बोजा सदर शेतावर मुळींच रहाणार नाहीं. आणि अशा देण्या बद्दल आह्मी कोणत्याही प्रकारें जबाबदार होणार नाहीं. सावकारानीं ही गोष्ट ध्यानात ठेऊन सावध रहावें. कळावें. ता०१३।१०।१९१४

सही

ओंकारराव जानराव दे० द० खुद

नो० नं० ४२९

## जाहीर नाटीस

नोटीस देणार १ अबदुल अजीज, २ अबदुल गनी, ३ अबदुल मजीद, ४ महमद ईसाक व ५ अमीरबी वल्लद गवष महमद सर्व मुसलमान रा. मंगरूळ पीर अज्ञान पालन करणार इष्टमित्र अबदुल अजीज वल्लद शेख फरीद मुसलमान रा. दिग्रस खुर्द ता० दारव्हा जि० एवतमाळ

मी सर्व लोकांस व साहु सावकार यांना या नोटीशीनें जाहार करितों कीं वरील अज्ञानाचा आणि त्यांचा वडील भाऊ अबदुल गफुर वल्लद गवष महमद रा० मंगरूळ पीर यांचे बापानें बरीच स्थावर जंगम मिळकत संपादन करून ठेविली आहे. सदर्हू अज्ञानाचा आणि त्यांचा भाऊ अबदुल गफूर यांचा बाप अंदाजा १३-१४ महिने झाले मरण पावला आहे व त्याचे मरणानंतर त्यानें मिळविलेल्या सगळ्या संपत्तीचे वारस वरील अज्ञान आणि त्यांचा भाऊ अबदुल गफूर हे झाले अहेत परंतु ती सगळी मिळकत वरील मुलें अज्ञान असल्यामुळें आबदुल गफूर हा एकटाच बळकावून बसला आहे आणि त्या मिळकतीची योग्य कारणाशिवाय अफरातफर करून राहिला आहे ह्मणून या नोटीशीनें सर्व साहु सावकार लोकांस कळविण्यांत येते कीं वरील अज्ञानानें त्यांचा भाऊ अबदुल गफूर याजवर वि. आ. दि. नज्ज साहेब आकोला यांचे कोर्टांत दावा आणला आहे सबब कोणीही साह सावकार अगर दुसरे कोणी इसमानें सदर्हू अबदुल गफूर याजपासून कोणतीही स्थावर अगर जंगम मिळकत गहाण, खरेदी वगैरे ऱ्हाहींएक घेऊ नये असें कोणी करयास अज्ञानाची मिळकत त्याजबद्दल जबाबदार राहणार नाहीं. कळवें ता. १३।१०।१४

सह्या

अबदुलअजीज वा। गवषमहमद
२ अबदुलगनी वा। गवषमहमद
३ अबदुलमजीद वा। गवषमहमद
४ अबदुलईशाख वा। गवषमहमद
५ अमीरबी वा। गवषमहमद
हे सर्व अज्ञान पालन करणार इष्टमित्र अबदुल अजीज वा। शेखफरीद दस्तुर खुद तारीख १४।१०।१४

नो० नं० ४३०

## नोटीस

नोटीस बे० गोविंदा वा। गन्या महार रा० मौजे सेलगाव राजगुरे प्र० सीरपूर ता० वाशीम यांस:—

नोटीस देणार कडती मर्द गोविंदा महार रा० मौजे पेनबोरी प्र० सीरपूर ता० वाशीम इज कडून नोटीस देण्यात येते कीं तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून लग्न झाल्यास सुमारें २५ वर्षें झालीं तुमचे पोटची मुलगी नामे सकी १० वर्षाची आहे ९ वर्षें झालीं तुह्मी मला नादवीत नसून अन्न वस्त्र देत नाहीं ह्मणून मी आपले आईबापाचे घरीं राहून कर्ज काढून मी व माझे मुलीचा निर्वाह चालवित व तुह्मी दुसरी बायको करून आपला संसार करिता व माझा संसार बुडाला आता मला कर्जही कोणी देत नाहीं व मोल मजुरींत माझा व मुलीचा निर्वाह होत नाहीं ह्मणून तुह्मास या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसाचें आत माझे व मुलींचे अन्नवस्त्राबद्दल झाले तें कर्ज दर साल रु० ५० प्रमाणें ९ वर्षांचे रु० ४५० व तुमचे मुलीचे लग्नास खर्च झाला तें कर्ज रु० ५० एकूण रु० ५०० पाचश आणून द्यावत नाहीं तर हीच नोटीस फारकती समजावी व या फारकती आधारें मी दुसरा नवरा करीन. कारण पुष्कळवेळां मला तुह्मी घेऊन जा असे पंचानें साागतल परंतु तुह्मी नेत नाहीं त्यापासून माझे संसाराची हानी झाली सबब तुह्मी वरील शर्तीला न पाळल्यास या फारकती आधारें दुसरा नवरा करीन मग तुमची कोणतीच प्रकारें तक्रार ऐकली जाणार नाहीं क० ता० ९ १०। १९१४

सही

कडती मर्द गोविंदा महार नि०

नो० नं०४२७


# डाक्टर केतकर

## यांचे संकीर्ण लेख

किंमत १ रु० ४ आणे

श्रुतिबोध मुद्रामंदिर मुंबई



# वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक शुद्ध ८ शके १८३६


## खरी सुधारणा.

### ( भ्रामक सुधारणेचा निरास )

१ एकंदर मानवजातीविषयीं विचार केला असतां असें आढळून येईल कीं, हल्लींचें युग, आधिभौतिक शास्त्रांत सुधारणा आणि शोध, ह्यांच्या मालिकेचेंच बनलेले आहे. वाफेच्या जोरावर चालणारीं यंत्रें, विद्युच्छक्तीच्या जोरावर नेतां येणारे संदेश, बोलणारीं यंत्रें ( फोनोग्राफ ) शारीरिक श्रम वांचविणारी अनेक यंत्रें, आकाशयानें आणि समुद्रांतर्गत चालणाऱ्या बोटी इत्यादि अनेकविध व आश्चर्यकारक साधनाकडे पाहिलें असतां, ह्याविषयीं कोणाचीही खात्री होईल. मानव जातीच्या ज्ञात इतिहासात गेल्या एकाच शतकात जितके शोध लागले आहेत तितके मागील सर्व काळांत मिळून देखील लागलेले नाहींत. एका पिढीनें, दीर्घोद्योगानें व अतुल बुद्धिसामर्थ्यानें लावलेले शोध पुढच्या पिढीस अगदींच सामान्य असें वाटून त्यहीपेक्षा आश्चर्यकारक व विलक्षण असे शोध झपाट्यानें लागत आहेत.

२ पाश्चिमात्य राष्ट्रें व त्यांच्या वर दर्शविलेल्या बुद्धिसामर्थ्यानें दिपून गेलेले इतर लोक, याना असा एक मोठा भ्रम आहे कीं, वर दर्शविलेल्या शोधांच्या योगानें मानवजातीची सुधारणा होत असून तिची झपाट्यानें उत्क्रान्ति होत आहे; निदान ह्या लोकांची अशी ठाम समजूत आहे कीं, सदर सुधारणा आणि शोध ह्यामुळें एकंदर जनसमाजाची इहलोकंची यात्रा पूर्वीपेक्षां फारच जास्त सुखाची झाली आहे. दुर्दैवानें वस्तुस्थिती तशी नाहीं. नूतनोपलब्ध साधनाच्या बाह्य भपक्यामुळेंच यांचे डोळे दिपून गेले असल्या कारणानें, व मनुष्यानें आपल्या सामर्थ्यानें येथवर निसर्गावर विजय मिळविला, अशा अभिमानानें यांच्या विचार शक्तीस प्रासिल्यामुळें, सुधारणेबरोबरच समाजावर ज्या नवीन आपत्ती, दुःखें, संकटें, कोसळलीं आहेत त्याकडे यांचें लक्ष निर्विकार स्थितींत जसें लागलें असतें तसें लागूं शकत नाहीं.

सुधारणेच्या व समाज रचनेच्या केवळ बाल्यावस्थेसच शोभणाऱ्या "बळी तो कान पिळी" ह्या तत्वाचा पाश्चात्य देशांत अजून इतका जारीनें अंमल सुरू आहे कीं, तो सुधारलेल्या समाज शासन पद्धतीशीं अगदींच विसंगत आहे. युरोपात लढाईचीं साधनें इतक्या झपाट्यानें वाढत आहेत कीं, सबंध युरोपखंड ह्मणजे खड्या लष्कराचा छावणीच होय, असें ह्मटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. पाश्चात्य राष्ट्रांपैकीं सुधारणेंत अग्रेसरत्व पावलेल्या अनेक राष्ट्रांत सक्तीचें लष्करी शिक्षण सुरू आहे. दारिद्री मजूर लोकांनीं, धनाढ्य कारखानदार मालकाकडून, आपलीं दुःखें निवारण करण्याकरितां व हक्क शाबीत करण्याकरितां व्यवस्थित व पद्धतशीर रीतीनें केलेल्या संपाना, अनेक वेळा यादवी युद्धाचेंही स्वरूप येउ पहातें. आज मित्तीस सुद्धां कार्लाइल साहेबानीं ह्मटल्या प्रमाणें प्रत्येक दोन राष्ट्रात, वर्गांत, किंवा व्यक्तींत "मी तुला मारू शकेन कीं तूं मला मारूं शकशील" हा एकच प्रश्न आहे. सुशिक्षित व विद्वान् लोकात सुद्धा हें पशुतुल्य शारीरिक शक्तीचें बंड कमी आहे असें नाहीं. भाषा किंवा शास्त्रीय विषय ह्यात पारंगत असलेल्या विद्वानात युयुत्सु लोक आहेत इतकेच नव्हे पण सर्व भूताचे ठिकाणीं दया, समता व शांति धारण करणें, हेंच ज्या धर्माचें प्रधान तत्व अशा खुद्द ख्रिश्चन धर्मात, असे धर्माधिकारी आहेत कीं ते आपल्या व्यासपीठावरून, दुष्ट बुद्धीनें सुरू केलेल्या लढायात आपल्याच हजारो बंधूंचा [ ख्रिश्चन धर्माप्रमाणें सर्व माणसें हीं ईश्वराचीं लेंकरें असल्यामुळें परस्परांत बंधुत्वाचें नातें उत्पन्न होतें ] घात व्हावा एतदर्थ ईश्वराची मदत मागण्याकरितां प्रार्थना करीत असतात!!! आंग्ल भूमींतील थोर व उदार मनस्क कोमलांगीहि सरकाराकडून हक्क मिळविण्या करितां पशुतुल्य क्रूर व घोर अशा उपायांची योजना करितात.

४ आतां ही गोष्ट कबूल केली पाहिजे कीं, पाश्चात्य राष्ट्रांतील अनेक विचारी लोक वरील प्रकाराच्या विरुद्ध आहेत व त्यानीं शांततेचा प्रसार करण्या करितां मोठ्या नेटानें चळवळहि चालविली आहे. तथापि अत्यंत आश्चर्याची गोष्ट ही कीं ज्या यांत्रिक शोधामुळेंच, फार मोठ्या प्रमाणावर व्यवस्थित रितीनें युद्ध करण्याची भावना पोसली जाते व युद्धाकरितां सामग्री तयार करून दिली जाते, त्या यांत्रिक शोधाचे हेच लोक मनापासून अभिनंदन करितात. यांत्रिक शोधामुळें मनुष्याचे शारीरिक श्रम वांचले व तेवढ्याच श्रमात फार जास्ती काम करता येऊ लागलें. ह्यामुळें फार मोठमोठ्या प्रमाणावर अनेक कारखाने अस्तित्वात येऊन त्यात उत्पन्न झालेला माल स्वदेशात असलेल्या मागणीपेक्षां फार ज्यास्त निघूं लागल्यामुळें प्रत्येक कारखानदार देशाला स्वदेशाबाहेर गिऱ्हाईक पहाणें भाग पडलें. युरोप खंडांत दिसणारी अवाढव्य आरमारें व सैन्यें, हीं व्यापारी हिताचे संरक्षणासाठींच निर्माण झालीं असून, आफ्रिका व आशियांतील पूर्वेकडील प्रदेश, यांत व्यापारी वर्चस्वाकरितांच अनेक राष्ट्रांत झटापट लागल्याचें दृष्टीस पडेल.

५ वर लिहिल्याप्रमाणें यांत्रिक शोधातिरेकामुळें फार मोठ्यां प्रमाणावर कारखाने निघून तयार केलेला माल खपविण्याकरितां राष्ट्राराष्ट्रात झटापट लागून युद्धाचें कारण उत्पन्न झालें. पण एवढ्यानेंच थांबलें नाहीं. ह्याच नवीन शोधामुळें लढाईस फारच भयंकर स्वरूप प्राप्त झालें आहे. समुद्रांतर्गतयानें, आकाशयानें, लांब पल्ल्याच्या तोफा, व अनेक स्फोटकारक द्रव्यें इत्यादींचा दिवसेंदी-

वस जास्त शोध लागत चालल्यानें मनुष्य संहाराचें काम पूर्वीपेक्षां फारच सोईचें झालें आहे.

६ संपत्तीची विषम वाटणी हे यांत्रिक शोध व "सुधारणा" ह्यामुळें उत्पन्न झालेलें तिसरें संकट होय. जीवनार्थ कलहाच्या शर्यतींत, अत्यंत मोठ्या प्रमाणावर असल्याशिवाय कारखान्यापासून किफायत होत नाहीं, सबब देशांतील सर्व संपत्ति एकवटून त्यांतून मोठमोठे कारखाने निघतात, व भांडवल पुरविणाऱ्या धनिकांचा वर्ग जास्त श्रीमंत होत जाऊन, काबाडकष्ट करणाऱ्या मजुरांचा वर्ग, दिवसेंदिवस जास्त गरीब होत जातो. जे इंग्रज लोक इतके सामर्थ्यवान शूर आणि बलाढ्य आहेत कीं, त्यांच्या साम्राज्यांत सूर्य कधींहि मावळत नाहीं; ज्यांची भूतदया इतकी प्रखर आहे कीं, जगांतील गुलामगिरीची पद्धत मोडून टाकण्यासाठीं त्यांनीं आपलें सांपत्तिक नुकसान सोसून ही त्या चळवळींत पुढाकार घेतला; ज्यांचें निःसीम राष्ट्रप्रेम व बंधुप्रेम आज जगतीतलावर दुमदुमून राहिलें आहे; अशा इंग्रजांच्या; सुधारणेचें केवळ माहेरघर, संपत्तीचें केवळ भांडार, जगांतलि घडामोडीचें केंद्रस्थान, राजकारण धुरंधरांचें निवासस्थान, कला कौशल्याचें जणुं काय प्रदर्शनच, सारांश आधुनिक सुधारणा व शोध ह्यांचा मनुष्याच्या ऐषआरामाकडे सुखाकडे व सोईकडे ज्यांत शक्य तितका उपयोग केला आहे, त्या खुद्द लंडन शहरांत, जें आज सर्व जगात पाहिल्या मानास पात्र झालें आहे, व जें आपल्या ऐश्वर्याच्या वैभवाच्या व विद्वत्तेच्या जोरावर अमरावतीशींहि स्पर्धा करूं शकेल, अशा त्या लंडन शहरांत राहणाऱ्या मजुरांच्या स्थितीचें अवलोकन करा. डॉ. ए. आर. वॉलेस साहेब लिहितात " लंडन शहरांतील एकंदर १/३ लोक संख्येपैकीं अदमासे ३ लोक दुःसह दारिद्र्यांत दिवस कंठीत असून, त्यापैकीं बहुतेकांना जीवापाड काबाडकष्ट करावे लागतात. कित्येकांना तर कांहींच काम न मिळाल्यामुळें विलक्षण विवंचनेंत व अर्धपोटींच रहावें लागतें, आणि आपल्या सर्व मोठ्या शहरांत व कमी अधिक प्रमाणांत शहराबाहेर सुद्धां मजुरांच्या विपन्नावस्थेचें हेंच चित्र पहावयास सांपडेल!!!" वस्तुस्थितीचें निरीक्षण करून त्यापासून अनुमानें काढण्यात कसलेल्या अशा पाश्चात्य विद्वान लखकांनींच वरील चित्र काढलें असल्यामुळें त्यांच्या खरेपणाविषयीं शंका नको! तथापि यांत्रिक शोधातिशयानें उत्पन्न झालेल्या परिस्थिती परंपरेनेंच ही विपन्नावस्था प्राप्त झाली, हा कार्यकारण संबंध मात्र त्या विद्वान लेखकांच्या ध्यानांत येऊ नये याचें आह्मांस आश्चर्य वाटतें.

७ आधुनिक सुधारणा व यांत्रिक शोध ह्यांचा अत्यंत वाईट परिणाम झटला म्हणजे दिवसेंदीवस वाढत जाणाऱ्या छानछोकीची रहाणी नवीन शोध मुळें पूर्वी माहीत नसलेलीं अशीं अनेक सुखाचीं साधनें निर्माण होत आहेत. तीस कोस चालणारी बैलगाडी व तितक्याच वेळांत ७० । ७५ मैल धावणारी मोटारगाडी यांत किती अंतर आहे! पण तेवढ्यानें मनुष्याचें समाधान झालें आहे काय? मनुष्यस्वभावच असा आहे कीं त्याची हांव कांहीं केल्या सरत नाहीं! जी गोष्ट प्रथम नवीन अद्भुत व मोठी सुखावह वाटते तीच कांहीं काळानंतर रोजच्या परिचयाची झाली ह्मणजे अगदीं सामान्य वाटावयास लागून तिच्याहून कांहीं नवीन किंवा जास्त अद्भूत गोष्टीकरितां तळमळ लागून रहाते. अशीं अनेक साधनें डोळ्यापुढें असल्यामुळें तीं आपणास हवीं तीं असें प्रत्येकास वाटून तीं मिळविण्याचे प्रयत्न सुरूं होतात. अशाप्रयत्नास यश न आलें तर मनुष्य दुःखी आणि हताश बनतो. अशा रितीनें जगांतील दुःख आणि निराशा वाढत जाते!! पाश्चात्य लोकांना असें वाटतें कीं मनुष्याची रहणी जसजशी जास्त ऐषआरामाची होत जाईल तसतसा तो आपल्या अंगांतील सर्व गुण प्रकर्षानें उपयोगास आणून एकंदर कला कौशल्य वाङ्मय शास्त्रीय ज्ञान इत्यादिकांत भर घालील व तेणेकरून मनुष्यसमाज जास्त सुखी होईल. परंतु अशा अनेक गोष्टी आहेत कीं ज्या कांहीं एक सीमेपर्यंतच चांगल्या असून त्यापुढें त्याच वाईट बनतात. आणि ऐषआरामाचीं साधनें हीं अशांपैकीच होत. पाश्चात्य देशांत३।४शें वर्षांत कलेमध्यें काहीं मोठीशी सुधारणा घडून आल्याचें दिसत नाहीं व वाङ्मय तर खात्रीनें कमी दर्जाचें होत चाललें आहे!! तर ऐषआरामाच्या वस्तूंची संख्या वाढल्यामुळें व दिवसेंदीवस लोकांची रहाणी जास्त डामडौलाची होत चालल्यामुळें मानवसमाजांत सुखवाढण्याऐवजीं दुःख व निराशा हीच वाढली आहेत.

८ वरील सर्व गोष्टींचा शांतपणें विचार केला असतां जीस आपण सुधारणा ह्मणून मानतो व जीमध्यें आपण पाश्चात्य लोकांच्या फार मागें असल्यामुळें आपण मनुष्य तरी आहो कीं काय अशी लाज वाटू लागते ती स्थिती प्राप्त झाली असतां एकंदर समाजास ज्यास्त सुख खात्रीनेंच प्राप्त होईल असें ह्मणता येणार नाहीं. करितां अमुक एक गोष्ट पाश्चात्य व पाश्चात्य लोक फार सुधारलेले तेव्हां ती चागली असलीच पाहिजे असा युक्तिवाद न करितां परमेश्वरानें आपणांस दिलेल्या बुद्धीचा उपयोग करून कोणत्याहि गोष्टीची इष्टानिष्टता ठरवावी व नंतर त्या प्रमाणें वर्तन करावें.

---

## मराठी व्याकरणावर व्यासंग

पुण्यांत अलीकडे भारतेतिहास संशोधक मंडळाच्या सभासदांसाठीं दर रवीवारीं ज्ञानेश्वरीच्या व्याकरणावर रा० राजवाडे यांची व्याख्यानें होत असतात. तीं व्याख्यानें ऐकण्याची ज्यांस संधि आली असेल त्यांस मराठी भाषेस संस्कृत भाषेचें पाणिनीय व्याकरण अजून देखील कसें काय लागूं पडतें हें लक्षांत येईल. ही व्याख्यानें यूरोप अगर अमेरिकेंतील युनिव्हरसिटया मध्यें उच्च तऱ्हेच्या अभ्यासाचें प्रवर्तन करण्यासाठीं " सेमीनार क्लसेस" असतात त्या प्रकारचीं असतात. रा० राजवाडे यांच्या व्याकरणावर व व्युत्पत्तीवर टीका करणारा वर्ग बराच मोठा आहे व तो पुण्यांत तर फारच मोठा आहे. रा० राजवाडे त्यांच्यावर झालेल्या टीकेडे मुळींच लक्ष देत नाहींत असा त्यांजवर लोकांचा आरोप आहे. त्यांचें असें ह्मणणें आहे कीं ज्यांची पूर्वतयारी बिलकुल झाली नाहीं, त्यांस उत्तर द्यावयाचें ह्मणजे शिकवावयाचें, दुसरें कांहीं एक नाहीं. राजवाड्यां सारखे मेहनती गृहस्थ महाराष्ट्रांत जर पुष्कळ असते तर रा० राजवाडे यांचें ह्मणणें हास्यास्पद झालें असतें. तथापि खरा अभ्यासक वर्ग ज्या देशांत फारच थोडा आहे तेथें दोहोंपैकीं एक गोष्ट करावी लागेल. एकतर शास्त्राची प्रगति करण्यास देतां येण्याजोगा वेळ व उत्साह कमी करून सामान्यांचें शंकासमाधान करीत बसावयाचें दुसरा मार्ग झटला ह्मणजे उद्धटपणानें आपलेंच तें खरें असें धरून पुढें सरसावयाचें. रा० राजवाडे यांनीं दुसरा मार्ग पत्करिलेला दिसतो.

रा० राजवाडे यांच्या व्याख्यानांस त्यांचे टीकाकार हजर नसतात ही गोष्ट देखील लक्षांत ठेवण्याजोगी आहे. जर विरुद्ध टीकाकार तयारीनें रा० राजवाडे यांच्या मतांचें खंडण करितील तर रा० राजवाडे यांचा एकांगीपणा जरासा कमी होईल. राजवाडे यांच्या व्युत्पत्यामध्यें फारसी ह्मणून समजलेल्या शब्दांस संस्कृतोद्भव करविण्याचा प्रयत्न दिसतो. उदाहरणार्थ "फरारी" शब्दाची राजवाडी व्युत्पत्ति पहावी.

विरुद्ध टीका करणारे जोंपर्यंत शास्त्र साहित्याचें शस्त्र घेऊन पुढें सरसावत नाहींत तों पर्यंत रा० राजवाडे यांस स्वतःचें खरे धरून पुढें सरल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

राजवाड्यांच्या ज्ञानेश्वरीविरुद्ध आक्षेपक पुष्कळच आहेत. कोणीं ह्मणतात कीं ती अशुद्ध प्रत आहे- कोणी तर ती प्रत राजवाड्यांनींच उत्पन्न केली असें ह्मणणारे आहेत पण असें ह्मणणाऱ्या पुणेकरापैकीं राजवाड्यांचें ज्ञानेश्वरीवरील व्याख्यान ऐकावयास देखील येण्याचा प्रयत्न करीत नाहींत.

संशोधक मंडळांतील सध्यांच्या राजवाडे यांच्या विद्यार्थ्यांपैकीं कोणीतरी त्यांची ऐतिहासिक परंपरा घेऊन रा० टामले यांच्या हातून व्याकरणशुद्धि व्हावयाची जी राहिली होती ती हातीं घेवो.

---

## अकोला शहर सुंदर करणें शक्य आहे काय

आपले शहर चांगलें सुंदर दिसावें यासाठीं चर्चा अलीकडे होऊं लागली आहे. मुंबई सरकारनें या बाबतींत लोकमत जागृत करण्यांत पुढाकार घेतला आहे. मुंबई शहराच्या सिटी इंप्रुव्हमेंट ट्रस्टनें बरीच शहराची सुधारणा घडवून आणली आहे. मुंबई शहराची स्वच्छतेंत व सौंदर्यांत काय नर पडली आहे हें सांगावयास नकोच. कलकत्ता शहरावरहि आतां इंप्रुव्हमेंट ट्रस्ट आला आहे. आपल्या सामान्य जनास वरील प्रकारचे ट्रस्ट" देणगी न वाटतां धाड वाटते तथापि या संबंधाचें मत बदलू लागेल असें वाटतें. शहर सुधारणेच्या कल्पना आपल्यामध्यें उत्पन्न झाल्या नसून परक्यांनीं हा घांस आह्मांस विनाकारण गिळावयास दिला अशी लोकांची समजूत झाली आहे. व या प्रकारची समजूत होण्यास कारणेंहि आहेत. मुख्य कारण हें आहे कीं आह्मांमध्यें या संबंधानें विचार जागृतीच झाली नाहीं.

विचार जागृतीचीं कांहीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत थोड्या महिन्यापूर्वी लोकशिक्षणांत डाक्टर केतकर यांचा नगरसंवर्धन आणि नगर सौंदर्य" या माथळ्याखालीं एक सुंदर व वाचनीय लेख प्रसिद्ध झाला होता. या लेखांतील कल्पना सर्व महाराष्ट्रांतील नागरीकांस घेण्यासारख्या आहेत. म्युनिसिपालिट्यांतील सभासदांनीं तो लेख वाचला असतां नगर शासनासंबंधाच्या उपयुक्त कल्पना त्यांस कळतील व नवीन कल्पनाहि सुचतील.

पुणें शहर हें फार मागसलेलें आहे व आह्मीं वऱ्हाडकर मंडळी फार प्रगमनशील आहों असा आह्मांस अभिमान वाटतो. तथापि पुणें शहरांत देखील एक सानिटरी असोसिएशन निर्माण झाली आहे. या असोसिएशनचे सभासद आपापल्या भागांत घाण कोठें आहे याची तपासणी करितात व यांच्या तक्रारी म्युनिसिपालिटीकडे जातात. या तऱ्हेची असोसिएशन म्युनिसिपालिटींतील कार्यकर्त्यांस जागृत व कर्तव्यदक्ष रहाण्यास लावील अशी आशा आहे.

पुणें शहरास सरकारकडून तीस चाळीस लाखांची रक्कम नगरसुधारणेसाठीं मिळाली आहे.

या रकमेचा उपयोग कसा करावा या संबंधानें चर्चा त्या शहरांतील पत्रांत दिसून येत नाहीं. केसरींत या संबंधाचा लेख अजून आला नाहीं. व लोकमत पुण्यास आपणांस मिळालेल्या देणगीचा उपयोग कसा करून घ्यावा यासंबंधीं बनलें नाहीं.

धुळें येथें देखील एक सानिटरी असोसिएशन निर्माण झाली आहे.

आमचे वऱ्हाडकर आपापल्या शहराच्या सुधारणेसाठीं काय करणार? आपल्या शहरांतील जीं व्यंगें आहेत तीं काढून टाकण्यासाठीं खटपट जी करावयाची ती म्युनिसिपालिट्यांकडूनच करवावयाची तथापि " नगरसंवर्धन आणि नगरसौंदर्य " साधण्याच्या हेतूनें खासगी मंडळें स्थापन झालीं तर म्युनिसिपालिट्यांतील सुस्त लोकांस टोंचणी देण्यासाठीं तरी त्यांचा उपयोग होईल.

---

## भूत, भविष्य आणि वर्तमान

प्रसिद्ध इंग्रज लेखक लॉर्ड मेकाले यानें आपल्या निबंधांत एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं मनुष्याची दृष्टि नेहमीं भूत आणि भविष्य यांनीं आकर्षिली जाते, वर्तमानकाळ त्याला अत्यंत नीरस वाटतो. पण हा भास मृगजळासारखा आहे. वर्तमान हेंच खरें आहे. भूत आणि भविष्यकालीन सृष्टि ही केवळ काल्पनिक आहे. जर्मन ग्रंथकार श्लेगेल यांचेंही असेंच ह्मणणें आहे. भूत आणि भविष्य काळांचीं भपकेदार चित्रें कल्पनासृष्टींत सर्वदा संचार करणारांना ठीक आहेत, पण आपण व्यावहारिक लोक पडलों, आपणांस वास्तविक सृष्टि वर्तमानकालीन सृष्टि हि अधिक महत्वाची वाटली पाहिजे. युरोपांतल्या लोकांची दृष्टि वर्तमानकाळाकडे विशेष आहे, ह्मणूनच ते ऐहिक उन्नतीचे स्वामी बनले आहेत. आह्मी हिंदुस्थानचे लोक परलोकचे साधन करण्यासाठीं वर्तमानकालच्या कर्तव्यांस विन्मुख झालों आहों, ह्मणूनच आज आमची अवनत स्थिति आहे. आमच्या पूर्वजांची दृष्टि अशी नव्हती. निदान तें त्यांचें ध्येय तरी खास नव्हतें. श्रीमद्भगवद्गीतेंत ‘ कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ’ असें ह्मटलें आहे त्याचा अर्थ हाच आहे कीं आह्मी वर्तमानकालीन कर्तव्याकडे पहावें, भविष्याविषयीं काळजी करूं नये. आमच्या उन्नतीचा हा मूलमंत्र आह्मी विसरल्यामुळेंच आम्हांला आज ही स्थिति प्राप्त झाली आहे. ही सृष्टि नश्वर — नाश पावणारी—आहे, आत्मा तेवढा अविनाशी आहे, प्रपंचाचा त्याग करून आत्मोन्नतीचा सदैव यत्न करावा अशी समजूत आह्मी लोक उराशीं बाळगून बसलों आहों युरोपियन समाजाची उन्नति अगोदर शरीरारोग्य, मग मानसिक बळ आणि शेवटीं आत्मोन्नति या क्रमानें होत आहे आणि हाच क्रम योग्य आहे. लहानपणीं शरीराची वाढ होते, तरुणपणीं मानसिक शक्तीचा विकास होतो व वृद्धपणीं आत्मोन्नतीचे विचार सुचतात, असा व्यक्तिगत उन्नतीचा क्रम असतो. याच क्रमानें समाजाची उन्नति होणें जरूर आहे. आमचा समाज या मधल्या पायऱ्या टाळून एकदम आत्मोन्नतीच्या पायरीवर उडी मारून जावयाला पाहतो व त्यामुळें ‘ इदंच नास्ति, परंन लभ्यते ’ अशी त्याची शोचनीय अवस्था होते. आमच्या अवनतीचें हें खरें कारण आहे. पण तिकडे कोणी लक्ष देत नाहीं, आणि आमचा देश स्पिरिचु आलिस्ट अर्थात आत्मोन्नतीपर आणि युरोपियन मटीरियालिस्ट अथवा जडतत्त्ववादी असें समजून आह्मी स्वतःकडे मोठेपणा घेऊन दुसऱ्याला तुच्छ समजतों. पण ही आमची केवढी चूक आहे! ही चूक करतांना आह्मी पूर्वजांच्या वचनाचा आधार देऊन त्यांनाही गौणत्व आणूं पाहातों. आमच्या चुकीचें व गैरसमजाचें प्रायश्चित्त आमच्या पूर्वज ऋषींना देणें यासारखा मूर्खपणा तर कोणताच नसेल. यासाठीं आमच्या श्रीमद्भगवद्गीतेसारख्या ग्रंथांचा खराखरा व्यावहारिक अर्थ करून दाखविणारें भाष्य तयार व्हावयास पाहिजे आहे. तें झाल्याशिवाय आमच्या लोकांच डोळे उघडणार नाहींत. असें भाष्य रा. टिळक करीत आहेत असें ऐकतों. हें काम त्यांच्या हातून उत्तम प्रकारें होईल असा सर्वांना मोठा भरंवसा वाटत आहे. या भाष्याचीं प्रवचनें सर्व देशी भाषांतून जागोजागीं झालीं पाहिजेत. व लोकांचा भ्रम दूर करून त्यांना प्रवृत्तिपर करून सोडलें पाहिजे. हें आमच्या लोकनायकांचें एक महत्त्वाचें कर्तव्य आहे. भूत आणि भविष्य यां दोघांच्या उज्ज्वल काल्पनिक चित्रांमध्यें वर्तमानकाळाचा कोंडमारा होत आहे व वर्तमानकालीन कर्तव्याविषयीं उन्मुखता दिसत आहे व तीच आमच्या अवनतीचें मूळ आहे.

---

## हिंदूंची रणशपथ

सध्या वातावरण रणदुंदुभींच्या नादानें भरलेलें आहे, अशावेळीं हिंदूंच्या प्राचीन रणरितीसंबंधानें शोधपूर्वक मिळविलेली माहिती वाचकांस आदरणीयच वाटेल. ह्मणून पूर्वी समरभूमीवर जाण्यापूर्वी हिंदुलोक कशा प्रकारें शपथ करीत असत त्याविषयीं दोन शब्द सांगतों.

महाभारतांत शांतिपर्वांत शपथेचा नमुना दिला आहे तो असा आहे—आह्मी विजय संपादण्याची इच्छा करतों. आह्मी लढाईंत परस्परांची साथ सोडणार नाहीं.

( शां. प. अ. १०२ )

यावर राजा ह्मणतो—जे भीत असतील त्यांनीं आतांच दूर व्हावें. लढाईंतून पळण्यानें अर्थनाश, राज्यनाश व अपकीर्ति होते. हातांतलीं शस्त्रें टाकावीं लागतात, शत्रूचे कैदी होऊन रहावें लागतें. निर्लज्जता येते इत्यादि

त्यावर शिपाई पुनः ह्मणतात— महाराज, तुमच्यासाठीं आह्मी हातावर शिर घेऊन लढण्यास आणि स्वर्ग लोक गाठण्यास तयार आहों. आह्मी लढाई जिंकली तरी स्वर्गसुखाचा लाभ घेऊं, मेलोंतर सद्गति आहेच.

याप्रमाणें राजाकडून प्रोत्साहनपर भाषण व शिपायांकडून शपथ घेणें झाल्यावर मग शिपायांची युद्धासाठीं समरभूमीवर रवानगी करण्यांत येत असे.

---

## युद्धाचा रंग

सध्या युद्ध अगदीं निकरावर आलें आहे. जर्मन लोकांनीं बेलज्यम उध्वस्त करून टाकिलें आहे, तरी बेलज्यन लोकांच्या अंगचें पाणी नाहींसें करण्याचें सामर्थ्य त्यांचें अंगांत नाहीं. जर्मनीनें घेतलेलें आस्टेंड शहर बेलज्यन लोकांनीं परत घेतल्याची बातमी आली आहे. पूर्वेकडून रशियाचा नेट जर्मनीला लागला आहे त्यांत शिथिलता आलेली नाहीं. तुर्कस्थाननें दोन लढाऊ जहाजें काळ्या समुद्रांत जर्मन अधिकाऱ्यांचे हाताखालीं देऊन पाठविलीं आहेत, यावरून रशियाला दक्षिणेकडून शह देण्याचा जर्मनीचा रोंख स्पष्ट दिसत आहे. जर्मनीचीं इतर राष्ट्रांशीं कारस्थानें सुरू आहेत. तुर्कस्थानला त्यानें आपल्या बाजूला अंशतः तरी ओढलेलें दिसतें. इतली अद्याप तटस्थ आहे, आणि त्या देशाचे आस्ट्रियाशीं वैर असल्यामुळें तो जर्मनीला मिळेल असा रंग दिसत नाहीं. दक्षिण आफ्रिकेंतल्या बोअर लोकांमध्यें जर्मनीनें दुफळी उत्पन्न केली आहे. बोअर लोकांच्या लष्करी अधिकाऱ्यांपैकीं कम्यांडर मारित्झ हा जर्मनीला अनुकूळ झाला आहे व आपणास जे लष्करी मिळणार नाहींत त्यांना कडक शिक्षा करण्याचा त्याचा सपाटा सुरू आहे. दक्षिण आफ्रिकेंत मारित्झ हा बंडावा करील ह्मणून तेथील सरकार कडक उपाय योजीत आहे. त्यांनीं लष्करी कायदा जाहिर केला आहे. फ्रान्सच्या पश्चिम सरहद्दी पलीकडे इंग्रज व त्यांचीं साह्यकारी सैन्यें नेटानें पुढें सरकत आहेत व जर्मनीचे आवेशाचे हल्ले मागें परतवीत आहेत, जर्मन लोकांनीं घेंट आणि ब्रुगेस हीं ठिकाणें घेतलीं त्यांत त्यांचा केवळ खूप लूट मिळावी येवढाच उद्देश दिसतो. जिंकलेल्या स्थळांतल्या लोकांपासून खंडणी जुलमानें वसूल करणें ही गोष्ट इतर सुधारलेल्या राष्ट्राना कितीही अन्यायाची व निर्दयतेची वाटली तरी ती गोष्ट जर्मनीच्या अंगवळणी पडलेली आहे. सन १८७०सालीं फ्रान्स बरोबर झालेल्या युद्धात त्यांनीं अशीच ४ कोट फ्रांक खंडणी जातां जातां वसूल केली होती व ६० कोट फ्रांक किंमतीच्या मालमत्तेची जाळपोळ केली होती. इतके दिवस संयुक्त सैन्यें नुसतें स्वसंरक्षणाचें काम करीत असत, पण लवकरच त्यांना हल्ला करून जावे लागेल. कारण जर्मनी आतां समुद्र किनाऱ्यावर बहुतेक येऊन पोचला आहे. समुद्रातली खरी लढाई अजून सुरू झाली नाहीं, पण आतां तिला फार दिवस लागणार नाहींत असें दिसतें. तूर्त एकमेकांचीं जहाजें बुडविण्याचेंच काम सुरू आहे. तज्ञ लोक ह्मणत आहेत कीं आतां समुद्रांत मोठाल्या जहाजांनीं लढण्याचे दिवस राहिले नाहींत. कारण कीं त्यांना समुद्रांतर्भागीं चालणाऱ्या विनाशक बोटींपासून फार भय आहे. आतांची समुद्रांतली लढाई लहान लहान जहाजांमध्येंच झाली पाहिजे. समुद्रांतून लढाई करण्याची तयारी जर्मनीनें अलीकडे जारीनें चालविली आहे जर्मन लोकांनीं आणखी शंभर समुद्रांतर्भागीं संचार करणारीं सबमरीन जहाजें व दोन मोठालीं वेडर जहाजें बांधविलीं आहेत व लवकरच तीं रणक्षेत्रांत उतरतील. मग समुद्रावरची लढाई सुरू होईल असें ह्मणतात.

---

## कांग्रेसचे अध्यक्ष.

यंदाच्या कांग्रेसच्या अध्यक्षपदासाठीं लाला लजपतराय व मि. भूपेंद्रनाथ बसु अशीं दोन नांवें सुचविण्यांत आलीं होतीं. पैकीं मि. बसु यांना स्वागत कमिटीनें अध्यक्ष निवडलें असल्याचें कळतें. मि. बसु यांच्या कर्तृत्वाबद्दल किंवा लायकीबद्दल आह्मांला कांहीं बोलावयाचें नाहीं. ते त्या पदाला सर्वथा लायक आहेत. प्रश्न इतकाच आहे कीं बंगाल प्रांताला हा मान पांचसहा वेळा पूर्वी मिळाला असतां आतां पुन्हां त्यालाच तो मिळावा, व पंजाब प्रांताच्या वाट्याला तो गेल्या पंचवीस वर्षांत एकदांही येऊं नये हें योग्य दिसतें काय? लाला लजपतराय यांची योग्यता मि बसूपेक्षां कोणत्याही प्रकारें कमी नाहीं. त्यांची स्वदेशप्रीति, निःस्वार्थबुद्धि. आत्मत्याग, कर्तृत्व दूरदृष्टि इत्यादि गुणांबद्दल इंग्लंडांतही त्यांचा लौकिक झालेला आहे. असें असून त्यांच्या निवडणुकीला मुंबईची कमिटी विरुद्ध गेली यावरून लाला लजपतराय यांचे विषयीं झालेला त्या कमिटीचा दुर्ग्रह अद्यापही कायम आहे असें दिसतें. मागें लालासाहेबांचें नांव मवाळ पक्षास असह्य व अप्रिय झालेल्या दुसऱ्या दोघा व्यक्तींच्या नांवाशीं संयुक्त करण्यांत आलें होतें व त्यावेळीं त्यांच्या संबंधानें झालेला दुर्ग्रह एका प्रकारें वाजवी ह्मणता आला असता. तथापि त्यानंतर गेलेल्या काळांत लाला साहेबाचें वर्तन, त्यांनीं केलेलीं भाषणें व लिहिलेले लेख यावरून तो ग्रह चुकीचा ठरला असूनही अजून त्यांचेबद्दल बागुलबोवा वाटावा व अगोदरच रुष्ट झालेल्या पंजाब प्रांताच्या सहानुभूतीस कांग्रेसनें मुकण्याचा प्रसंग येऊं द्यावा हें कोणत्याही प्रकारें इष्ट नाहीं. ‘ बंगाली ’ पत्र ह्मणतें कीं लाला साहेबांनीं दम धरावा ह्मणजे त्यांची ही पाळी लवकरच येईल. हाच उपदेश त्या पत्रानें भूपेंद्रनाथास करणे अधिक योग्य झालें असतें. कारण ते लाला साहेबांपेक्षां अल्पवयस्क आहेत. आणि लाला साहेब कोठें येवढें अध्यक्षपदाकरितां हपापलेले आहेत ? सन्माननीयाचा वेळींच सन्मान करणें हें कांग्रेसचें कर्तव्य तिच्या चालकांना कळत नसेल तर तें तिचें दुर्दैव ह्मटलें पाहिजे.

---

## लॉर्ड हार्डिंज साहेबांस धन्यवाद

बजबज येथें झालेल्या दंग्यासंबंधानें चौकशी करून कोमागाटामारु जहाजावरील शीख लोकांकडे सदर दंग्याबद्दल किती दोष आहे व पोलिसाकडे किती आहे वगैरे गोष्टींचा निर्णय होण्याची अत्यंत जरूरीआहे व ही चौकशी करण्यांत निमे सरकारी आफिसर व निमे हिंदी ( आफिसर नसलेले ) व त्यांतही एक शीख गृहस्थ असणें जरूर आहे अशी वाजवी मागणी हिंदी पत्रकारांनीं केली होती. ती आमचे न्यायप्रिय व्हाइसराय लॉर्ड हार्डिंज यांस मान्य होऊन त्यांनीं लागलीच एक कमिटी सदर प्रमाणें नेमिली आहे. तींत बर्द्वानचे महाराज व पंजाबचे एक शीख गृहस्थ नेमून कमिटीनें तावडतोब कामाला लागावें असा हुकुम फर्मावला आहे. हें पाहून आंग्लोइंडियन पत्रांपैकीं स्टेट्समन कर्त्यांचें डोकें उठलें आहे, व असें करण्यानें हिंदुस्थान सरकारचा बंगाल सरकारविषयीं बेभरंवसा दिसतो असें सूचित करण्याचें धाडस केलें आहे. शीख शिपाई तिकडे फ्रान्सात राजनिष्ठेनें प्रेरित होऊन आपल्या राजाकरितां हातावर शिर घेऊन लढत आहेत, अशा वेळीं त्यांच्याच जातभाईंना न्यायानें वागविण्यासाठीं लॉर्ड हार्डिंज साहेबानीं केलेल्या कृत्यासंबंधानें अशा प्रकारची कुत्सितपणाची टीका करणें हें जितकें धाडसाचें तितकेंच कुटिलपणाचें ही आहे. पण या दोन्ही गोष्टी अंगवळणीं पडलेल्या आमच्या आंग्लो-इंडियन व्यवसायबंधूनाही गोष्ट अद्याप कळूं लागलेली दिसत नाहीं. लार्ड हार्डिंज हे न्यायाचा कांटा समतोल धरून अशा पत्रकर्त्यांचे कान वेळींच उपटीत आहेत ह्मणून बरें आहे. पायोनियर पत्रानें हिंदी राजनिष्ठ प्रजेवर दोंगी व मतलबी राजनिष्ठेचा आरोप करणारा लेख नुकताच लिहिला होता त्याबद्दल त्याचे कान हिंदुस्थान सरकारानें उपटल्याची बातमी ‘बंगाली’ पत्रानें दोन तीन दिवसांपूर्वीच दिली होती. तेवढ्यानें शहाणपण शिकण्याइतकी अक्कल स्टेटस्मन कर्त्याला नसली तर सरकार ती लवकरच त्याला शिकवील

अशी आम्ही आशा करतों, व वर्णभेद न ठेवतां सर्व प्रजेस सारख्या रीतीनें प्रेमानें व न्यायानें वागविल्याबद्दल लॉर्ड हार्डिंज यांस धन्यवाद देतों.

---

## रा. ब महाजनींचें व्याख्यान

अकोल्याच्या देशमुख लायब्ररींत व्याख्यानमाला सुरू करावी असें आमच्या एका मित्राकडून ठरलें आहे व गेल्या सोमवारीं ता. १९।१०।१४ रोजीं रा. ब. अण्णासाहेब महाजनींनी पहिलें पुष्प गुंफिलें ब्राह्मणांचें प्राचीन ध्येय हा व्याख्यानाचा विषय होता. अण्णासाहेबांनीं वसिष्ठाच्या "उत्तर चरित्रा" वरून ब्राह्मणांचें प्राचीन ध्येय स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. "उत्तर चरित्र" याचा अर्थ येथें आयुष्याच्या उत्तर भागांतील चरित्र असा नसून उत्तरकालीन लेखकांनीं लिहिलेलें चरित्र असा केला असतां अण्णासाहेबांचें व्याख्यान अधिक विषयानुरूप झालें असें ह्मणतां येईल. वेद व महाभारत यांतील वसिष्ठांत भेद आहे वेदांतील वसिष्ठ धन देणाऱ्यांची स्तुति करणारा' लढणारा असा आहे. व महाभारतांतील वशिष्ठ शांतीचा सागर आहे. असें अण्णासाहेबांनीं सांगितलें. तथापि वरील अर्थानेंच अण्णासाहेबांनीं "उत्तर चरित्र" हे शब्द योजिले होते हें श्रोत्यांनें ह्मणतां येत नाहीं. वसिष्ठाचें पूर्व चरित्र ह्मणजे विश्वामित्रानें केलेलें कामधेनु हरण हें सर्वांस अवगतच असलें पाहिजे ह्मणून व्याख्यात्यांनीं ह्मटलें व स्वतः ती गोष्ट सांगितली. दुर्दैवानें ती गोष्ट सांगतांना रावबहादूर महाजनि यांसच ती गोष्ट पूर्णपणें अवगत नव्हती असें दिसून आलें. अवगत असल्यास निदान ती गोष्ट आपल्या उपदेशाला साजावी ह्मणून त्यांनीं मुद्दाम बदलली असावी. त्यांनीं गोष्ट सांगितली ती येणें प्रमाणें —

वसिष्ठानें स्वसैन्याचा जो इतका आदर केला तो कामधेनुच्या साह्यानें केला, हें विश्वामित्रानें पाहिलें व कामधेनु वसिष्ठापाशीं मागितली. वसिष्ठ ह्मणाला घेऊन जा. व विश्वामित्र कामधेनु घेऊन जात असतां ती धेनु वशिष्ठाकडे गाऱ्हाणें करण्यास आली तेव्हां वशिष्ठ ह्मणाला "शक्ति असेल तरि रहा." पुढें धेनूनें अंगांपासून म्लेंच्छ यवन शबर शक प्रगट केले. त्यानीं विश्वामित्राचीं कटकें बारा कोस दूर पळविली पण संहार केला नाहीं." असा कथाभाग सांगून रावबहादूर ह्मणतात कीं शांति व अहिंसा याचें सूचक वशिष्ठाचें चरित्र आहे. या कथानिरूपणांत दोष झाले ते येणें प्रमाणें—वशिष्ठ विश्वामित्रास केवळ घेऊन जा असें बोलला नाहीं तर,

कोण ज्ञाता राज्यें स्वीकार करिल आधि ज्या मात्री।

मागों नको, न देया हेया दे धेनु, गाधिजा मात्री॥

शिवाय कामधेनूनें निर्माण केलेल्या सैन्यानें "बळ उडाविलें तीही खगपाते पक्षाहि जसे सहज मशक"

शिवाय म्लेंच्छ यवनासारख्या क्रूर जातींस आर्यांवर घालतांना कवळ अहिंसेचा उद्देश असेल असें वाटत नाहीं. व बाराकोस कटकें दूर "पळविली" ह्मणजे "संहार केला नाहीं" असें नाहीं. उद्यां जर्मन सैन्याची "दाणादाण" करणाऱ्या संयुक्त सैन्यास रावबहादूर त्यांनीं जर्मन सैन्याची फक्त वाताहत केली त्यांस सैरावैरा पळावयास लावलें मारलें बिलकुल नाहीं" असें ह्मणून संयुक्त सैन्याची अहिंस्पदावर स्थापना करितात कीं काय कोण जाणें. असो.

पुढें विश्वामित्रानें वशिष्ठाचे शंभर पुत्र कसे मारले व तरी देखील वशिष्ठानें आपली क्षमाशीलता सोडली नाहीं. असें सांगितलें व त्याबरोबर कल्मषपाद व पराशरजन्म या संबंधाच्या गोष्टी सांगितल्या व शेवटीं क्षमा शांतीचें महत्व वर्णन केलें. व सत्याकरितां व धैर्याकरितां आग्रह आणि चिकाटी धरून बसणें हें कर्तव्य देखील कसें महत्वाचें आहे हें सांगितलें.

रावबहादुर महाजनी यांचें व्याख्यान झाल्या नंतर पांच सात मिनिटें उमरावतीचे डाक्टर केतकर यांचें व्याख्यान झालें. डाक्टर केतकर यांच्या व्याख्यानांत नवीन मुद्दे बरेच होते व व्याख्यान जरी थोडक्यांत झालें. तरी त्यांत नवीन गोष्टी पुष्कळ असल्यामुळें, तें व्याख्यान सर्व दिलें पाहिजे. तें या अंकीं देतां येत नाहीं पुढील एका अंकीं तें व्याख्यान सात्र देण्याचा आमचा इरादा आहे.

डाक्टर केतकर यांच्या व्याख्यानानंतर रा. अनंतराव आठल्ये व रा. वासुदेवराव चिपळोणकर यांनीं काहीं टीपा जोडल्या. रा. आठल्ये यांनीं डाक्टर केतकरांचें व्याख्यान अण्णासाहेबांचे व्याख्यानाशीं विरोध करणारें नसून पूरणार्थ आहे. दोघांच्या ध्येया संबंधाच्या कल्पना एकच आहेत हें स्पष्ट केलें. रा. चिपळूणकरानीं डाक्टर केतकर यांचें ह्मणणे कर्मानें जे ब्राह्मण आहेत त्यांस लागू नसून जातीनें जे ब्राह्मण आहेत त्यांस लागू आहे असें सांगितलें. व कर्मानें जे ब्राह्मण आहेत त्यांचीं काय कर्तव्यें आहेत या संबंधाच्या आपल्या कल्पना व्यक्त केल्या.

अध्यक्ष स्थानीं असलेले इंदुप्रकाशाचे संपादक पाध्ये ह्मणाले कीं विश्वामित्राच्या चरित्रापासून जो बोध घेण्यासारखा आहे तो हा कीं' ब्राह्मणाचें ज्ञान मिळविणें सोपें आहे तथापि ब्राह्मणाचें शील मिळविणें अधिक कठिण आहे. ज्याप्रमाणें आज परीक्षा पास होणें सोपें आहे तथापि सुशिक्षिताचें शील येणें ही गोष्ट तितकी सोपी नाहीं, ही गोष्ट विश्वामित्र चरित्रावरून उघड होणार आहे. वसिष्ठाच्या कालीं ब्राह्मण होण्यास ब्रह्मकुलांत जन्म घेतल्यानें सुलभ होत असलें पाहिजे तथापि इतरांस अशक्य होतें असें नाहीं हें उघड होतें.

---

## वाङ्मय विषयक मध्यप्रांतीय टीपा

यंदा साहित्यसंमेलन मुंबईस भरणार आहे. (१९१९ इस्टर). गेलें १९१२ सालीं अकोल्यास भरलें होतें.

× × ×

अकोल्याचें साहित्यसंमेलन भरल्यापासून वाङमयविषयक अनेक गोष्टी झाल्या. नवयुग व प्रभात, हीं नवीन सचित्र मासिकें निघूं लागलीं व नवे लेखकहि पुढें येऊं लागले.

+ + +

या काळांत मराठी लेखक या नात्यानें पुढें आलेले गृहस्थ ह्मणजे डाक्टर केतकर होत. यांचे लेख महाराष्ट्रांत चळवळ उडविण्यास, व नवीन विचारांचा प्रसार लोकांमध्यें करण्यास कारणीभूत झाले. यांचे इंग्रजी लेख हिंदुस्थानांतलि सर्व इंग्रजी मासिकांतून येत असतात. मराठींत लेख लिहिण्याची त्यांनीं सुरुवात गेल्या दीड दोन वर्षांतच केली व एवढ्या काळांत मराठी लेखक या दृष्टीनें देखील यांची प्रसिद्धि झाली. निरनिराळ्या पत्रांतून व मासिकांतून यांचे, सामाजिक शासन विषयक, धर्मशास्त्रीय, व अर्थ शास्त्रीय लेख निरनिराळ्या पत्रांत व मासिकांत संकीर्ण झाले होते ते आतां एकत्र होत आहेत.

श्रुतिबोध मुद्रामंदिरांतून डाक्टर केतकर यांचे संकीर्ण लेख सपटेंबरला बाहेर पडतील असें आश्वासन मुद्रामंदिराच्या व्यवस्थापकांनीं दिलें आहे. तथापि अजून देखील ते लेख बाहेर पडले नाहींत.

* + *

उमरावतीचे नाटककार वामन गोपाळ जोशी यांच्या "राक्षसी महत्वाकांक्षेची" नवीन आवृत्ति तयार होत आहे.

* * *

नागपूर येथें साहित्य प्रकाशक मंडळी या नांवाची एक मंडळी स्थापन झाली असून तिनें बालमनुस्मृति, पेनचें चरित्र इत्यादि ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत.

+ + +

वऱ्हाड शाळापत्रक हें सरकारी मासिक असून देखील तें लोकप्रिय करण्याची खटपट बरीच होत आहे असें दिसतें. याचें संपादन चांगल्या तऱ्हेनें होत आहे.

+ + +

नागपूरचें महाराष्ट्र हें पत्र अलीकडे चांगल्या जोमांत निघूं लागलें आहे. हें पत्र मध्यप्रांतापलीकडे देखील पसंत लागलें आहे.

+ + +

"गिरिवासी काव्य" या नांवाचें एक काव्य "श्रुतिबोध मुद्रामंदिर लवकरच प्रसिद्ध करणार आहे. तें काव्य उमरावतीचे वकील रा. जयराम केशव असनारे यांनीं संपादिलें आहे.

+ + +

उमरावतीचे कादंबरीकार रा. बाळकृष्ण संतुराम गडकरी यांची "मूर्खाचा शहाणा" ही कादंबरी क्रमशः मुंबई येथें नवीन निघालेल्या प्रभात" नांवाच्या मासिकांत प्रसिद्ध होत आहे. या कादंबरींत प्रभाकरपंत या नांवाचे पी. एच. डी. झालेले गृहस्थ नायक झाले आहेत. प्रभात हें मासिक फार होतकरू दिसत आहे.

---

# वऱ्हाडवृत्त

**हवामानः**— हवा ऋतु पालटल्याबरोबर थंडी चांगली चमकूं लागली आहे. हवापाणी आरोग्याला फार हितावह आहे. पिकेंही चांगली जोमांत आहेत मात्र लढाईच्या धामधुमीमुळें पिकांच्या भावासंबंधानें लोक साशंक झाले आहेत.

मेजर फौकर सिविल सर्जन हे कदाचित् लवकरच लढाईवर जातील असा रंग दिसतो. यांच्यासारखा सद्गुणी व लोकप्रिय अधिकारी सर्वत्रच पूज्य व विजयी असतो.

नवंबरच्या तारिख १६ व १७ रोजीं वऱ्हाडची कृषिविषयक परिषद भरणार असून रा. रा. स्टँडन साहेब अध्यक्ष होणार आहेत. परिषदेच्या प्रोग्रॅममध्यें संत्रे व पेरू यांच्या लागवडीसंबंधानें इतर विषयांबरोबर चर्चा होणार आहे. या समयाला कदाचित् नामदार चीफ कमिशनर यांच्याही आगमनाचा लाभ होण्याचा संभव आहे.

आजपासून डिपार्टमेंटल परीक्षा नागपूर येथें एक सप्तकभर चालेल.

**बादशहांचा संदेशः**—येथील विद्यार्थी मंडळीस हायस्कूलच्या मैदानात श्रीमंत चक्रवर्ती पंचम जॉर्ज यांचा प्रेमळ संदेश समजावून सांगण्याचा सुप्रसंग रा. डेवर याच्या अध्यक्षतेखालीं घडवून आणण्यांत आला. त्यावेळीं रा. करंदीकर व रा० ब० महाजनी यांनीं लढाईची साग्रोपांग माहिती दिली.

**दिवाळीचा महोत्सव**— हा महोत्सव सर्वत्रच मोठ्या आनंदानें होत असतो पण याला नवीन चांगलें वळण देण्याचा उपक्रम गेल्या वर्षापासून येथील वकील मंडळींनीं आरंभला आहे. सध्यां शारिरिक संपदा अत्युत्तम करण्याकडे सर्व कल आहे ही विशेष आनंदाची गोष्ट आहे. वकील मंडळी आपली व्हॉलंटियर पलटण दवडवितात तसेंच घोड दवडी, सायकल दवडी, पोहणें, धांवण्याच्या शर्यती, टेनिसचे सामने, वगैरे बहुविध करमणुकीचे खेळ खेळून कालक्षेप उत्तम करितात. हा नमुना इतरत्रही अनुकरणीय आहे.

**महायज्ञ** —श्री० मु० सखाराम गणेश उर्फ गणपतीबुवा इसलामपूरकर हे गेल्या चातुर्मासांत रा० बाळाभाऊ बामुळगांवकर जहागिरदार यांच्याकडे आल्यापासून बारीं निरनिराळया धर्मकृत्यांना विशेष जोर आणिला आहे. श्री गणेश योगी सांप्रदायाप्रमाणें यांनीं येथें „श्रीगणेशाथर्वशीर्ष„ महायज्ञ गेल्या आश्विन व॥४ पासून सुरू केला आहे. या महायज्ञामुळें सर्वगांवभर उत्कृष्ठ चळवळ व गर्दी उडून गेली आहे. अशा तऱ्हेचा यज्ञ हा येथें पहिलाच असून मंत्रोक्त कार्यें कशीं चालतात हें पहाण्याची उत्तम संधी आहे. अशा सत्कार्याला यथाशक्ति मदत करून स्वतःस पुनीत करण्याला आमची धार्मिक मंडळी चुकणार नाहींत असा भरंवसा आहे.

धी पारसी ज्युबिली थिएट्रिकल कंपनीचे खेळ सध्यां श्रीराम थिएटर मध्यें होत असतात. या कंपनीचे देखावे व इतर भूषणसाहित्य हीं खेळापेक्षांही अधिक प्रेक्षणीय असतात आणि त्या कारणानें प्रेक्षकांच्या झुंडी जातांना दृष्टीस पडतात. आजचा खेळ फत्तेसिंग हा आहे.

**पिसाळलेलीं कुत्रीं**— हल्लीं कुत्रीं विशेष पिसाळलीं असून त्यानीं १०।१२ लोकांस दंश केला तेव्हां मुनसिपालिटीनें सक्तीचा बंदोबस्त चालविला आहे,

मेजर ओरडहाम सानिटरी इंजिनिअर हे लढाईवर जाण्यासाठीं मुंबईकडे रवाना झाले तेव्हां सर्वजणानीं त्यांस विजयसूचक पुष्पहार अर्पण केले व निरोप दिला.

लढाईमुळें कपाशीला गिऱ्हाईक नाहीं तेव्हां शेतकरी लोकांना कोणत्या प्रकारें मदत करता येईल याची वाटाघाट करण्याकरितां काल रोजीं सायंकाळीं मेहरबान डेप्युटि कमिशनर यांनीं मुद्दाम प्रमुख लोकांची सभा भरविली होती. विशेष उपयुक्त तडजोड अमलांत येईल असा भरंवसा आहे.

**लढाईचा फंड**-गेल्या १९ तारखेपर्यंत ६४१४०९ रुपये वर्गणी वऱ्हाड व मध्यप्रांत मिळून लोकांनीं कबूल केली असून त्यापैकीं ४६९४९४ रुपये वसूल झाले आहेत.

WANTED smart and energetic men to work as agents in every town on very lucrative terms. Apply to:-
The National Indian Life Insurance Co. Ltd.,
166, Hornby Road - Bombay.
No. No.421

## नोटीस

हक्क संबंध असणारे अनेक इसमांपैकीं एका इसमाकडून अगर त्याच्य विरुद्ध दावा दाखल झाल्या बद्दल जाहिरात.

[कानू ८ आर्डर १ अॅक्ट ५ सन १९०८.]

दिवाणी मुकद्दमा नंबर १०६ सन १९१४ इ० चौ. ता. ४।११।१४

विद्यमान सबजज यांचे कोर्ट
मुक्काम मलकापूर

केशव जयराम — वादी.
रावजी वा॥ केशव — प्रतिवादी.

दावा—

नांव, बापाचें नांव } सर्वरवत लोक
जात } राहणार बेलाड

तहासिल मलकापूर जिल्हा बुलढाणा यांस

ज्या पेक्षां सदरील मुकद्दम्यांत हक्क संबंध असणारे अनेक इसम आहेत, आणि सदर्हू मुकद्दम्यांत तसे हक्क संबंध असणारे सर्व इसमा तर्फे

दावा आणण्यास

जाबदारी करण्यास
१ केशव जयराम
२ तोताराम वा॥ बेडू
३ पाडु सखाराम
४ मोतीराम वा॥ राघो
५ गोपी वा॥ रघु — राहणार बेलाड
तहासिल मलकापूर जिल्हा बुलढाणा

यानें या कोर्टाची परवानगी घेतली आहे.

त्या पेक्षां तुह्मास नोटीस देण्यांत येत आहे कीं, तारीख ८ माहे आक्टोबर सन १९१४ इ० रोजीं सदर्हू दावा या कोर्टांत दाखल झाला आहे.

आज तारीख २१ माहे १० सन १९१४ इ० रोजी आमच्या सहीं निशीं व कोर्टाच्या शिक्यानिशीं दिली.

शिक्का — M. C. Tivary
सबजज
No. No.429 — Malkapur

## नोटीस

दाव्याच्या निकालाचें समन्स.

(आर्डर ५ कानू १ व ५ एक्ट ५ सन १९०८)

दिवाणी मुकदमा नंबर ६४४ सन १९१३ इ०

विद्यमान स्मॉल काज जज्य सा० याचें कोर्ट
मुक्काम खामगांव

लक्ष्मणदास रामलाल मारवाडी खामगांव — वादी.
कडतु गणपती रा० लोखंडपाळ ता० खामगांव — प्रतिवादी.

दावा—

नांव कडतु
वल्द गणपती
जात— राहणार लोखंडपाळ
तहसिल खामगांव जिल्हा

ज्यापेक्षा वादी यानें तुझांवर बदल दावा केला आहे; त्या पेक्षां सदर्हू दाव्याचा जबाब देण्या साठीं तारीख २४ माहे ११ सन १९१४ इ० रोजीं दिवसा १० वाजतां जातीनें किंवा त्या कोणा प्लीडरास योग्य माहिती दिली असेल व दाव्यासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालाचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा आसामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर होण्याविषयीं या लेखावरून तुह्मांस समन्स करण्यांत येत आहे; व तुह्मी हजर होण्यासाठीं जो दिवस ठरविला आहे तो दाव्याच्या अखेर निकालासाठीं नेमला आहे, यास्तव ज्याच्या जबानीवरून व ज्या दस्तऐवजा वरून तुमच्या जबाबास बळकटी येईल असा भरंवसा बाळगण्याचा इरादा असेल तसे सर्व साक्षीदार व तसे सर्व दस्तऐवज त्या दिवशीं हजर करण्यास तुह्मी सिद्ध असले पाहिजे.

तुह्मास नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदरीं लिहिलेल्या दिवशीं हजर न झाल्यास, तुमच्या गैरहाजरींत दाव्याची चवकशी होऊन ठराव केला जाईल. ता. १७।१०।१४

R. N. Trivedi.
No. No.430 — सबजज्ज खामगांव

**सतत ४२ वर्षें चाललेला कारखाना**

**ए. जे. क्षात्रे आणि सन् सुगंधी.**

ठिः--पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदीर भुलेश्वर —– मुंबई.

एकच भाव ! एकच भाव !

ओटो सुरंगी आमचेकडे मिळणारा माल ओटो सुरंगी

**अत्तरें.**— गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल, रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई, चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्कहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. ही अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

**तेलें.**— चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगंधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरानिराळ्या भावाचीं मिळतील. दर बाटली ४ आणे.

**अष्टगंधी अरगजा**, १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व फितना ( निरनिराळ्या सुवासाचा ) दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम ३॥ आ. ५ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट.

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, चंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नं. ४१३

**वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.**

नामर्दास मर्द बनाविणारी

**राजवंशी नवरत्न याकुती,**

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

**राजवंशी सांड्याचें तेल,**

किंमत रुपये ५ ट्रेड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे.

सरकारचे अॅनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

**परमा सायरप.**

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध- एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,
खबुतरखाना भुलेश्वर मुंबई.

नो० नं० १९

**Oriental Government security Life Assurance Co., Ltd**

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.
THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

**FUNDs 4½ CRORES.**

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

**Quinquennial Record of Progress.**

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| | | Rs. |
| 1888 | 8,668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17,657 | 4,68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6,81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8,47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 64,097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11,48,642 | 36,38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80,05,818 |
| | 31 | 1,41,32356 |
| 1903 | 41,07, | 2,10,95,947 |
| 1908 | 53,550 | 3,22,79,991 |
| 1913 | 69,44609 | 4,41,61,889 |

**RECORD BONUS**

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

" At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently look forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essential in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL
Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

*M. deSOUZA,*
CHIEF AGENT,
N. No. 13 — *C. P. Berar & Khandesh,* NAGPUR

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआत्ममांत छापून प्रसिद्ध केलें